




# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शनिवार ११ एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०













# ममतांना भाच्याला सीएम बनवायचे आहे

**कोलकाता/वृत्तसंस्था :** शुक्रवारी पश्चिम बंगालमधील डेब्रा येथे एका जाहीर सभेला संबोधित करताना, गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटले की, ममता बॅनर्जी यांना बंगालच्या जनतेची मुळीच पर्वा नाही; त्यांचा एकमेव उद्देश आपला भाचा अभिषेक बॅनर्जी याला राज्याचा पुढील मुख्यमंत्री बनवणे हाच आहे. दरम्यान, बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील टेंटुलिया येथे एका निवडणूक सभेचे आयोजन केले. यावेळी त्यांनी, 'सापावर विश्वास ठेवता येईल, पण भाजपवर मात्र नक्कीच नाही,' असे विधान केले. शुक्रवारी भारतीय जनता पक्षाने पश्चिम बंगालसाठी आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला; या जाहीरनाम्याला 'विश्वासाचे पत्र' (भरोसे का पत्र) असे नाव देण्यात आले आहे. या जाहीरनाम्यात महिला आणि बेरोजगार तरुणांना दरमहा ३,००० रुपयांची आर्थिक मदत, सत्तेवर आल्याच्या पहिल्या सहा महिन्यांतच 'समान नागरी संहिता' (UCC) लागू करणे, तसेच ४५ दिवसांच्या आत सरकारी कर्मचा-यांना ७ व्या वेतन आयोगाचे लाभ देणे यांसारख्या घोषणा करण्यात आल्या आहेत.



बंगालमध्ये २३-२९ एप्रिल रोजी मतदान, तामिळनाडूमध्ये २३ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात मतदान होणारा आहे. बंगालमध्ये २३ एप्रिल आणि २९ एप्रिल रोजी दोन टप्प्यांत मतदान होईल, तर तामिळनाडूमध्ये सर्व जागांवर २३ एप्रिल रोजी मतदान होईल. भाजप आज पश्चिम बंगालसाठी आपला निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध करेल. यावेळी गृहमंत्री अमित शाह देखील उपस्थित राहतील. याव्यतिरिक्त, शाह पश्चिम मेदिनीपूरमध्ये जाहीर सभा आणि खरगपूरमध्ये रोड शो करतील. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका अंतर्गत गुरुवारी आसाम, केरळ आणि केंद्रशासित प्रदेश पुद्दुचेरीमध्ये मतदान संपले.

# भाजपापेक्षा साप बरा-ममता

**परगणा /वृत्तसंस्था :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी भाजपवर तीव्र टीका करत बंगाली जनतेला तृणमूल काँग्रेसला मतदान करण्याचे आवाहन केले आहे. उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील तेंतुलिया येथे आयोजित निवडणूक सभेत बोलताना त्यांनी भाजपवर निशाणा साधत सापावर विश्वास ठेवता येईल, पण भाजपवर नाही असे वक्तव्य केले.राज्य सुरक्षित ठेवायचे असेल तर टीएमसीला मतदान करा. संपूर्ण राज्यात टीएमसीची मीच उमेदवार आहे असे समजा, असे त्या म्हणाल्या. या वेळी त्यांनी केंद्र सरकारवरही गंभीर आरोप करत देशातील यंत्रणा निष्पक्ष राहिलेल्या नसल्याचा दावा केला. देशातील कोणतीही यंत्रणा आता तटस्थ नाही. भाजपने सगळ्यांनाच आपल्या ताब्यात घेतले आहे, असा आरोप त्यांनी केला. ममता बॅनर्जी यांनी आसाम विधानसभा निवडणुकीबाबतही शंका उपस्थित करत भाजपवर बाहेरून मतदार आणल्याचा आरोप केला. भाजपला स्थानिक मतदारांवर विश्वास नव्हता, म्हणून त्यांनी उत्तर प्रदेशातून तब्बल ५०,००० लोकांना रेल्वेने आसाममध्ये आणले असा दावा त्यांनी केला. दरम्यान, १२६ सदस्यीय आसाम विधानसभा निवडणुकीसाठी गुरुवारी एकाच टप्प्यात मतदान पार पडले.



# पैसे नसतील तर लाडकी बहीण योजना बंद करा-उच्च न्यायालय

## पेन्शनला पैसे नाहीत, पण योजनेसाठी कोट्यवधी?

**मुंबई/प्रतिनिधी :** शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना सातव्या वेतन आयोगानुसार पेन्शन व अन्य लाभ देण्यासाठी सरकारकडे पैसे नसतील तर लाडकी बहीण योजना बंदी केली पाहिजे, अशा शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला फटकारले. मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागातील एका निवृत्त महिला कर्मचा-याला सातव्या वेतन आयोगानुसार पेन्शन व अन्य लाभ पालिकेने न दिल्याने तिने उच्च न्यायालयात धाव घेतली. या याचिकेवरील सुनावणीवेळी उच्च न्यायालयाने राज्य सरकारला खडेबोल सुनावले.

गेल्या सुनावणीत महापालिकेने संबंधित महिलेला ३० मे २०२६ पर्यंत सहाव्या वेतन आयोगानुसार पेन्शन व अन्य सर्व लाभ देण्याची तयारी दर्शवली होती. मात्र, न्यायालयाने याचिकाकर्तीला सातव्या वेतन आयोगानुसार पेन्शन व अन्य लाभ का देणार नाही, याचे स्पष्टीकरण मागितले. त्यानुसार, उपशिक्षणाधिका-यांचे प्रतिज्ञापत्र पालिकेच्या वकिलांनी न्या. रवींद्र घुगे व न्या. अभय मंत्री यांच्या खंडपीठसमोर सादर केले. न्यायालयाने त्याबाबत नाराजी व्यक्त केली. भविष्यात चपराशाचे प्रतिज्ञापत्र सादर कराल. आम्ही आयुक्तांनाच प्रतिज्ञापत्र सादर करायला सांगू, अशी तंबी न्यायालयाने पालिकेला दिली. सातव्या वेतन आयोगानुसार पेन्शन व अन्य लाभ देण्यासाठी पालिकेकडे पैसे नाहीत. कारण राज्य सरकार पैसे देत नाही, असे पालिकेच्या वकिलांनी न्यायालयाला सांगितले. त्यावर लाडकी बहीण योजनेसाठी ४० हजार कोटी खर्च करत आहे. मग, पैसे कसे नाहीत? लाडकी बहीण योजनाच बंद केली पाहिजे, अशा शब्दांत नाराजी व्यक्त केली. सरकार असे का वागत आहे? असा सवाल करीत न्यायालयाने याबाबत राज्य सरकारला भूमिका स्पष्ट करण्यास सांगितले पाहिजे, असे मत व्यक्त केले. त्यावेळी पालिकेच्या वकिलांनी राज्य सरकारला या याचिकेत प्रतिवादी करावे असे मत व्यक्त केले.

### *आयुक्तांच्या गाडीसह अन्य गाड्या विका, पण निवृत्तीवेतन द्या!*

पालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांना सातव्या वेतन आयोगानुसार वेतन मिळते ना? त्यासाठी राज्य सरकारकडून पैसे येतात. फक्तशिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी पैसे नाहीत. आता आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याची वेळ आली आहे तरी, तुम्ही सातवा वेतन आयोग लागू करत नाही, अशा शब्दांत न्यायालयाने पालिका प्रशासनाला धारेवर धरले. कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन देण्यास पैसे नसतील तर महापालिका कार्यालयांतील टेबल, खुर्च्या, एसी विका. वाटल्यास पालिका आयुक्तांच्या गाडीसह अन्य गाड्या विका; पण कर्मचा-यांना त्यांच्या हक्काचे पैसे द्या, अशा शब्दांत न्यायालयाने पालिकेला फटकारले. न्यायालयाने अतिरिक्त आयुक्तांना याबाबत स्पष्टीकरण देण्यासाठी प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले.

# रुपाली चाकणकरांच्या बहिणीच्या अडचणी वाढल्या

## ◆ खरात प्रकरणात पोलिसांची नोटीस ◆

**मुंबई/प्रतिनिधी :** सध्या राज्यभरात अशोक खरात प्रकरण चांगलंच गाजत आहे. एका पीडित महिलेनं नाशिकचा भोंदू असलेल्या अशोक खरात याच्याविरोधात अत्याचाराची तक्रार दिली होती. या तक्रारीवरून पोलिसांनी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. दरम्यान त्यानंतर त्याचे एक -एक कारनामे समोर येण्यास सुरुवात झाली आहे. यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. आतापर्यंत त्याच्यावर महिला अत्याचार आणि फसवणुकीच्या प्रकरणात अनेक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणात एसआयटीची नियुक्ती करण्यात आली असून, एसआयटीकडून देखील त्याची चौकशी सुरू आहे. या प्रकरणात आता एक मोठी अपडेट समोर आली आहे.या प्रकरणाता आता रुपाली चाकणकर यांची बहीण प्रतिभा चाकणकर यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. प्रतिभा चाकणकर यांना शिर्डी पोलिसांनी नोटीस पाठवली आहे. भोंदू अशोक खरात प्रकरणात प्रतिभा चाकणकरांना आज शिर्डी पोलिसांनी नोटीस बजावली आहे. भोंदू अशोक खरात याच्या विरोधात शिर्डीमध्ये सावकारीचा गुन्हा दाखल आहे. या प्रकरणाचा तपास सुरू असताना पोलिसांना धक्कादायक माहिती मिळाली होती. समता पतसंस्थेत अनेक खाती अशी आहेत, जी वेगवेगळ्या व्यक्तींच्या नावावर आहेत, मात्र नामीनी स्वतः अशोक खरात हाच आहे. या खात्यांवरून कोट्यावधी रुपयांचे व्यवहार करण्यात आले आहेत.प्रतिभा चाकणकर यांच्या आणि त्यांच्या मुलाच्या नावेही समता पतसंस्थेत चार खाती आहेत. या सर्व खातेदारांचे जबाब घेण्याचं काम सध्या सुरू आहे. आत्तापर्यंत या प्रकरणात ३३ खातेदारांनी जबाब नोंदवले आहेत.









## अभिनेता रणवीर सिंग संघ मुख्यालयात

**नागपूर :** धुरंधर चित्रपटामुळे प्रसिद्धीच्या शिखरावर असलेला अभिनेता रणवीर सिंग शुक्रवारी नागपुरात पोहोचला. यावेळी त्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयाला भेट दिली आणि सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांची भेट घेतली. या भेटीत त्याने सरसंघचालकांशी विविध मुद्द्यांवर संवाद साधला. रणवीर सिंग सव्वा चार नागपुरात होता व त्याचा दौरा अतिशय गुप्त ठेवण्यात आला होता हे विशेष. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दुपारी चार वाजता रणवीर सिंगचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन झाले. त्याच्यासोबत आणखी चार जण होते.



# एलपीजी गॅसच्या वाटपात वाढ

**नवी दिल्ली :** इराण आणि अमेरिकेत या देशांमध्ये शस्त्रसंधीनंतर एलपीजी गॅस पुरवठ्याची स्थिती सुधारत आहे. त्यामुळे केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाने औद्योगिक वापरासाठी द्रवीकृत पेट्रोलियम वायू (एलपीजी) सातत्याने उपलब्ध राहावा यासाठी आदेश जारी केला आहे. त्यामुळे औद्योगिक क्षेत्राला एलपीजी गॅसचा पुरवठा वाढून त्यांची अडचण दूर होणार आहे. भारत सरकारमधील सर्व सचिव आणि सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव यांना पाठवलेल्या पत्रात नीरज मित्तल, सचिव, पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाने सांगितले की औषधनिर्मिती, अन्न प्रक्रिया, पालिमर, शेती, पॅकेजिंग, रंग, स्टील, धातू, सिरॅमिक, काच, एरोसोल, फाउंड्री, फोर्जिंग, जड पाणी, युरेनियम आणि बियाणे या क्षेत्रातील औद्योगिक युनिट्सना मार्च २०२६ पूर्वीच्या त्यांच्या मोठ्या प्रमाणातील एलपीजी वापराचा ७० टक्के पुरवठा केला जाईल, परंतु दररोज एकूण क्षेत्रीय मर्यादा ०.२ हजार टन राहील. १६ ते २७ मार्च दरम्यान झालेल्या संवादांवर आधारित, अतिरिक्त १० टक्के पुरवठा पाइप्ड नैसर्गिक वायू सुधारणा टप्प्यांशी जोडले गेले आहे. या उपाययोजनेमुळे एलपीजीचे समतोल वितरण सुनिश्चित होते, तसेच पर्यायी इंधन पायाभूत सुविधांकडे हळूहळू संक्रमण करण्यास मदत मिळते.

# तर संतोष देशमुख हत्येची केस मागे घ्या

## खिंडकरांचा मोठा दावा

**बीड :** जुना व्हिडीओ व्हायरल करुन खोट्या प्रकरणात आपल्याला फसवण्यात आलं, आपल्याला सोडण्यासाठी सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची तक्रार मागे घेण्याचा प्रस्ताव धनंजय देशमुखांसमोर ठेवण्यात आल्याचा दावा दादासाहेब खिंडकर यांनी केला. दादासाहेब खिंडकर यांनी एबीपी माझाशी संवाद साधताना मोठा दावा केला. मस्सागावचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांचे भाउ धनंजय देशमुखांचा साडू दादासाहेब खिंडकर हे १३ महिन्यांच्या कालावधीनंतर कारागृहाबाहेर आले. त्याचं फटाक्यांची आतषबाजी, पुष्पगुच्छ आणि ओवाळणी करत स्वागत करण्यात आलं. एका तरुणाला अमानुष मारहाण झाल्यानंतर त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. त्याच प्रकरणात पोलिसांनी कारवाई करत खिंडकर विरोधात गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर खिंडकर यांना तुरुंगात राहावं लागलं होतं.

# वृंदावनमध्ये दुर्घटना! यमुनेत भाविकांची बोट उलटली

# 10 जणांचा मृत्यू, अनेक जण बेपत्ता

**मथुरा/वृत्तसंस्था :** उत्तर प्रदेशातील मथुरा जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. वृंदावन येथे यमुना नदीत भाविकांनी भरलेली एक बोट उलटल्याने मोठी दुर्घटना घडली आहे. बोट उलटल्यानंतर त्यावरील अनेक भाविक नदीच्या पात्रात बुडू लागले. यामध्ये १० जणांचा मृत्यू झाला आहे. बोटीमध्ये २५ ते ३० भाविक असल्याचं म्हटलं जात आहे.



दुर्घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन आणि बचाव पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केलं. स्थानिक गोताखोरांच्या मदतीने पाण्यात बुडणा-या अनेक भाविकांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आलं आहे. मात्र अद्यापही काही लोक बेपत्ता असून त्यांचा शोध सुरू आहे. मृतांचा आकडा वाढल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, यमुनेच्या केशी घाटावर ही धक्कादायक घटना घडली. पंजाबमधील भाविकांनी भरलेली एक बोट पुलाला धडकल्यामुळे ही दुर्घटना घडली. या दुर्घटनेत १० भाविकांचा मृत्यू झाल्याचं म्हटलं आहे. सध्या बचावकार्य युद्धपातळीवर सुरू असून बेपत्ता लोकांचा शोध घेतला जात आहे.

**मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी घेतली दखल-** मथुरेतील या भीषण घटनेची मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी तातडीने दखल घेतली आहे. मुख्यमंत्र्यांनी वरिष्ठ अधिका-यांना तातडीने घटनास्थळी पोहोचून मदतकार्य वेगाने करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच मृतांच्या कुटुंबियांना योग्य ती आर्थिक मदत देण्याचे निर्देशही त्यांनी प्रशासनाला दिले आहेत.




# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, ११ एप्रिल २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## सत्ताधा-यांविरोधात विरोधकांचा रणसंग्राम; प्रतिकात्मक सभेत 'निर्णयांचा पाऊस'

### - १६ नगरसेवकांच्या निलंबनावरून संताप; - भ्रष्टाचार, निधी लूट आणि पत्रकारांवरील बंधनांचा मुद्दा ऐरणीवर

■ प्रतिनिधी | अकोला ■

*महापालिकेतील १६ नगरसेवकांच्या निलंबनाच्या निषेधार्थ विरोधी गटाने शुक्रवारी अधिकृत सभेला बहिष्कार टाकत स्वतंत्र प्रतिकात्मक सभा घेत सत्ताधाऱ्यांवर जोरदार हल्लाबोल केला. विरोधी पक्षनेत्याच्या कक्षासमोर पार पडलेल्या या सभेत सत्ताधारी गटाच्या कारभाराची उघडपणे खिल्ली उडवण्यात आली, तर भ्रष्टाचार, मनमानी आणि निधी वाटपातील भेदभावाचे गंभीर आरोप करण्यात आले.*



सत्ताधाऱ्यांच्या सभेपेक्षा विरोधकांच्या या प्रतिकात्मक सभेची शहरात अधिक चर्चा रंगली. या सभेत काँग्रेसच्या निलोफर खान यांची प्रतिकात्मक महापौर म्हणून, तर वंचित बहुजन आघाडीचे पराग गवई यांची उपमहापौर म्हणून निवड करण्यात आली. विरोधी पक्षनेते डॉ. जिशान हुसेन यांनी नगर सचिवाची भूमिका पार पाडत सभेचे संचालन केले. सभेच्या सुरुवातीलाच १६ नगरसेवकांचे निलंबन तात्काळ मागे घेण्याची मागणी करण्यात आली. हा ठराव प्रतिकात्मक महापौरांनी मंजूर करत सत्ताधाऱ्यांच्या निर्णयावर थेट आक्षेप नोंदवला. यानंतर विविध विषयांवर ठराव मंजूर करत विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला.

घरकुल योजनेत कंपनी नेमण्यामागे भ्रष्टाचाराचा डाव असल्याचा आरोप वंचितचे सुनिल इन्नाणी यांनी करत 'ही खिरापत वाटू देणार नाही' असा इशारा दिला. त्यानंतर निलेश देव यांनी संबंधित कंपनीला ब्लॅकलिस्ट करण्याची मागणी केली. यावर सभेतच 'शून्य कन्सलटन्सी'ला ब्लॅकलिस्ट करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली.

कचरा व्यवस्थापनाचा मुद्दा सभेत चांगलाच गाजला. नागरिकांकडून शुल्क आकारले जात असताना महापालिकेकडून दरमहा २७ लाख रुपये कंत्राटदाराला दिले जात असल्याचा आरोप करत ही सरळ लूट असल्याचे विरोधकांनी ठणकावले. कचरा घंटागाडी सेवा पूर्णपणे मोफत करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

निधी वाटपातील भेदभावावरही विरोधकांनी जोरदार टीका केली. 'निधी हा जनतेचा असतो, मग विरोधकांच्या प्रभागांना कमी निधी का?' असा सवाल उपस्थित करत, जर भेदभाव होत असेल तर विरोधी प्रभागांतील मालमत्ता कर कमी घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. पत्रकारांवर निर्बंध आणण्याच्या मुद्द्यावरही विरोधकांनी संताप व्यक्त केला. डॉ. जिशान हुसेन यांनी सत्ताधाऱ्यांवर आरोप करत सांगितले की, पत्रकारांना सभागृहात बसू न देण्याचा प्रस्ताव हा पारदर्शकता टाळण्याचा प्रयत्न आहे. 'सभागृहातील वास्तव नागरिकांसमोर येऊ नये म्हणून हा घाट घालण्यात आला,' असा आरोप त्यांनी केला. याउलट विरोधकांच्या सभेत पत्रकारांसाठी स्वतंत्र जागा ठेवण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एकूणच, या प्रतिकात्मक सभेतून विरोधकांनी आक्रमक भूमिका घेत सत्ताधाऱ्यांविरोधात उघड संघर्षाची नांदी केली असून महापालिकेतील राजकारण अधिक तापण्याची चिन्हे स्पष्ट झाली आहेत.

#### पत्रकारांनाच 'नो एन्ट्री'?

विरोधी गटाने पत्रकारांच्या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेतली. डॉ. जिशान हुसेन, निलेश देव, शाहिन अंजूम, आकाश कवडे, मुसा, पराग गवई यांनी पत्रकार हे लोकशाहीचे डोळे असल्याचे सांगत '२५ वर्षांत प्रथमच पत्रकारांसाठी जागा कमी पडली, हा योगायोग नसून नियोजनबद्ध डाव आहे,' असा आरोप केला. जागेअभावी सभा नियोजन भवनात घ्यावी, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

#### प्रतिकात्मक सभेत 'मनमानी'चा पर्दाफाश

या सभेत सत्ताधाऱ्यांच्या कामकाजाची शैली उपरोधिक पद्धतीने मांडण्यात आली. महापौर निर्णय घेण्यापूर्वी 'चिठ्ठी' दिली जाते, विरोध करणाऱ्यांना 'पडीत वॉर्ड' देण्याचे आमिष दाखवले जाते, अशा उदाहरणांद्वारे सत्ताधाऱ्यांच्या कारभारावर तिखट टीका करण्यात आली.



## विरोधकांचा वॉकआऊट; सत्ताधा-यांकडून सर्व विषयांना मंजुरीचा 'झटपट' फैसला

■ प्रतिनिधी | अकोला ■

### सभागृहात गोंधळ, खडाजंगी; विरोधक बाहेर पडताच निर्णय प्रक्रियेला वेग



महानगरपालिकेच्या शुक्रवारी झालेल्या सर्वसाधारण सभेला सुरुवातीपासूनच वादाचे वारे लागले. निलंबित नगरसेवकांना सभेत सहभागी करून घेण्याच्या मागणीवरून विरोधकांनी आक्रमक भूमिका घेत गोंधळ घातला. या मुद्द्यावर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी रंगली. मात्र, महापौरांनी ही मागणी फेटाळून लावताच संतप्त विरोधी पक्षाने सभागृहातून वॉकआऊट करत आपला निषेध नोंदविला.

विरोधकांच्या बहिष्कारानंतर सत्ताधाऱ्यांनी सभेचा कारभार झपाट्याने पुढे नेत चर्चेसाठी ठेवलेल्या पाचही विषयांना मंजुरी दिली. यामध्ये मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे तसेच आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी विविध विभागांच्या निधी नियोजनास हिरवा कंदील देण्यात आला. दरम्यान, 'हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान' राबविण्याबाबत शासन निर्णयावर चर्चा करून त्यास मान्यता देण्यात आली. तसेच 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.०' अंतर्गत अकोला शहराचा ओडीएफ++ दर्जा कायम ठेवण्यासाठी सामुदायिक शौचालयांची उभारणी व दुरुस्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला. या कामांसाठी सल्लागार नेमण्यालाही मंजुरी देण्यात आली.

शहरातील ओपन स्पेस, रस्ते, नाले आणि लेआउटची माहिती संकलित करून त्यांचा विकास आराखडा तयार करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमण्याचा प्रस्तावही मंजूर करण्यात आला. यावेळी स्वीकृत नगरसेवक गिरीश गोखले यांनी मनपाच्या शाळांना अद्ययावत करण्यासाठी शिक्षकांचे विशेष सेमिनार घेण्याचा प्रस्ताव मांडला. खाजगी शाळांच्या स्पर्धेत टिकण्यासाठी हा उपाय महत्त्वाचा ठरेल, असे त्यांनी नमूद केले. या सूचनेलाही सभेत सकारात्मक प्रतिसाद मिळाला. एकूणच, विरोधकांच्या वॉकआऊटनंतर सत्ताधाऱ्यांनी कोणताही अडथळा न येऊ देता सर्व विषयांना मंजुरी देत सभेचा 'एकतर्फी' कारभार उरकला, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

## कोटपा कायद्यांतर्गत कारवाई; ३६०० रुपयांचा दंड वसूल

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हा रुग्णालय वाशिमच्या वतीने तंबाखू नियंत्रण अंमलबजावणी पथकाने शहरातील विविध ठिकाणी धडक कारवाई केली. ही मोहीम जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे व अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. या कारवाईदरम्यान वाशिम शहरातील बस स्थानक, पोस्ट ऑफिस परिसर, पुसद नाका, हिंगोली नाका तसेच रेल्वे स्टेशन परिसरातील पानटपरी धारकांकडून कोटपा (२००३) कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित पान टपरी धारकावर दंडात्मक कारवाई करून एकूण ३ हजार ६०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. या मोहिमेत जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्षाचे जिल्हा सल्लागार डॉ. आदित्य पांढरकर, मानसशास्त्रज्ञ राम सरकटे, सामाजिक कार्यकर्ते रामकृष्ण धाडवे, मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हा समन्वयक मंगेश गायकवाड तसेच शहरी पोलिस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल संदीप शिंदे आणि विशाल इंगळे यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

## पातूर तालुक्यात प्रशासनावर दबावतंत्राचे सावट; कर्मचा-यांचा उत्साह खच्चीकरण

### सततच्या बदल्या, प्रभारी कारभारामुळे विकासकामांना ब्रेक

■ विशेष प्रतिनिधी ■

पातूर : पातूर तालुक्यातील शासकीय कार्यालयांमध्ये सध्या दबावतंत्र आणि अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले असून, त्याचा थेट परिणाम कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर होत आहे. लोकप्रतिनिधींच्या वाढत्या हस्तक्षेपामुळे अनेक कर्मचाऱ्यांवर मनमानी कामे करण्यासाठी दबाव टाकला जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. परिणामी, कर्मचाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात निरुत्साह पसरला आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, काही ठिकाणी कर्मचाऱ्यांना नियमबाह्य व खोटी कामे करण्यास भाग पाडले जात असून, नकार दिल्यास बदलीची भीती दाखवली जाते. या दबावामुळे कर्मचारी मानसिक तणावाखाली काम करत असल्याचे चित्र आहे.

#### नागरिकांमध्येही नाराजी

दरम्यान, पातूर पंचायत समितीत गटविकास अधिकाऱ्यांच्या पदावर गेल्या एका वर्षात तब्बल पाच ते सहा वेळा बदल करण्यात आले आहेत. अनेक वेळा प्रभारी अधिकाऱ्यांकडे जबाबदारी देण्यात आल्याने प्रशासनाचा गाडा विस्कळीत झाला आहे. या अस्थिरतेचा परिणाम विकासकामांवरही होत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. तसेच, पातूर नगरपरिषदेतही गेल्या दोन वर्षांपासून मुख्याधिकारी पदावर कायमस्वरूपी अधिकारी नियुक्त नसल्याने प्रभारी अधिकाऱ्यांवरच कारभार चालत आहे. त्यामुळे निर्णय प्रक्रियेत विलंब होत असून, नागरिकांना मूलभूत सेवा वेळेत मिळत नसल्याची तक्रार वाढत आहे.या सर्व पार्श्वभूमीवर पातूर तालुक्यात गटविकास अधिकारी व मुख्याधिकारी यांसारख्या महत्त्वाच्या पदांवर काम करण्यास अधिकारी पुढे येण्यास कचरत असल्याचे दिसून येत आहे. लोकप्रतिनिधींच्या दबावामुळे प्रशासनातील पारदर्शकता आणि कार्यक्षमता धोक्यात आल्याची भावना नागरिकांमध्येही व्यक्त होत आहे.

दरम्यान, संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या गंभीर परिस्थितीकडे तातडीने लक्ष देऊन प्रशासनात स्थैर्य आणावे, तसेच कर्मचाऱ्यांना निर्भयपणे काम करता येईल असे वातावरण निर्माण करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.


## रुग्णवाहिकेची आयशर ट्रकला धडक

■ प्रतिनिधी | कारंजा ■

नागपूर कॉरिडॉरवरील समृद्धी महामार्गावर आज (दि. १० एप्रिल २०२६) सकाळी सुमारे ८:१० वाजता भीषण अपघात घडला. झोपेची डुलकी आल्यामुळे रुग्णवाहिकेने समोर चालत असलेल्या आयशर ट्रकला जोरदार धडक दिली. प्राप्त माहितीनुसार, WB73 G9192 क्रमांकाची रुग्णवाहिका कोलकात्याहून आलेल्या रुग्णाला मुंबईत सोडून पुन्हा कोलकात्याकडे जात होती. दरम्यान, चॅनल क्रमांक १७६ वरही दुर्घटना घडली.

या अपघातात रुग्णवाहिका चालक अबी सरकार (वय ३६), बापी रॉय (वय ४१, रा. कोलकाता, पश्चिम बंगाल) आणि रवींद्र जाधव (वय ५०, रा. नाशिक) हे जखमी झाले असून त्यापैकी दोघांची प्रकृती गंभीर आहे, तर एक जण किरकोळ जखमी आहे. अपघात इतका भीषण होता की धडकेनंतर रुग्णवाहिकेला आग लागली. मात्र, सुदैवाने समृद्धी महामार्गावरील अग्निशामक दल तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्याने मोठा अनर्थ टळला. अन्यथा रुग्णवाहिकेतील सिलेंडरचा स्फोट होऊन भीषण आग लागण्याची शक्यता होती.

**मंगरुळपीर :** मंगरुळपीर तालुक्यातील वनोजा येथे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित आणि ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था, वनोजा यांच्या वतीने संचालित श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालयात दिनांक १० एप्रिल २०२६ रोजी राष्ट्रीय सेवा योजना (ऱ्एए) च्या वतीने डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पुण्यतिथीनिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली.



## आज डिजिटल विठ्ठल परिवार लोकार्पण आनंदोत्सव

**अकोला :** श्री विठ्ठल परिवार ट्रस्ट द्वारा आज दि ११ एप्रिल व १२ एप्रिल रोजी स्थानीय गोरक्षण रोड येथील शुभमंगल सभागृहात डिजिटल विठ्ठल परिवार भव्य लोकार्पण आनंदोत्सवचे आयोजन करण्यात आले आहे.आज शनिवार दि. ११ एप्रिल रोजी संध्याकाळी ५ वाजता सामुदायिक हरिपाठ होऊन संध्याकाळी ६ वाजता सामुदायिक विठ्ठल नामजप होऊन संचालन सहदेवराव शिंदे करतील.या सत्रातील दिप प्रज्वलन आणि प्रतिमा पुजन श्री विठ्ठलपरिवार अकोला शाखा प्रमुखांच्या हस्ते होईल.


**जाहीर नोटीस**

[illegible]

एम. जे. सी. नं. १३६/२०२६ — प्रोसेस नं. ३७६/२०२६

चौ.ता. ०६/०५/२०२६ — दिनांक : ०६/०४/२०२६

**अर्जदार :** १. लीलाबाई सोपान कुकडे वय ५६ वर्षे धंदा- घरकाम २. विठठल सोपान कुकडे वय ३७ वर्षे धंदा- वकील ३. निवृत्ती सोपान कुकड़े वय ३४ वर्षे, धंदा-मजुरी ४. गणेश सोपान कुकडे वय ३१ वर्षे, धंदा- मजुरी अर्जदार क. २ रा. सोनाई, तोषणीवाल ले आउट, मुर्तिजापुर रोड, अकोला, जि. अकोला अर्जदार क. १.२ व ४ रा. रानेगांव, पोस्ट वरूळ बु. ता. तेल्हारा, जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही.

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ ते ४ नुसार मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर तेल्हारा यांचे न्यायालय वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ ते ४ चे वडील मयत नामे सोपान प्रल्हाद कुकडे हे दि. ०३/०९/२०२५ रोजी मौजे दहिगांव, ता. तेल्हारा, जि. अकोला येथे मयत झालेले आहेत त्यामुळे अर्जदार हेच कायदेशीर वारस असून इतर कोणतेही वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुद्ध इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक ०६/०५/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ०६/०४/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का

**आदेशान**
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर, तेल्हारा


## अभियानातून समाजातील शेवटच्या घटकाला न्याय - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**अकोला :** लोकाभिमुख व पारदर्शी प्रशासनाची दिशा देणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा घेऊन सुरू करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकाला न्याय देण्याचे कार्य अखंडपणे होईल, असे प्रतिपादन राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

मुर्तीजापुर तालुक्यातील लक्षेश्वर संस्थान लाखपुरी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. आमदार रणधीर सावरकर, हरीश पिंपळे ,वसंत खंडेलवाल,माजी आमदार बळीराम सिरस्कार,लाखपूरी सरपंच राजू कैथवास, मुर्तिजापूर नगराध्यक्ष हर्षल साबळे,जिल्हाधिकारी वर्षा मीना, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे,उपजिल्हाधिकारी महसूल निखिल खेमनार,जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख भारती खंडेलवाल, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मुरलीधर इंगळे,उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार,तहसीलदार शिल्पा बोबडे आदी उपस्थित होते

श्री.बावनकुळे म्हणाले की, महाराजस्व अभियान शिबिराच्या माध्यमातून एकाच छताखाली शासनाच्या विविध योजना उपलब्ध करून देण्यात आल्या असून याचा प्रत्येकाने लाभ घेतला पाहिजे.अकोला जिल्ह्यात भूमी अभिलेख विभागाच्या मदतीसाठी १०० खाजगी सर्व्हेअर नियुक्त करण्यात येणार आहे. यामुळे शेती प्लॉट मोजणी जलद गतीने होणार आहे.मुख्यमंत्री बळीराजा पांदण रस्ते योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यातील शेत रस्ते टप्प्याटप्प्याने पूर्ण होणार असून दुतर्फा झाडे लावण्यात येणार आहेत.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १३४ ■ शनिवार, ११ एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मूल्य ३.०० रु.


# सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहांचा कायापालट होणार- सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट

## -समाज कल्याणच्या सर्व अभ्यासिका वातानुकूलित करणार

### सामाजिक न्याय विभागाच्या दोन वसतिगृहाचे भुमीपूजन

**वर्धा जनमाध्यम :** ग्रामीण भागातून मोठी स्वप्ने घेऊन शिक्षणासाठी शहरात येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जीवनमानात आमूलाग्र बदल घडवून आणण्याचा निर्धार राज्य सरकारने केला असून, सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहांचा लवकरच कायापालट होणार आहे. नव्याने उभारली जाणारी सर्व वसतिगृहे अत्याधुनिक असतील, तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी असलेल्या लायब्ररी व स्टडी रूम वातानुकूलित करण्यात येणार असल्याची माहिती सामाजिक न्यायमंत्री संजय सिरसाट यांनी दिली.

वर्धा शहरातील महादेवपूरा व नालवाडी येथे 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह' या दोन प्रकल्पांचे भूमिपूजन मंत्री शिरसाट व पालकमंत्री डॉ पंकज भोयर यांच्या हस्ते पार पडले. यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी, नगराध्यक्ष सुधीर पांगुळ,



समाज कल्याण उपायुक्त प्रसाद कुळकर्णी, सहाय्यक आयुक्त अंकेश केदार, जिल्हा समाज कल्याण अधिकारी प्रतिभा भागवतकर आदी उपस्थित होते.



मंत्री शिरसाट म्हणाले, विद्यार्थ्यांना दर्जेदार निवास व अभ्यासाच्या सुविधा देणे ही शासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे वसतिगृहांची क्षमता वाढविण्यासोबतच त्यांचा दर्जाही उंचावला जाणार आहे. प्रकल्पांच्या कामात पारदर्शकता व गती राखण्यासाठी आगाऊ निधी उपलब्ध करून दिला असून, कामात विलंब करणाऱ्या कंत्राटदारांवर थेट आर्थिक कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा उल्लेख करत मंत्री शिरसाट यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणातून प्रगती साधण्याचे आवाहन केले. शिक्षण हेच खरे सामर्थ्य आहे. त्याच्या जोरावर स्वतःचा आणि समाजाचा विकास घडवा, असे ते म्हणाले. येत्या मे महिन्यात विदर्भातील विविध वसतिगृहांच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करून उद्घाटने करण्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, पालकमंत्री डॉ. भोयर यांनी सांगितले की, महादेवपूरा व नालवाडी येथे प्रत्येकी २५० क्षमतेची भव्य वसतिगृहे उभारली जाणार असून, मागासवर्गीय विद्यार्थिनींच्या निवासाचा दीर्घकालीन प्रश्न मार्गी लागणार आहे. १९६७ पासून जुन्या व अपुऱ्या इमारतीत सुरू असलेल्या वसतिगृहांना आता नवसंजीवनी मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

वर्धा हे शैक्षणिक केंद्र म्हणून ओळखले जात असल्याने येथे विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन विद्यमान वसतिगृहांची क्षमताही वाढविण्याची मागणी यावेळी करण्यात आली. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक व नागरिकांची मोठी उपस्थिती होती.

# कापूस पेटला की पेटवला ? आगीमागे हात कोणाचा

## -देवळीत तीन दिवसांत दोन जिनिंग भस्मसात; लाखांचा माल खाक, करोडोंचे दावे; प्रशासन 'मूकदर्शक'

**वर्धा । जनमाध्यम :** जिल्ह्यात उन्हाळा सुरू झाला की जिनिंग-प्रेसिंग उद्योगात आगींची मालिका सुरू होते, हा आता केवळ योगायोग राहिलेला नाही, तर थेट संशयाचा धुरळा उडवणारी बाब ठरली आहे. देवळी परिसरात अवघ्या तीन दिवसांत दोन जिनिंगला लागलेल्या आगींनी लाखो रुपयांचा कापूस जळून खाक झाला. मात्र, या आगी अपघाती आहेत की नियोजित, याचा ठोस उलगडा करण्यात प्रशासन अपयशी ठरत आहे.



दरवर्षीप्रमाणे यंदाही 'शॉर्टसर्किट'चा जुना गजर वाजवला जातोय. पण प्रश्न असा की, ३१ मार्चपर्यंत सुरक्षित ठेवला जाणारा कापूस एप्रिल लागताच अचानक ज्वालाग्राही कसा होतो, हा नुसता योगायोग की आखलेला डाव स्थानिकांमध्ये आता उघड चर्चा सुरू आहे, काही ठिकाणी विमा रकमेच्या हव्यासापोटी मुद्दाम आग लावली जाते का ?

कापूस जळतो लाखांचा आणि दावा केला जातो करोडोंचा, या 'आकड्यांच्या खेळात'च मोठा घोटाळा दडलेला असल्याचा संशय व्यक्त होत आहे. विमा कंपन्यांकडून मोठमोठे दावे मंजूर होत असल्याने, या साखळीत कोणाचे 'हात' आहेत, याचा शोध घेणे अत्यंत गरजेचे बनले आहे. नाहीतर 'आगीचा उद्योग' असाच तेजीत राहणार, हे उघड आहे.

दरम्यान, महसूल विभाग, नगरपालिका आणि अग्निशमन यंत्रणा केवळ पंचनामे करून जबाबदारी झटकत असल्याचे चित्र आहे. ना सखोल तपास, ना दोषींवर कारवाई! सीसीटीव्ही फुटेज तपासणी, विद्युत यंत्रणेची पाहणी, विमा दाव्यांचे ऑडिट या सगळ्या गोष्टी फक्त कागदावरच का मर्यादित राहतात, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

देवळीतील सलग घटनांनी जिल्ह्यात खळबळ उडाली असताना प्रशासन मात्र 'झोपेचे सोंग' घेत असल्याचा आरोप होत आहे. आग लागली की पंचनामा, आणि मग सगळं शांत हा ठरलेला खेळच सुरू असल्याची चर्चा रंगली आहे.

कापसाच्या राखेतून उठणारा धूर केवळ आगीचा नाही, तो व्यवस्थेच्या निष्क्रियतेचा आणि संभाव्य 'विमा रॅकेट'चा जळता पुरावा आहे! आता तरी शासन जागे होणार का, की पुढच्या आगीची वाट पाहणार असा प्रश्न नागरिक विचारू लागला आहे,

# वर्ध्यात डिजिटल वीजबिल भरण्याला वेग; ६१% ग्राहक ऑनलाईनकडे

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यात डिजिटल व्यवहारांना मोठी चालना मिळत असून, महावितरणच्या २०२५-२६ आर्थिक वर्षातील आकडेवारीनुसार ६१.१० टक्के लघुदाब ग्राहकांनी ऑनलाईन वीजबिल भरण्याचा पर्याय स्वीकारला आहे. विशेष म्हणजे, एकूण महसुलापैकी ६७ टक्के रक्कम डिजिटल माध्यमातून जमा झाली आहे.

जिल्ह्यात वर्षभरात ३६ लाख ५२ हजार ४४८ व्यवहारांद्वारे ५४२.७४ कोटी रुपयांचा महसूल गोळा झाला. यापैकी २२ लाख ३१ हजार ६५७ व्यवहार ऑनलाईन पद्धतीने होऊन ३६३.६२ कोटी रुपये जमा झाले आहेत.



यामुळे पारंपरिक बिल भरणा केंद्रांवरील गर्दी कमी होत असून, केवळ ३८.९ टक्के ग्राहकांनीच ऑफलाईन पद्धतीचा वापर केला आहे. महावितरणाच्या www.mahadiscom.in संकेतस्थळ, 'महावितरण' ॲप आणि 'महापॉवर पे'सारख्या पर्यायांमुळे ग्राहकांना २४ तास घरबसल्या बिल भरण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. ऑनलाईन पेमेंटवर ०.२५ टक्के सवलत, वेळेवर भरणाऱ्यांसाठी अतिरिक्त लाभ आणि 'गो-ग्रीन' पर्यायांतर्गत वार्षिक सवलत देण्यात येते. डिजिटल पेमेंटमुळे वेळ, पैसा वाचतो आणि पर्यावरणाचे संरक्षणही होते.

अधिकाधिक ग्राहकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी केले आहे.

# बातम्यांचा 'राग' काढला रस्त्यावर; सेलूत पत्रकाराला बेदम मारहाण

## सहा जणांविरुद्ध गुन्हा; पोलिस ठाण्याजवळच धक्कादायक प्रकार

**सेलू । जनमाध्यम :** माझ्याविरोधात बातम्या का दिल्या या संतापातून पत्रकारावर भररस्त्यात हल्ला केल्याची धक्कादायक घटना सेलू येथे घडली. शुक्रवारी सकाळी दहा वाजताच्या सुमारास मेडिकल चौकात पत्रकार राजेश वरटकर यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यात आली. या प्रकरणी सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, घोराड येथील पत्रकार राजेश वरटकर यांनी स्थानिक देवस्थान कमेटी व कारभारावर टीका करणाऱ्या बातम्या सातत्याने प्रसिद्ध केल्या होत्या. याच कारणावरून माजी उपसरपंच व भाजप कार्यकर्ते रामेश्वर घंगारे यांनी गुरुवारी फोनवरून शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार वरटकर यांनी पोलिसांत केली होती.

या घटनेनंतर दुसऱ्याच दिवशी शुक्रवारी सकाळी वरटकर सेलूतील मेडिकल चौकात आले असता, रामेश्वर घंगारे व त्याच्या साथीदारांनी त्यांना अडवून मारहाण केली. अचानक झालेल्या या हल्ल्यात वरटकर जखमी झाले. विशेष म्हणजे ही घटना पोलिस ठाण्यापासून काही अंतरावरच घडल्याने कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

या प्रकरणी राजेश वरटकर यांच्या तक्रारीवरून सेलू पोलिसांनी जितेंद्र टेकाडे, रामेश्वर घंगारे, चिंतामण महाकाळकर, दर्शन घंगारे, गिरीधर बारई व अमर देवतारे यांच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

पत्रकारावर झालेल्या या हल्ल्यामुळे निषेधाची लाट उसळली असून, दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी पत्रकार संघटनांकडून होत आहे.

# खरगे प्रकरणी वर्ध्यात युवक काँग्रेसचे आंदोलन

## लोकशाही मूल्यांच्या संरक्षणाची मागणी

**वर्धा । जनमाध्यम :** आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा शर्मा यांनी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्याबाबत केलेल्या कथित वक्तव्याच्या निषेधार्थ तसेच काँग्रेस प्रवक्ते पवन खेरा यांच्यावरील कारवाईच्या पार्श्वभूमीवर वर्ध्यात युवक काँग्रेसतर्फे आंदोलन करण्यात आले.

१० एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे आंदोलन करत कार्यकर्त्यांनी



निवेदन सादर केले. महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेश सचिव अफजल बेरा यांच्या नेतृत्वात हे आंदोलन पार पडले.

निवेदनात संबंधित वक्तव्यावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात आली असून, अशा प्रकारच्या घटनांमुळे लोकशाही मूल्यांना धक्का बसत असल्याची भूमिका मांडण्यात आली. तसेच देशातील नागरिकांच्या संवैधानिक हक्कांचे संरक्षण करण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली.

या आंदोलनात अंकुश मुंजेवार, राहुल सुरकार, गोविंद दिघीकर, नंदकुमार कांबळे, शैला दीक्षित, श्रीकांत धोटे, अनिकेत दाते, पूर्णिमा मून, पराग पिंपळे यांसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, या आंदोलनातून युवक काँग्रेसने लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्यासाठी संघर्ष सुरूच ठेवण्याचा इशारा दिला आहे.

# पुलगाव भाजपात घरफोडीः शहराध्यक्षांना डावलून गटबाजीचा स्फोट

## भाजपातच अविश्वासाचे वादळ, काँग्रेसवर आरोप करताना 'घरचं भांडं' रस्त्यावर

**पुलगाव । जनमाध्यम :** पुलगाव शहरातील भारतीय जनता पक्षात सुरू असलेली अंतर्गत कुरघोडी आता उघड बंडखोरीत परिवर्तित झाली असून, पक्षात दोन तंबू पडल्याचे स्पष्ट झाले आहे. सत्ताधारी गट आणि संघटनात्मक नेतृत्व यांच्यातील संघर्ष आता लपून राहिलेला नसून, थेट रस्त्यावर आला आहे.



नगरसेवक दुर्गेश यादव आणि गटनेते प्रवीण पनिया यांनी काँग्रेसवर टीकेची झोड उठवत पत्रकार परिषद घेतली, मात्र या परिषदेत शहराध्यक्ष प्रशांत इंगोले यांची अनुपस्थिती राजकीय वर्तुळात खळबळ उडवणारी ठरली. पक्षाच्या प्रमुखालाच डावलून कार्यक्रम उरकला गेला, यावरून भाजपातील अंतर्गत विसंवाद उघड झाला आहे.


पक्षातीलच एका वरिष्ठ कार्यकर्त्याने नाव न जाहीर करण्याच्या अटीवर धक्कादायक माहिती दिली, या संपूर्ण प्रकरणाची कल्पनाच शहराध्यक्षांना देण्यात आली नव्हती. एवढेच नव्हे, तर जिल्हाधिकारी आणि पोलिस प्रशासनाकडे तक्रार करतानाही त्यांना विश्वासात घेतले गेले नाही. म्हणजेच, संघटनेलाच जाणीवपूर्वक बायपास करण्यात आले का, असा आरोप चर्चेत आहे.

या पार्श्वभूमीवर शहराध्यक्ष प्रशांत इंगोले यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी कोणतीही प्रतिक्रिया देणे टाळत मोबाईल बंद केला. त्यांच्या या मौनामुळे संशयाला आणखी खतपाणी मिळाले आहे.

दरम्यान, अलीकडे पार पडलेल्या प्रशिक्षण शिबिरात आमदार राजेश बकाने यांच्या समर्थकांची अनुपस्थितीही चर्चेचा विषय ठरली आहे. आमदारांनी स्वतःही कार्यक्रमाकडे पाठ फिरवल्याची चर्चा असून, पक्षातील गटबाजी आता उघडपणे दिसून येत आहे.

एकीकडे पक्षातच अविश्वास, मतभेद आणि आतील लढाई उसळलेली असताना, दुसरीकडे काँग्रेसवर आरोपांची सरबत्ती करणाऱ्या भाजपाची भूमिका कितपत टिकणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. घर पेटलंय आणि बाहेर धूर दाखवतोय अशीच अवस्था भाजपाची झाल्याची टीका विरोधक करत आहेत.

पुलगाव भाजपात आता संघर्ष टोकाला पोहोचला असून, ही केवळ कुरघोडी नाही तर उघड बंडखोरीची सुरुवात असल्याची चर्चा रंगली आहे. पुढे हा वाद किती भडकतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे,

# देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच होणार ‘ईव्हीएम’ची तपासणी



**मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश; 16 आणि 17 एप्रिल रोजी चाचणी**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात बारामती आणि राहुरी पोटनिवडणुकीची धामधूम सुरू आहे. तर इकडे देशातील निवडणुकीच्या इतिहासात पहिल्यांदाच ईव्हीएम तपासण्याचे आदेश हायकोर्टाने दिले आहेत. चांदिवली विधानसभा निवडणुकीतील ईव्हीएम तपासण्याचे आदेश देण्यात आले आहेत. काँग्रेसचे पराभूत उमेदवार नसीम खान यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यानंतर हा निकाल देण्यात आला.

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे उमेदवार दिलीप लांडे हे २०२४ मधील विधानसभा निवडणुकीत मुंबई उपनगरमधील चांदिवली मतदारसंघात शड्डू ठोकून होते. त्यांच्याविरोधात काँग्रेसचे दिग्गज उमेदवार नसीम खान होते. नसीम खान यांचा हा मतदारसंघ बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जात होता. पण या निवडणुकीत दिलीप लांडे यांनी नसीम खान यांचा पराभव केला. या निकालाविरोधात त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यांनी याप्रकरणी गडबड झाल्याची बाजू मांडली. न्यायालयाने त्यांचे मुद्दे लक्षात घेत, गुरुवारी ईव्हीएमची तपासणी आणि छाननी करण्यास परवानगी दिली आहे.

ईव्हीएम उत्पादक बंगळुरू येथील कंपनी भारत इलेक्ट्रानिक्स लिमिटेडकडून येत्या १६ आणि १७ एप्रिल रोजी मुंबईत ही चाचणी करण्यास परवानगी देण्यात आली आहे. याविषयीचे पत्र मुंबई उपनगर जिल्ह्याचे उप निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी नसीम खान यांना पाठवले आहे. त्यात याविषयीची माहिती देण्यात आली आहे. न्यायमूर्ती सोमशेखर सुंदरसेन यांनी हा निकाल दिला आहे.

**हा ऐतिहासिक निकाल**

२००९ आणि २०१४ च्या निवडणुकीत नसीम खान हे चांदिवली विधानसभा मतदारसंघातून आमदार झाले आहेत. पण त्यानंतर सलग दोनदा, २०१९ आणि २०२४ या निवडणुकीत दिलीप लांडे यांनी त्यांचा पराभव केला आहे. पण यावेळी नसीम खान यांनी या निकालाला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. त्यांनी निवडणूक याचिका दाखल केली होती. न्यायालयाचा निकाल हा ऐतिहासिक असल्याची प्रतिक्रिया नसीम खान यांनी दिली आहे. राहुल गांधी हे सातत्याने ईव्हीएमवर शंका उपस्थित करत असताना आणि पत्रकार परिषदेतून हल्लाबोल करत असताना या निकालामुळे विरोधकांना मोठा दिलासा दिल्याचे मानले जात आहे.

# सेक्स रॅकेटचा पर्दाफाश

## वेषांतर करून आल्या आणि केले स्टिंग



**नाशिक /प्रतिनिधी :** शहरातील एका नामांकित आयटी कंपनीमध्ये महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण तसेच त्यांचे धर्मांतर करण्याचा प्रयत्न झाल्याचे उघडकीस आल्याने अखखा महाराष्ट्र हादरला आहे. मल्टीनॅशनल कंपनीत काम करणाऱ्या तरूणींना चांगल्या करिअरचे स्वप्न दाखवत, त्यांच्याशी अश्लील वर्तन करण्यात आले, त्यांचे लैंगिक शोषण करण्यात आले, एवढेच नव्हे तर त्यांचे धर्मांतर करून विशिष्ट धर्माची संस्कृति लादण्याचा प्रयत्न केल्याचंही उघडकीस आले होते. त्या मुलींच्या कुटुंबियांसह अखखं राज्य हादरले. याप्रकरणात आता एक मोठी अपडेट समोर आली आहे.या संपूर्ण प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेउन पोलिसांन गोपनीय कारवाई देखील करण्यास सुरूवात केली. त्याअंतर्गतच एक धाडसी मोहीम राबवण्यात आली आणि संपूर्ण सेक्स रॅकेटचा पर्दाफाश करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, काही महिला अधिकाऱ्यांनी वेषांतर केले आणि त्या या कंपनीत दाखल झाल्या. या ऑपरेशनसाठी एकूण ७ महिला पोलिसांची स्पेशल टीम तैनात करण्यात आली होती. कंपनीत गेल्यावर त्या महिला पोलिसांनी मीटिंगदरम्यान, आरोपी हे अश्लील हावभाव करताना तसेच गैरवर्तन करताना दिसले. स्वत:च्या डोळ्यांनी हा प्रकार पाहिल्यावर महिला अधिकाऱ्यांनी हे सगळे हेरले आणि त्यांनी तातडीने, शिताफीने कारवाई करत या आरोपींना बेड्या ठोकल्याचे समोर आले आहे. याप्रकरणात ४० हून अधिक सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात आली तसेच ठोस पुरावे जमा करण्यात आले. डिजिटल आणि प्रत्यक्ष पुराव्यांच्या आधारे मोठी कारवाई यशस्वी झाली. नाशिक पोलिसांच्या धाडसी आणि अचूक ऑपरेशनमुळे या भयानक प्रकरणाचा अखेर भांडाफोड झाला आहे.

**अश्लील चाळे, गैरवर्तन आणि अटक-**नाशिकमध्ये घडलेल्या या आयटी जिहाद प्रकरणाची संपूर्ण राज्यात चर्चा सुरू आहे. या प्रकरणाचं गांभीर्य लक्षात आल्यावर पोलिसांनी एक ऑपरेशन राहवत आरोपींचा पर्दाफाश करण्याची योजना आखली. त्याअंतर्गत नाशिक पोलिसांनी ७ वरिष्ठ महिला अधिकाऱ्यांची टीम तयार केली. या कंपनीते असे अश्लील प्रकार, धर्मांतर सुरू असल्याची तक्रार काही महिलांनी पोलिस स्टेशनमध्ये जाउन दिली होती. मात्र हे समोर आल्यावर, यासंबंधी थेट तिथे जाउन कारवाई न करता पोलिसांन ७ महिला अधिकाऱ्यांची टीम तयार केली.

**९ महिलांनी केला गुन्हा दाखल-** साफटवेअर कंपनीत आपले काम असल्यांच सांगून या महिला अधिकारी तिथे, त्या कंपनीत गेल्या. आणि कंपनीतल कर्मचारी हे महिलांशी लगट करता, त्यांच्याशी अश्लील चाळे करतात, हे तिथे गेल्यानंतर वरिष्ठ महिला अधिकाऱ्यांच्या लक्षात आलं. त्यानंतर त्या महिला अधिकाऱ्यांनी तातडीने या लोकांना ताब्यात घेतले. आम्ही पोलिस आहोत, तुम्हाला आमच्यासोबत याव लागेल असें सांगत महिला पोलिस अधिकाऱ्यांनी त्या लोकांना बेड्या ठोकल्या. अत्यंत गुप्तपुणे नाशिक पोलिसांनी ही कारवाई करत ऑपरेशन राबवले. यानंतर ९ महिलांनी पुढे येउन गुन्हा दाखल केला.

**६ आरोपींना अटक, महिला एचआरचाही समावेश-** याप्रकरणात पोलिसांनी आतापर्यंत ६ आरोपींना अचक केली असून त्यामध्ये एका महिला एचआरचाही समावेश आहे. अनेक दिवसांपासून फरार असलेल्या, खाजगी कंपनीच्या एचआरला नाशिक पोलिसांनी पुण्यातून ताब्यात घेतले आहे. महिलांनी वारंवार कंपनीच्या एचआरकडे तक्रार करू नही तिने दुर्लक्ष केल्याने पोलिसांनी तिला सहआरोपी केलं आहे. यामुळे या प्रकरणात आणखी काही मोठे खुलासे होण्याची शक्यता आहे, आज या सर्व आरोपींना पुन्हा कोर्टात हजर केलं जाणार आहे.

# छत्तीसगडमधील भीषण अपघात; चिमुकल्यासह 6 जणांचा मृत्यू



**रायपूर/वृत्तसंस्था :** छत्तीसगडमधील कांकेर जिल्ह्यातील कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुरुवारी उशिरा रात्री नाथिया नवागावाजवळ दोन गाड्यांची समोरासमोर धडक झाली. या अपघातात सहा जणांचा जागीच मृत्यू झाला, तर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. कोतवाली पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. मृत कुटुंब कांकेरमधील उडकुडा येथील रहिवासी होते. सांगितले जात आहे की, सर्वजण चीवरांज येथे लग्न समारंभाला उपस्थित राहून आपल्या गावाकडे उडकुडाला परतत होते. त्यावेळी नाथिया नवागावाजवळ त्यांच्या गाडीची दुसऱ्या गाडीशी धडक झाली. दोन्ही गाड्या वेगात होत्या आणि धडक इतकी भीषण होती की वाहनांचे तुकडे तुकडे झाले.गाडीमधील एकाच कुटुंबातील ३ महिला, २ पुरुष आणि एका मुलाचा जागीच मृत्यू झाला. तर दुसऱ्या गाडीमधील ३ जण गंभीर जखमी झाले आहेत.घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन तात्काळ घटनास्थळी पोहोचले आणि जखमींना त्वरित रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. कांकेरचे पोलीस अधीक्षक निखिल राखेचा यांनीही घटनास्थळाची पाहणी केली. अपघातातील तिन्ही जखमींना तातडीने ॲम्ब्युलन्सच्या मदतीने जिल्हा रुग्णालय कांकेर येथे हलविण्यात आले. डाक्टरांच्या माहितीनुसार, सर्वांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर सतत लक्ष ठेवण्यात येत आहे. सध्या पोलीस संपूर्ण प्रकरणाची चौकशी करत असून अपघाताचे कारण शोधण्याचा प्रयत्न केला जात आहे.कांकेरचे पोलीस अधीक्षक निखिल राखेचा यांनी सांगितले की, नाथिया नवागावाजवळ दोन गाड्यांच्या धडकेत सहा जणांचा मृत्यू झाला असून तीन जण जखमी आहेत. पोलीस या प्रकरणाची चौकशी करत असून मृतांची ओळख पटवणे आणि इतर माहिती गोळा करण्याचे काम सुरू आहे. जखमींवर उपचार झाल्यानंतर त्यांच्याकडूनही माहिती घेतली जाणार आहे. मृतदेहांचा पंचनामा करून पोस्टमार्टमसाठी मार्चुरीमध्ये ठेवण्यात आले असून, पोस्टमार्टमनंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात येणार आहेत.

# गावोगावी हनुमान चालीसा पठण केंद्रांची गरज - प्रविण तोगडिया

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** हनुमान चालीसा पठण हे मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी उपयुक्त आहे. विशेष म्हणजे हिंदू समाजाच्या एकजुटीसाठी गावोगावी हनुमान चालीसा पठण केंद्र सुरू करण्याचा संकल्प आम्ही केला असून यात सर्वांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन आंतरराष्ट्रीय हिंदु परिषदेचे अध्यक्ष डा. प्रवीण तोगडीया यांनी केले.बजाज नगरातील हायटेक महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय हिंदु परिषद, राष्ट्रीय बजरंग दल देवगिरी प्रांत छत्रपती संभाजीनगर यांच्यावतीने सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भारतीय ग्रामीण पुनर्रचना संस्थेचे अध्यक्ष जे. के. जाधव, राष्ट्रीय बजरंग दल देवगिरी प्रांत अध्यक्ष सुभाष मोकरिया, प्राचार्य गोविंद ढगे, ए. आर. जाधव, विकास रेगे, डा. सुधीर वैद्य यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी तोगडीया यांनी हिंदू समाजातील जनजागृती, आरोग्य आणि एकजुटीचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी देशभर हिंदू समाजाच्या जनजागृतीसाठी दौरा सुरू केल्याचे सांगितले. तसेच कॅन्सर सर्जन म्हणून ४५ वर्षांचा अनुभव, राजस्थान, यूपी, बिहारमध्ये हजारो शस्त्रक्रिया केल्याचा उल्लेख करत समाजसेवेचा संदेश दिला. यावेळी त्यांनी हिंदू धर्माची विशालता, परंपरा, चार वेदांचे महत्त्व, तसेच पूर्वज आणि कुलदैवत यांची माहिती दिली. विज्ञान आणि सृष्टीच्या उत्पत्तीविषयीही त्यांनी मार्गदर्शन केले. समाजातील चांगल्या गुणांचे जतन आणि वाईट प्रवृत्तींचा त्याग करण्याचे आवाहन त्यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रा. कैलास अतकरे यांनी मानले. दरम्यान, सिडको महानगर येथे रवी शर्मा यांच्या समर्थ बिल्डस अँड डेव्हलपर्स कार्यालयाचा शुभारंभड?. तोगडीया यांच्या हस्ते करण्याब आला. यावेळी पं. स. उपसभापत बाळासाहेब गाडे, सरपंच सुनील काळे, उद्योजक कैलास भोकरे सचिन प्रधान, आण्णा कांडेक यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्य शेवटी समाजातील सर्व घटकांन एकत्र येउन गरजूंना मदत करावी भुकेल्यांना अन्न द्यावे आणि आरोग्यदायी व एकजूट समाज घडवावा, असा संदेश देण्यात आला यावेळी पोलीस प्रशासनाकडून तगड बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# होर्मुजमधील इराणच्या कर वसुलीवरून ट्रम्प यांनी व्यक्त केली नाराजी

**वॉशिंग्टन/वृत्तसंस्था :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणकडून होर्मुज जलडमरूमध्य मार्गे होणाऱ्या तेल वाहतुकीत अडथळे निर्माण केल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी म्हटले की, या प्रकरणात इराण अतिशय वाईट काम करत आहे आणि हे वर्तन अशोभनीय आहे.राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी सोशल मीडियावर लिहिले, इराण होर्मुज जलडमरूमधून तेल जाउ देण्याच्या बाबतीत अतिशय वाईट काम करत आहे. काही लोक याला अशोभनीय म्हणतील. हा तो करार नाही जो आपण केला होता. डोनाल्ड ट्रम्प यांची ही टिप्पणी तेल टँकरांकडून शुल्क आकारल्याच्या बातम्या समोर आल्यानंतर आली आहे. यापूर्वीही त्यांनी ट्विट करून म्हटले होते की, इराण होर्मुज जलडमरूमधून जाणाऱ्या टँकरांकडून शुल्क घेत असल्याच्या बातम्या आहेत. त्यांनी स्पष्ट केले, त्यांनी असे करू नये आणि जर करत असतील, तर त्वरित थांबवावे. व्हाईट हाउस ने सांगितले की, युद्धविराम कराराचा एक भाग म्हणून होर्मुज जलडमरूम पुन्हा सुरू करण्याला त्यांचा पाठिंबा आहे. मात्र, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प इराणच्या लष्करी दलाचा विरोध करतात, कारण ते अजूनही या जलमार्गावर नियंत्रण ठेवून जाणाऱ्या जहाजांकडून टोल वसूल करून महसूल वाढवण्याचा प्रयत्न करत आहेत. युद्धविरामाची घोषणा करत दोन्ही देश विजयाचा दावा करत असले, तरी इराण आणि अमेरिका एकमेकांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. इराणच्या अर्ध-सरकारी वृत्तसंस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, इराणी सैन्याने होर्मुज जलडमरूमध्ये बारूदी सुरंग (माइन्स) पेरल्या आहेत. हा मार्ग जागतिक तेल वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा असून, तेहरानने तो बंद केल्याचे सांगितले जाते. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी इशारा दिला आहे की, इराणने कराराचे पालन केले नाही, तर अमेरिकन सैन्य यापूर्वीपेक्षा अधिक कठोर कारवाई करेल.




# सुरुवातीच्या व्यवहारात अस्थिरते दरम्यान शेअर बाजारात तेजी; सेन्सेक्स-निफ्टीमध्ये वाढ

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पश्चिम आशियातील तणावावर शांततापूर्ण तोडगा काढण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा परिणाम देशांतर्गत शेअर बाजारावरही दिसून येत आहे. या प्रयत्नांमुळे आज सुरुवातीच्या व्यवहारात बाजारात तेजीचा कल दिसून आला. आजच्या व्यवहाराची सुरुवातही तेजीने झाली. बाजार उघडल्यानंतर, खरेदीदार आणि विक्रेते एकमेकांवर मात करण्याचा प्रयत्न करू लागले, ज्यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टी या दोन्ही निर्देशांकांच्या हालचालींमध्ये चढ-उतार दिसून आले. तथापि, आतापर्यंतच्या व्यवहारात खरेदीदारांचे पारडे जड असल्याचे दिसत आहे. सकाळी १० वाजेपर्यंत, सेन्सेक्स ०.९४ टक्क्यांनी आणि निफ्टी ०.९२ टक्क्यांनी वधारला होता.



सकाळी १० वाजेपर्यंत, शेअर बाजारातील दिग्गज कंपन्यांमध्ये श्रीराम फायनान्स, ॲक्सिस बँक, एशियन पेंट्स, जिओ फायनान्शियल आणि आयसीआयसीआय बँक यांचे शेअर्स २.७८ टक्के ते १.६९ टक्क्यांपर्यंतच्या वाढीसह व्यवहार करत होते. दुसरीकडे, सन फार्मास्युटिकल्स, इन्फोसिस, टीसीएस, टेक महिंद्रा आणि एचसीएल टेक्नालॉजीज यांचे शेअर्स २.९४ टक्के ते १.५३ टक्क्यांपर्यंतच्या तोट्यासह व्यवहार करत होते.आजपर्यंत, शेअर बाजारात २,६९३ शेअर्समध्ये सक्रिय व्यवहार सुरू होते. यापैकी २,४४१ शेअर्स नफ यात व्यवहार करत होते, तर २५२ शेअर्स तोट्यात व्यवहार करत होते. त्याचप्रमाणे, सेन्सेक्सच्या ३० शेअर्सपैकी २४ शेअर्स खरेदीच्या पाठिंब्यामुळे नफयात राहिले. दरम्यान, विक्रीच्या दबावामुळे सहा शेअर्स तोट्यात व्यवहार करत होते. निफटीच्या ५० शेअर्सपैकी ४१ शेअर्स नफयात व्यवहार करत होते, तर नउ शेअर्स तोट्यात व्यवहार करत होते.बीएसई सेन्सेक्स आज ४८९.३६ अंकांच्या वाढीसह ७७,१२१.०१ वर उघडला. व्यवहार सुरू होताच, खरेदीदार आणि विक्रेत्यांमध्ये रस्सीखेच सुरू झाली, ज्यामुळे निर्देशांकात चढ-उतार झाले. खरेदीच्या पाठिंब्यामुळे सेन्सेक्सने ७७,३६०.५१ चा उच्चांक गाठला. तथापि, विक्रीच्या दबावामुळे तो ७६,८५१.१६ पर्यंत घसरला. सततच्या खरेदी-विक्रीच्या दरम्यान, सकाळी १० वाजेपर्यंत सेन्सेक्स ७१७.३३ अंकांनी वाढून ७७,३४८.९८ वर व्यवहार करत होता.सेन्सेक्सप्रमाणेच, एनएसई निफटी आज १०५.४५ अंकांनी वाढून २३,८८०.५५ वर उघडला. बाजार उघडताच निर्देशांकात चढ-उतार सुरू झाले. खरेदीच्या पाठिंब्याने निफटीने २३,९९८.२५ चा उच्चांक गाठला. तथापि, विक्रीच्या दबावामुळे निर्देशांक २३,८५६.३५ च्या नीचांकी पातळीवर घसरला. सतत खरेदी-विक्री सुरू असताना, सकाळी १० वाजता निफटी २१९.४० अंकांच्या उच्चांकी पातळीवर २३,९९४.५० अंकांवर व्यवहार करत होता. मागील व्यवहाराच्या दिवशी, गुरुवारी, सेन्सेक्स ९३१.२५ अंकांनी किंवा १.२० टक्क्यांनी घसरून ७६,६३१.६५ अंकांवर बंद झाला होता. निफटी गुरुवारचा व्यवहार २२२.२५ अंकांनी किंवा ०.९३ टक्क्यांनी घसरून २३,७७५.१० अंकांवर संपला होता.

# महात्मा जोतीराव फुले यांच्या 200 व्या जयंतीनिमित्त राज्यात वर्षभर उपक्रम

## शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या पुढाकारातून शालेय शिक्षण विभागाचा व्यापक आराखडा जाहीर

**मुंबई/प्रतिनिधी :** महात्मा जोतीराव फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त सन २०२७ हे द्विशताब्दी वर्ष राज्यात उत्साहात साजरे करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या अनुषंगाने शालेय शिक्षण विभागामार्फत ११ एप्रिल २०२६ ते १० एप्रिल २०२७ या कालावधीत राज्यातील सर्व शाळांमध्ये विविध शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबविण्याचा व्यापक कृती आराखडा जाहीर करण्यात आला आहे. शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी नुकतेच एक पत्र लिहून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या अंतर्गतच्या उपक्रमांबाबत अवगत केले.



महात्मा फुले हे आधुनिक भारतातील सामाजिक क्रांतीचे अग्रदूत, थोर समाजसुधारक आणि शिक्षणतज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. त्यांनी जातीय विषमता, अंधश्रद्धा आणि शिक्षणावरील बंधने याविरुद्ध लढा देत सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून समता, सामाजिक न्याय आणि मानवी मुक्तीचा विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचवला. स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या फुले दांपत्याने शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन असल्याचे प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले. या पार्श्वभूमीवर, राज्य शासनाने फुले यांच्या जयंती द्विशताब्दी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये मूल्याधिष्ठित, समावेशक आणि कौशल्याधारित शिक्षणाची जाणीव निर्माण करण्यासाठी वर्षभर विविध उपक्रम आयोजित करण्याचे निर्देश दिले आहेत. ११ एप्रिल २०२६ रोजी सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये तसेच सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून या उपक्रमांची सुरुवात होणार आहे.

**व्याख्याने, वेबिनार, परिसंवाद आणि चर्चासत्रांचे आयोजन**

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय रुजवण्यासाठी महात्मा फुले यांच्या कार्यावरील पुस्तके उपलब्ध करून देण्यात येणार असून शाळांमध्ये वाचनालये ज्ञानकेंद्र म्हणून विकसित केली जाणार आहेत. तसेच त्यांच्या विचारांवर आधारित व्याख्याने, वेबिनार, परिसंवाद आणि चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. स्त्री शिक्षण, सामाजिक न्याय आणि समतेच्या विचारांचा प्रसार करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

शालेय स्तरावर पथनाट्य, एकपात्री नाटके, समता दौड, ग्रामभेट, पोस्टर स्पर्धा, निबंध स्पर्धा, विज्ञान उपक्रम, आयसीटी आधारित उपक्रम अशा विविध स्पर्धा व कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. ‘महात्मा फुले शैक्षणिक प्रेरणा सप्ताह’ साजरा करून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव आणि नेतृत्वगुण विकसित करण्याचा प्रयत्न होणार आहे. याशिवाय, #Phule200 या अभियानांतर्गत विद्यार्थ्यांनी साजऱ्या केलेल्या उपक्रमांचे फोटो, व्हिडिओ आणि साहित्य ऑनलाइन अपलोड करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत या सर्व कृती कार्यक्रमांचे आयोजन शाळांसाठी अनिवार्य राहणार असून विद्यार्थ्यांचा सहभाग ऐच्छिक असेल. महिनानिहाय आखलेल्या कृती आराखड्यानुसार एप्रिलमध्ये जनजागृती, जूनमध्ये पर्यावरण व जलसंवर्धन, जुलैमध्ये सामाजिक समता, ऑगस्टमध्ये समाजसेवा, सप्टेंबरमध्ये नवोपक्रम, ऑक्टोबरमध्ये स्त्री सक्षमीकरण, नोव्हेंबरमध्ये नेतृत्व व नागरिकत्व, डिसेंबरमध्ये सांस्कृतिक विकास, जानेवारीत संशोधन प्रकल्प, फेब्रुवारीत विविध स्पर्धा आणि मार्च २०२७ मध्ये समारोप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी शिक्षण आयुक्तांकडून दरमहा आढावा घेतला जाणार असून संबंधित यंत्रणांना नियोजन व नियंत्रणाची जबाबदारी देण्यात आली आहे. महात्मा फुले यांची २०० वी जयंती ही केवळ उत्सव नसून सामाजिक परिवर्तनाची संधी आहे. त्यांच्या विचारांचा प्रसार करत विद्यार्थ्यांमध्ये समता, शिक्षण आणि मानवता या मूल्यांची रुजवण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे प्रतिपादन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी यानिमित्ताने केले आहे.



# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## लवचिकता गरजेची?

पश्चिम आशियातील युद्धसंघर्षाच्या पार्श्वभूमीवर चालू आर्थिक वर्षातील रिझर्व्ह बँकेच्या द्विमासिक पतधोरण समितीची पहिली बैठक नुकतीच पार पडली. २८ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या या युद्धामुळे अवघ्या महिनाभरामध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अर्थकारणाचा सारीपाटच बदलून गेला आहे. याचे प्रतिबिंब पतधोरणात पडणे स्वाभाविक होते. त्यानुसार समितीने रेपो दर ५.२५ टक्क्यांवर कायम ठेवण्याचा निर्णय एकमताने घेतला. महागाई दराबाबत अनुमानही किंचित वाढवून ४.६ टक्के करण्यात आले आहे. मार्च महिन्याच्या मध्यावर झालेल्या अमेरिकन फेडरल रिझर्व्हच्या बैठकीमध्ये व्याज दर ३.५० टक्के ते ३.७५ टक्के यादरम्यान स्थिर ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता.सलग दुसऱ्यांदा ‘फेड’ने व्याज दर ‘जैसे थे’ ठेवण्याची भूमिका घेण्यामागे आखातातील तणावामुळे वाढलेल्या इंधनाच्या किमती आणि नवीन व्यापारी शुल्कांमुळे महागाईचे लक्ष्य साध्य करण्यात येणाऱ्या अडचणी ही दोन प्रमुख कारणे होती. हीच दोन्ही आव्हाने भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्यासह पतधोरण समितीपुढेही होती. गेल्या आर्थिक वर्षात आरबीआयने मौद्रिक धोरणात महत्त्वपूर्ण आणि धाडसी बदल घडवून आणत रेपो दरात १२५ अंकांची कपात केली होती. एप्रिल २०२५ मध्ये ६ टक्क्यांवर असणारा रेपो दर जून महिन्यात ५.५० टक्क्यांवर आणला गेला. त्यानंतर डिसेंबरमध्ये पुन्हा पाव टक्क्याची कपात करण्यात आली; पण फेब्रुवारीच्या बैठकीत दरांमध्ये कोणताच बदल केला नाही. अर्थव्यवस्थेला मिळालेली गती कायम राखता येईल आणि जागतिक अनिश्चिततेचा सामना करता येईल, ही यामागची भूमिका होती.बँकिंग प्रणालीमध्ये पुरेशी तरलता उपलब्ध करून देण्यासाठी गतवर्षी सीआरआरमध्ये १०० अंकांची मोठी कपात जाहीर केली होती. याद्वारे बँकिंग क्षेत्रात सुमारे २.५ लाख कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध झाला. या निर्णयामुळे बँकांचा निधीचा खर्च कमी होण्यास मदत झाली आणि पर्यायाने कर्ज दरांवरील दबाव कमी झाला. तथापि, यावेळी परिस्थिती पूर्णतः पालटली आहे. मध्य पूर्वेतील अस्थिरता आणि कच्च्या तेलाच्या किमतीत होणारी वाढ यांच्या परिणामांची संभाव्य तीव्रता लक्षात घेऊन आरबीआयने ‘सावध आणि संतुलित’ पवित्रा घेतला आहे. केंद्रीय मध्यवर्ती बँकांना नेहमीच महागाई आणि विकास यामध्ये संतुलन राखण्याची कसरत करावी लागते. रेपो दरात कपात केल्यास बाजारात तरलता वाढून चलनवाढीस हातभार लागण्याची शक्यता असते; तर वाढ केल्यास कर्जे महागतात. त्याचा परिणाम सर्वसामान्यांच्या खिशावर, बाजारातील मागणीवर आणि उद्योग-व्यवसायांच्या विस्तारावर होतो. या पार्श्वभूमीवर पतधोरण समितीचा ताजा निर्णय कर्जाचे हप्ते न वाढवणारा असल्याने मध्यमवर्गीयांसाठी दिलासादायक असला, तरी उद्योगांसाठी कर्जाचा खर्च कमी होण्याची प्रतीक्षा मात्र लांबली आहे. देशांतर्गत मागणी आणि गुंतवणुकीचा ओघ पाहता, भारतीय अर्थव्यवस्थेची स्थिती मजबूत असल्याचे सांगतानाच गव्हर्नरांनी आगामी काळातील संभाव्य धोक्यांचा केलेला ऊहापोह परिस्थितीचे गांभीर्य दर्शवणारा आहे. ऊर्जासुरक्षेवरील वाढता खर्च, आंतरराष्ट्रीय मालवाहतूक आणि विम्याचा वाढलेला खर्च, यामुळे उत्पादन खर्च वाढून त्याचा परिणाम एकूण विकासावर होऊ शकतो, ही बाब स्पष्ट आहे. अशा जागतिक धक्क्यांना तोंड देण्याची क्षमता देशात असल्याचा आशावाद आरबीआयने व्यक्त केला असला, तरी युद्धाची तीव्रता आणि कालावधी तसेच ऊर्जा पायाभूत सुविधांचे होणारे नुकसान यावरच पुढील आर्थिक चित्र अवलंबून असणार आहे. आयातीसाठीचे वाढीव बिल चुकवण्यासाठी भारताला अधिक डॉलरची गरज भासते. डॉलरची ही वाढती मागणी आणि बाजारातील त्याची घटती उपलब्धता, यामुळे रुपयाचे मूल्य दिवसेंदिवस खालावत चालले आहे. याच काळात परदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारातून काढता पाय घेतल्याने रुपया ऐतिहासिक नीचांकी पातळीवर आला आहे. एका वर्षात रुपयाचे मूल्य ११ टक्क्यांनी घसरणे हे भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने चिंताजनक आहे. या संकटावर मात करण्यासाठी आरबीआयचा हस्तक्षेप पुरेसा ठरणार नाही. भारतीय अर्थव्यवस्थेला जागतिक धक्क्यांपासून वाचवण्यासाठी आयातीवरील अवलंबित्व आणि डॉलरवरील भिस्त कमी करण्यासाठी ठोस पावले उचलावी लागतील. यासाठी रिझर्व्ह बँकेच्या मर्यादा ओळखून सरकारला व्यापक संरचनात्मक सुधारणांवर भर द्यावा लागेल. पुढील आर्थिक वर्षासाठी विकास दराचा अंदाज ६.९ टक्क्यांवर आणणे हे रिझर्व्ह बँकेने स्वीकारलेल्या वास्तववादाचे लक्षण आहे. अर्थव्यवस्थेला उत्तेजन देण्यासाठी सरकारकडून होणारे पायाभूत सुविधांमधील प्रयत्न आणि व्यावसायिक समुदायाचा कायम असलेला सकारात्मक दृष्टिकोन ही जमेची बाजू आहे. बँकिंग व्यवस्थेची कार्यक्षमता सुधारणे आणि पुरवठा साखळीतील अडथळे दूर करण्यासाठी सरकारने घेतलेले सक्रिय निर्णय, यामुळे महागाईला रोखण्यात काहीअंशी यश आले आहे. असे असले, तरी अन्नधान्य आणि इंधन दरांबाबतची अनिश्चितता कायम असल्याने पतधोरण समितीला आगामी काळात अधिक कडक पावले उचलावी लागतील का, हा प्रश्न कायम राहतो.पश्चिम आशियातील अनिश्चिततेचे ढग अद्याप पूर्णपणे सरलेले नाहीत. परदेशातून येणाऱ्या पैशांचा ओघ घटला आहे. अशा वातावरणात धोरणात्मक बदल करण्यापूर्वी अधिक स्पष्टतेची प्रतीक्षा करणे हे वित्तीय शहाणपण असून, मध्यवर्ती बँकेने नेहमीच ते दाखवले आहे. प्रतिकूल परिस्थितीत उद्योगजगताचा व्याज दर कपातीसाठीचा दबाव स्वाभाविक असला, तरी आरबीआय महागाई नियंत्रणाला नेहमी प्राधान्य देत आली आहे. कारण, त्याचा थेट परिणाम तळागाळातील शेवटच्या घटकावर होतो. रिझर्व्ह बँकेने कच्च्या तेलाचा दर प्रतिबॅरल ८५ डॉलर्स राहील, असे गृहीत धरले आहे. युद्ध पुन्हा भडकल्यास हा दर गगनाला भिडू शकतो. सध्याचे अंदाज कायम राहिले, तरीही संपूर्ण वर्षभर व्याज दरात कोणताही बदल होण्याची शक्यता कमी आहे. कारण, पतधोरण समितीचा मुख्य भर हा केवळ विकासावर नसून, तो शाश्वत आणि महागाईमुक्त विकासावर आहे. ‘अल निनो’च्या शक्यतेमुळे यंदा पाऊस शेतीसाठी पोषक न राहिल्यास अन्नधान्य महागाई वाढण्याची शक्यता आहे. जागतिक संघर्षाचे ढग अधिक गडद झाले, तर मात्र सरकारला अंतर्गत धोरणांमध्ये अधिक लवचिकता आणावी लागेल, याची जाणीव या धोरणाने करून दिली आहे.

# युद्ध विरामालाच विराम ?

**शस्त्रबंदीमुळे तेल आयातीवर अवलंबून असणारी भारतासारखी अनेक राष्ट्रे सुखावली. श्रेय कोणीही घ्या, पण युद्ध एकदाचे थांबू द्या, असा सूर गेल्या काही दिवसांपासून तेल आयातीला अवलंबित्व असणाऱ्या राष्ट्रांकडून उघडपणे आळविला जात होता. या युद्धाची जितकी किंमत युद्धामध्ये सहभागी असणाऱ्या अमेरिका, इस्त्रायल, इराण या तीन राष्ट्रांना मोजावी लागली नसेल, त्याहून अधिक किंमत तेल आयातदार राष्ट्रांना मोजावी लागली.**



अमेरिका आणि इराण यांच्यात १४ दिवसांकरिता युद्धविराम जाहीर झाला असला, तरी हा विराम क्षणिक ठरण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. कारण त्याला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची सातत्याने बदलणारी भूमिका व युद्ध लढविण्याची इराणची खुमखुमी यामुळे युद्धविराम फार काळ टिकणार नसल्याचे संकेत होते. अमेरिका आणि इराण यांच्यात झालेल्या युद्धविरामाला अवघा एक दिवस लोटत नाही, तोच या युद्धविरामाचे भवितव्य संकटात सापडले. दोन्ही देशांमध्ये पाकिस्तानमधील इस्लामाबाद येथे नियोजित असलेल्या शांतता चर्चेबाबतही अनिश्चितता निर्माण झाली. इराणचे पाकिस्तानमधील राजदूत अमिरी मोगदम यांनी इराणचे शिष्टमंडळ शांतता प्रस्थापित करण्यासाठीच्या चर्चेसाठी पाकिस्तानमध्ये येणार असल्याची माहिती एक्सवरील पोस्टमधून दिली होती. मात्र काही वेळातच त्यांनी ही पोस्ट हटवली. त्यामुळे पुन्हा युद्ध भडकण्याचे संकेत निर्माण झालेत. अमेरिका आणि इराणमध्ये सध्या दोन आठवड्यांचा युद्धविराम सुरू असतानाच, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी पुन्हा एकदा इराणला निर्वाणीचा इशारा दिला. दोन्ही देशांमध्ये अंतिम आणि ठोस करार होत नाही, तोपर्यंत अमेरिकेचे लष्करी बळ इराणच्या सीमांनजीक तैनात राहील. तोपर्यंत आमचे सैन्य माघारी फिरणार नाही, असे ट्रम्प यांनी स्पष्ट केले आहे. हा करार यशस्वी झाला नाही, तर इराणवर आतापर्यंतचा सर्वात मोठा हल्ला केला जाईल, अशी धमकीही त्यांनी दिली. त्यामुळे युद्धबंदीची घोषणा पुन्हा एकदा नामधारी ठरण्याची शक्यता असून विनाशकारी युद्ध अंतिम क्षणापर्यंत लढले जाणार असल्याचे चित्र निर्माण झाले.

अमेरिका-इस्त्रायल विरुद्ध इराण हा संघर्ष २८ फेब्रुवारीपासून सुरू आहे. बुधवारी १४ दिवसांकरता अमेरिका-इराण या दोन देशांमध्ये शस्त्रसंधी झाली. या शस्त्रसंधीला अमेरिकेचा युद्धातील मित्र इस्त्रायलने देखील संमती दिली. पाकिस्तानच्या मध्यस्थीने दोन आठवड्यांची शस्त्रसंधी झाल्याचे सांगण्यात आले. या शस्त्रबंदीमुळे तेल आयातीवर अवलंबून असणारी भारतासारखी अनेक राष्ट्रे सुखावली. श्रेय कोणीही घ्या, पण युद्ध एकदाचे थांबू द्या, असा सूर गेल्या काही दिवसांपासून तेल आयातीला अवलंबित्व असणाऱ्या राष्ट्रांकडून उघडपणे आळविला जात होता. या युद्धाची जितकी किंमत युद्धामध्ये सहभागी असणाऱ्या अमेरिका, इस्त्रायल, इराण या तीन राष्ट्रांना मोजावी लागली नसेल, त्याहून अधिक किमत तेल आयातदार राष्ट्रांना मोजावी लागली आहे. या राष्ट्रांमध्ये भारताचा अपवाद वगळता अन्य राष्ट्रांमध्ये महागाईचा आगडोंब उसळला आहे. ही युद्धबंदी प्रत्यक्षात येणार की केवळ कागदोपत्रीच घोषणा राहणार, यावर प्रश्नचिन्ह कायम आहे. इराण आणि अमेरिका यांच्यात शस्त्रसंधी होताच स्वतःची पाठ थोपटून घेणारा पाकिस्तान आता तोंडावर पडला आहे. युद्धबंदीच्या घोषणेनंतर अवघ्या काही तासांमध्ये इस्त्रायलने लेबनॉनवर हल्ले केले. मग इराणने यूएई, कुवेतला लक्ष्य केले. शस्त्रसंधीची घोषणा झाल्यावर २४ तासांच्या आत पुन्हा युद्धविषयक घडामोडी सुरूच राहिल्या, हल्ले होतच राहिले. यामुळे पाकिस्तानने घडवून आणलेल्या व छातीचा ढोल करत जगभर दवंडी पिटवलेल्या शस्त्रसंधीचे नेमके काय झाले, असा प्रश्न विचारला जाऊ लागला. पण लेबनॉन या शस्त्रसंधीचा भाग होता की नाही, यावरून सगळा घोळ झाला. मध्यस्थीचा दावा पाकिस्तानने केल्याने आता त्यांची गोची झाली. इस्त्रायलने त्यांचा शेजारी देश असलेल्या लेबनॉनवरील हल्ले सुरूच ठेवले. त्यामुळे पाकिस्तान तोंडावर आपटला.

शस्त्रसंधी सगळ्या ठिकाणी लागू आहे, त्यात लेबनॉनचाही समावेश असल्याचे पाकिस्तानचे पंतप्रधान शरीफ यांनी जाहीरपणे म्हटले होते. १० एप्रिलला इस्लामाबादमध्ये होत असलेल्या बैठकीत या सगळ्या मुद्द्यांवर शिक्कामोर्तब होईल, असा विश्वासही शरीफ यांनी व्यक्त केला. त्यांनी केलेला दावा आणि युद्धबंदीनंतरही सुरू असलेले हल्ले यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर संभ्रम निर्माण झाला. कारण शस्त्रसंधीसंदर्भात इस्त्रायल आणि अमेरिकेकडून करण्यात आलेली विधाने परस्परविरोधी आहेत. अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी वान्स यांनी शरीफ यांचा दावा स्पष्ट शब्दांत खोडून काढला.‘काहीतरी गैरसमजातून हा प्रकार घडला. लेबनॉनचा समावेश शस्त्रसंधीत असल्याचे इराणला वाटले असेल. पण आम्ही कधीही तसे आश्वासन दिलेले नाही. तसे संकेत देखील आम्ही कधी दिले नव्हते,’ असे अमेरिकेने स्पष्ट केल्याने पाकिस्तानच्या मध्यस्थीवर प्रश्न उपस्थित झाले. अमेरिकेने केलेला दावा खोटा असल्याचे पाकिस्तानचे म्हणणे आहे. इराणसोबत झालेल्या शस्त्रसंधीत लेबनॉनच्या मुद्द्याचा समावेश होता, असा दावा अमेरिकेतील पाकिस्तानचे राजदूत रिजवान सईद शेख यांनी केला. लेबनॉनचा विषय शस्त्रसंधीत नव्हताच, असा इस्त्रायलचाही दावा आहे. अमेरिका, इस्त्रायलने घेतलेल्या भूमिकेमुळे मध्यस्थीसाठी स्वतःची पाठ थोपटून घेणाऱ्या पाकिस्तानची आंतरराष्ट्रीय पातळीवर फजिती झाली. युद्ध सुरू झाल्यावर भारतासारख्या अनेक देशांमध्ये इंधन टंचाईचे सावट निर्माण झाले. अनेक उद्योगांवर परिणाम झाला. महाराष्ट्रामध्ये रोजगार-व्यवसायासाठी आलेले परराज्यातील मजूर, कर्मचारी आपल्या राज्यात निघून गेल्याने छोट्या व्यवसायांवर परिणाम झाला. किरकोळ खाद्यपदार्थांच्या गाड्या रस्त्यावरून गायब झाल्या. अनेक हॉटेल्समधील गॅसच्या टाक्या अदृश्य झाल्या. कोळशावर शेगड्या पेटविण्यात आल्या. इंधनाचे दर वाढल्यावर महागाईला पोषक वातावरण निर्माण होते. इंधनाचे दर उतरले तरी महागाई कमी होत नसल्याचा आजवरचा अनुभव आहे. इस्त्रायल आणि हिजबुल्ला यांच्यातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर इराणने पुन्हा एकदा आक्रमक पवित्रा घेतला. जगातील अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या ‘होर्मुझच्या सामुद्रधुनी’तून जाणाऱ्या प्रत्येक तेलवाहू जहाजाकडून आता इराण प्रति बॅरल १ डॉलर इतका ‘टोल’ वसूल करणार आहे. विशेष म्हणजे, हा कर क्रिप्टोकरन्सीच्या माध्यमातून भरावा लागणार. त्यामुळे भारताला महागड्या दराने तेल खरेदी करावे लागणार



## ममता सैरभैर का झाल्या?

माणिकचक (जिल्हा माल्डा, पश्चिम बंगाल ) येथील एका प्रचारसभेत राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आपले भाषण सुरू असताना, मध्येच थांबून समोर बसलेल्या लोकांना सांगितले की,‘तुम्ही तुमचे हात वर करा’.ममतांना जाणून घ्यायचे होते की सभेला उपस्थित असलेल्या सुमारे सहा हजार लोकांपैकी किती जणांची नावे एसआयआर (विशेष सखोल फेरतपासणी ) प्रक्रियेत मतदार याद्यांतून वगळली गेली आहेत.जेंव्हा लोकांनी हात वर केले तेव्हा,ममतांना मोठाच धक्का बसला.याचे कारण मुस्लिम बहुसंख्य असलेल्या माणिकचक येथील,त्या सभेला उपस्थित असलेल्या अर्ध्याहून अधिक लोकांनी आपले हात वर केले होते.(त्यांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली होती.) ते पाहून ममता क्षणभर स्तब्ध झाल्या.नंतर त्या म्हणाल्या,‘मग मतदान कोण करणार? हे सर्व अविश्वसनीय वाटल्याने,ममता, सभेला उपस्थित असलेल्या लोकांना म्हणाल्या की,ज्यांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत त्यांनी पुन्हा एकदा हात वर करा.मात्र त्यात काही फरक पडला नाही.जे फोटोग्राफर सभेचे चित्रीकरण करत होते, त्यांना ममता म्हणाल्या की याचे व्यवस्थित चित्रीकरण करा.ज्या ठिकाणी ममतांची सभा होती त्या माणिकचक मधील मुस्लीम समाजाची संख्या ५० टक्क्यांच्या आसपास आहे.२०२१ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसच्या उमेदवार सावित्री मित्रा या तेथून ३४ हजारांच्या मताधिक्याने निवडून आल्या होत्या.गेले अनेक दिवस ममता बॅनर्जी या भाजपा आणि निवडणूक आयोगावर टिका करत आहेत.पश्चिम बंगालमध्ये भाजपाचे सरकार स्थापन करण्यासाठी भाजपा आणि निवडणूक आयोग यांच्यात मिलीभगत असल्याचा आरोप,ममता वारंवार करत आहेत.ममतांना वाटणारी भीती समजण्यासारखी आहे.मुस्लिम समाजाची संख्या ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आहे (माणिकचक ) तेथे मतदार यादीतून मोठ्या प्रमाणात नावे वगळण्यात आल्याने,ममतांच्या मुस्लिम व्होट बँकेला तडा गेला आहे.त्यामुळे ममता अस्वस्थ झाल्या आहेत.ममतांनी आपल्या भाषणात निवडणूक आयोगाला सुनावले की,भाजपाचे एजंट या नात्याने काम करताना, तुम्ही लोकशाहीची विटंबना करत आहात.

माणिकचक पासून जवळच असलेल्या मोथाबारी येथे,आपली नावे मतदार यादीतून वगळण्यात आल्यामुळे, संतप्त झालेल्या लोकांनी तेथील गटविकास अधिकारी कार्यालयात न्यायिक अधिकाऱ्यांना कोंडून ठेवले होते.हे अधिकारी त्या कार्यालयात मतदार याद्यांतील संशयास्पद मतदारांची छाननी करत होते.संतप्त जमावाने त्या कार्यालयाला घेराव घालून न्यायिक अधिकाऱ्यांना आत कोंडून ठेवले होते.संध्याकाळी साडेपाच वाजता आपली ड्युटी संपल्यानंतर ते अधिकारी घरी जाण्यासाठी बाहेर पडत असताना, जमावाने त्यांना बाहेर पडू दिले नाही.शेवटी न्यायालयाने त्यात हस्तक्षेप केल्यानंतर मध्यरात्री त्यांची तेथून सुरक्षा व्यवस्थेत सूटका करण्यात आली.जवळ जवळ नऊ तास ते अधिकारी त्या कार्यालयात अन्नपाण्यावाचून बसून राहिले होते.त्यानंतर जेंव्हा त्यांना तेथून बाहेर काढण्यात आले तेंव्हा आंदोलकांनी त्या अधिकाऱ्यांच्या गाड्यांवर हल्ला केला,त्यांचा रस्ता रोखून धरला.अखेर सुरक्षारक्षकांच्या संरक्षणात त्यांना सुरक्षित स्थळी नेण्यात आले.सर्वोच्च न्यायालयाने या सर्व घटनेवर कठोर शब्दांत भाष्य केले.पोलिसांच्या निष्क्रियतेवर सर्वोच्च न्यायालयाने कठोर शब्दांत ताशेरे ओढले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी या घटनेची जबाबदारी भाजपावर टाकली.कायदा आणि सुव्यवस्था राखणारी यंत्रणा आता माझ्या हातात नसून ती निवडणूक आयोगाच्या नियंत्रणाखाली आहे, असे सांगून ममतांनी आपली जबाबदारी झटकली.आपण भाजपाला पश्चिम बंगाल मधून हद्दपार करू आणि नंतर दिल्ली मधूनही भाजपाची उचलबांगडी करू अशी दर्पोक्ती करायला त्या विसरल्या नाहीत.

पश्चिम बंगालमध्ये एसआयआर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मतदार यादीतून सुमारे ९१ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत.त्यापैकी ५७ टक्के मतदार हे बांगलादेशच्या सीमेला लागून असलेल्या (पश्चिम बंगाल मधील ) दहा जिल्ह्यांतील आहेत.त्यापैकी ७० टक्के मतदार हे मुस्लिम आहेत.हे दहा जिल्हे आहेत,कुचबिहार,जलपैगुडी, दार्जिलिंग, उत्तर आणि दक्षिण दिनाजपूर,माल्डा, मुर्शिदाबाद,नडिया आणि दक्षिण व उत्तर २४ परगणा.या दहा जिल्ह्यांतून वगळलेल्या ( मतदार यादीतून ) मतदारांची संख्या आहे,५२.२४ लाख.याचा अर्थ असा होतो की या दहा जिल्ह्यांतील बरेच मतदार, निवडणूक आयोगाने मागितलेले पेपर्स ( पुरावे )आयोगाला व्यवस्थितपणे सादर करु शकलेले नाहीत.या ठिकाणी ही गोष्ट प्रकर्षाने लक्षात घ्यायला हवी की गेली अनेक वर्षे बांगलादेशातून पश्चिम बंगाल मध्ये घुसखोरी केलेल्या लोकांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे इतकी वर्षे मतदानात भाग घेतला होता.एसआयआर प्रक्रियेत हे लोक अस्सल कागदपत्रे सादर करु न शकल्याने त्यांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली असावीत.हे घुसखोर प्रामुख्याने बांगलादेशला लागून असलेल्या पश्चिम बंगालच्या सीमेजवळील वरील दहा जिल्ह्यांत वास्तव्य करत असावेत.त्यामुळेच एसआयआर प्रक्रियेत या दहा जिल्ह्यांतील सर्वात जास्त नावे मतदार यादीतून वगळण्यात आली असावीत.

तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांच्यासाठी चिंता वाढवणारी बाब म्हणजे या दहा जिल्ह्यांत २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसने उत्तम कामगिरी केली होती.२०२१ च्या विधानसभा निवडणुकीत या जिल्ह्यांमध्ये येणाऱ्या विधानसभेच्या एकूण १५१ जागांपैकी ११० जागा तृणमूल काँग्रेसने जिंकल्या होत्या.तर भाजपाने ४१ जागा जिंकल्या होत्या.२०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसच्या उमेदवारांनी ९१ विधानसभा क्षेत्रांत आघाडी मिळवली होती.तर भाजपाने ४८ विधानसभा क्षेत्रांत आघाडी घेतली होती.हे दहा जिल्हे २०११ पासून तृणमूल काँग्रेसचे बालेकिल्ले राहिले आहेत.कारण या दहा जिल्ह्यांत मुस्लिम समाजाची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.मात्र एसआयआर प्रक्रियेनंतर तृणमूल काँग्रेसचे मोठे नुकसान होणार आहे.कारण मतदार याद्यांतून या दहा जिल्ह्यांतील जे मतदार वगळले गेले आहेत, त्यातील ७० टक्के मतदार हे मुस्लिम आहेत.हे मुस्लिम मतदार नेहमीच ममतांच्या तृणमूल काँग्रेसला मोठ्या प्रमाणात मतदान करत असल्याने या दहा जिल्ह्यांतील निवडणुकीचे समीकरण आता पूर्णपणे बदलण्याची शक्यता आहे.तृणमूल काँग्रेसला आता या दहा जिल्ह्यांत पुर्वी सारखे भव्यदिव्य यश मिळणार नाही.त्याचा परिणाम म्हणजे गेल्या खेपेच्या तुलनेत या खेपेस तृणमूल काँग्रेसला एकंदरीतरित्या कमी जागा मिळतील,ही वस्तुस्थिती लक्षात आल्यानेच ममता सैरभैर झाल्या आहेत.

**अभय गोखले**

## मानसिक शांततेसाठी नामजप

आजच्या काळात आपण सतत तणावाखाली असतो. यामुळे मन भरकटते आणि अस्वस्थता वाढते. नामजपामुळे मनाची चंचलता कमी होऊन एकाग्रता वाढण्यास मदत होते. हे एका प्रकारच्या ध्यानासारखेच काम करते.दैनंदिन कामाचा व्याप, स्पर्धा आणि चिंता यामुळे येणारा ताण कमी करण्यासाठी नामजप हा सर्वात सोपा मार्ग आहे. जेव्हा आपण नाम घेतो, तेव्हा मेंदूतील ‘हॅपी हार्मोन्स’ उत्तेजित होतात, ज्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहण्यास आणि मन शांत होण्यास मदत होते.अध्यात्म आणि मानसशास्त्र या दोन्ही दृष्टिकोनातून नामजप हे मनावर नियंत्रण मिळवण्याचे एक उत्तम साधन मानले जाते.आपले मन सतत हजारो विचारांच्या मागे धावत असते. नामजप केल्याने मनाला एकच केंद्रबिंदू मिळतो, ज्यामुळे अनावश्यक आणि नकारात्मक विचारांची साखळी खंडित होण्यास मदत होते.जेव्हा आपण एकाच नामाचा वारंवार उच्चार करतो, तेव्हा मनाची विखुरलेली शक्ती एकत्रित होते. याचा थेट परिणाम आपल्या कार्यक्षमतेवर आणि एकाग्रतेवर होतो.नामजपामुळे शरीरातील मज्जासंस्था शांत होते. संशोधनानुसार, लयबद्ध पद्धतीने केलेले नामस्मरण हृदयाचे ठोके आणि रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करते, ज्यामुळे मानसिक दडपण कमी होते.संकटकाळात किंवा भीती वाटत असताना नामस्मरण केल्याने मनाला आंतरिक शक्ती मिळते.

**वर्षा आवदे**

## बालकांच्या कर्करोगाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज

जागतिक पातळीवरील ‘द लॅन्सेट’ या वैद्यकीय नियतकालिकामध्ये प्रकाशित झालेल्या ‘ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज (जीबीडी) २०२३’ या अहवालानुसार भारतात मुलांमधील कर्करोग हे बाल मृत्यूच्या प्रमुख कारणांपैकी दहावे कारण ठरले असून २०२३ मध्ये यामुळे सुमारे १७ हजार बालकांचा मृत्यू झाला आहे. ‘द लॅन्सेट’च्या अहवालानुसार २०२३ मध्ये जगभरात बाल कर्करोगाची ३ लाख ७७ हजार प्रकरणे नोंदवली गेली आणि १ लाख ४४ हजार मृत्यू झाले. त्यापैकी २०.५ टक्क्यांपेक्षा जास्त मृत्यू एकट्या दक्षिण आशियामध्ये झाले आहेत. कर्करोगाचे उशिरा झालेले निदान, योग्य औषधोपचारांची कमी उपलब्धता आणि आरोग्यसेवेची अपुरी पायाभूत सुविधा अशा कारणांमुळे दक्षिण आशियामध्ये कर्करोगामुळे होणाऱ्या बालमृत्यूचे प्रमाण वाढले आहे. बालकांच्या कर्करोगाकडे गांभीर्याने लक्ष देण्यासाठी विशेष धोरणाची आवश्यकता असून त्यासाठी भारताच्या राष्ट्रीय कर्करोग नियंत्रण नियोजनात आणि राष्ट्रीय तपासणी कार्यक्रमात बाल कर्करोगाचा समावेश करणे, विशेष बालरोग कर्करोग केंद्रे स्थापन करणे आणि बाल कर्करोगाचा दीर्घकालीन पाठपुरावा कार्यक्रमाची गरज कर्करोग तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.


**- प्रदीप मोरे**

# सावरगड कचरा डेपोला भीषण आग !

## अंदाजे २ कोटींचे नुकसान, जबाबदार कोण ? प्रशासनाच्या निष्क्रियतेवर प्रश्नचिन्ह

**जनमाध्यम प्रतिनिधी**






यवतमाळ - आज सकाळी सुमारे ९:४५ वाजता नगरपरिषदेकडील सावरगड येथील घनकचरा डेपोला भीषण आग लागून संपूर्ण परिसर धगधगत आहे.बाजूच्या शेतकऱ्याने शेतातील धुऱ्याला लावलेल्या आगेतून हा वनवा पसरत कचरा डेपोपर्यंत पोहोचल्याने काही क्षणांतच आगीने विकराळ रूप धारण केले. या आगीत कचरा वर्गीकरणासाठी वापरण्यात येणारी अत्याधुनिक 'सेग्रिगेशन' मशीन पूर्णतः जळून खाक झाली असून दोन मोबाईल शौचालय गाड्याही भस्मसात झाल्या आहेत. संबंधित कर्मचाऱ्यांच्या माहितीनुसार, जळालेल्या मशीनची किंमत सुमारे १ कोटी रुपये असून एकूण नुकसान अंदाजे दीड ते दोन कोटी रुपयांच्या घरात असल्याचे समजते.

घटनास्थळी आग नियंत्रणासाठी यवतमाळसह घाटंजी, राळेगाव आणि कळंब येथून अग्निशमन दलाची वाहने पाचारण करण्यात आली. वाहनचालक विपिन रहांगडाले, राहुल यादव, मनीष पवार तसेच फायरमन निलेश भिसे, निखिल पाठक, रवी चौधरी, हेमंत डोंगरे आदींनी सकाळपासून आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू ठेवले आहेत. मात्र, सायंकाळ पर्यंत ही आग पूर्णपणे आटोक्यात आलेली नव्हती. आग अत्यंत भीषण असल्याने जवळपास दोन दिवस आग नियंत्रण मिळण्याकरिता लागणार असल्याची माहिती अग्निशमन दलाने दिली. विशेष म्हणजे, इतक्या मोठ्या दुर्घटने नंतर ही नगरपरिषदेचे मुख्याधिकारी आणि नगराध्यक्ष यांनी घटनास्थळी भेट न दिल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. प्रशासनाच्या या दुर्लक्षामुळेच नुकसान वाढल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे. सावरगड येथील हा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प तब्बल १७ एकर क्षेत्रावर उभारण्यात आला असून त्यात ओला कचरा प्रकल्प (६५ टीपीडी), एमआरएफ शेड, सॅनिटरी व धोकादायक कचरा व्यवस्थापन, वैज्ञानिक लँडफिल, एफएसटीपी प्रकल्प, बेल्ट कन्व्हेअर, श्रेडर मशीन यांसारख्या अत्याधुनिक सुविधा आहेत. अशा महत्त्वाच्या प्रकल्पात अग्निसुरक्षेची प्रभावी यंत्रणा का नव्हती, हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या घटनेमुळे अनेक प्रश्न अनुत्तरित राहत आहे. कचरा डेपो परिसरात अग्निरोधक उपाययोजना का नव्हत्या? शेतातील आगीवर नियंत्रण ठेवण्यात अपयश का आले? कोट्यवधींच्या प्रकल्पाचे संरक्षण करण्याची जबाबदारी कोणाची? दुर्घटनेनंतरही वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी का पोहोचले नाहीत? ही घटना केवळ अपघात नसून प्रशासनाच्या हलगर्जीपणाचे द्योतक असल्याची भावना नागरिकांमध्ये तीव्र होत आहे. शासनाने तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना राबवाव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.

# अज्ञात तरुणाचा रक्तरंजित क्रूर खून

## पोलिसांना आरोपींचा शोध

**जनमाध्यम प्रतिनिधी**




यवतमाळ - नागपूर-धामणगाव बायपास जवळील वेनिशियल पार्क परिसरात सापडलेल्या अज्ञात तरुणाच्या निर्घृण खुनाने शहराच्या सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. २५ ते ३० वर्षीय तरुणाचा छिन्नविछिन्न मृतदेह खड्ड्यात टाकून दिलेल्या अवस्थेत आढळून आल्याने ही केवळ हत्या नसून क्रूरतेची परिसीमा गाठणारी घटना असल्याचे स्पष्ट झाले आहे.मृतदेहा वरील जखमांचे स्वरूप पाहता आरोपींनी अत्यंत अमानुषपणे धारदार शस्त्राने वार करत खून केल्याची माहिती पोलिस निरीक्षक रामचंद्र जाधव यांनी दिली आहे. पाठीवर, मानेवर, डोक्यावर घाव, डाव्या हाताचा पंजा गायब आणि कवटी विद्रूप अवस्थेत या सर्व बाबी सूचित करतात की हा खून केवळ वैयक्तिक वैरातून नव्हे, तर नियोजनपूर्वक आणि निर्दयतेने करण्यात आला असावा.

सर्वात गंभीर बाब म्हणजे, इतक्या क्रूर हत्ये नंतर ही मृतकाची ओळख पटलेली नाही आणि आरोपींचा माग काढण्यात पोलिसांना अद्याप यश आलेले नाही. शहरातील मुख्य बायपास मार्गावर अशी घटना घडणे आणि गुन्हेगारांचा कोणताही ठोस ठसा न सापडणे, ही कायदा-सुव्यवस्थे साठी धोक्याची घंटा आहे.घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस, स्थानिक गुन्हे शाखा आणि फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळी धाव घेतली. रक्ताचे नमुने, पुरावे गोळा करण्यात आले असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू आहे. मात्र, या गंभीर घटने नंतरही पोलिस तपासाची गती दिसून येत आहे. दरम्यान,शहर पोलीस कॉन्स्टेबल पवन तडसे यांच्या जबानी नुसार, सकाळी पेट्रोलिंग दरम्यान एका अनोळखी व्यक्तीकडून माहिती मिळाल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. म्हणजेच, इतका भयानक खून करून मृतदेह उघड्यावर टाकण्यात आला आणि तो बराच वेळ कुणाच्याही लक्षात आला नाही, ही बाब तितकीच चिंताजनक आहे. या घटनेमुळे यवतमाळ शहरात भीतीचे सावट पसरले असून नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना तीव्र झाली आहे. गुन्हेगारांना तातडीने अटक करून या प्रकरणाचा छडा लावणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान आहे. अन्यथा, अशा घटना वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यवतमाळ मध्ये वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यात पोलीस यंत्रणा कमी पडतेय का? बायपास सारख्या महत्त्वाच्या मार्गावर अशी निर्घृण हत्या होऊनही आरोपी मोकाट फिरत असतील, तर सामान्य नागरिकांनी सुरक्षितता कोणावर हा खरा प्रश्न निर्माण झाला आहे.

## वेचक

### भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे
### महागावात स्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त भक्तिमय सोहळा महानैवेद्य आरती



महागाव - येथे श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त ९ एप्रिल ते १५ एप्रिल २०२६ या कालावधीत भव्य धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून संपूर्ण परिसरात सध्या भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. स्वामी समर्थ सेवा केंद्र दिंडोरी प्रणित महागाव केंद्र यांच्या वतीने आयोजित या सोहळ्यात दररोज विविध धार्मिक कार्यक्रम पार पडत आहेत. सकाळी ८ वाजता भूपाळी आरती, सकाळी १०.३० वाजता महानैवेद्य आरती आणि सायंकाळी ६.३० वाजता सायंआरती असा नियमित कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. गुरुवार, ९ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता महानैवेद्य आरती सौ. सुजाता सुधीर पोदुटवार यांच्या हस्ते संपन्न झाली, यावेळी भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदविला. यासोबतच स्वामी चरित्र पारायण, महाप्रसाद वितरण व विविध आध्यात्मिक उपक्रमांमुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघत आहे. या सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी तालुक्यातील तसेच परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सेवेकरी मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. एकोणिसाव्या शतकातील दत्तसंप्रदायातील महान संत म्हणून ओळखले जाणारे श्री स्वामी समर्थ महाराज यांना भगवान दत्तात्रयांचा तिसरा पूर्ण अवतार मानले जाते. अक्कलकोट येथे दीर्घकाळ वास्तव्य करून त्यांनी भक्तांना मार्गदर्शन केले. "भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे" हा त्यांचा अभयमंत्र आजही भक्तांच्या जीवनाला प्रेरणा देत असून त्यांच्या कृपेमुळे भक्तांच्या जीवनात नवे बळ निर्माण होत असल्याची भावना व्यक्त केली जाते. या पुण्यतिथी सोहळ्याच्या निमित्ताने महागावातील पुसद रोडवरील केंद्रात दररोज भक्ती, सेवा आणि श्रद्धेचा अनोखा संगम अनुभवायला मिळत असून भाविकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.

### विवेक गावंडे यांना 'मूकनायक पत्रकारिता पुरस्कार'



यवतमाळ - समता पर्व प्रतिष्ठान, यवतमाळ यांच्या वतीने 'समता पर्व 2026' अंतर्गत यंदाचा प्रतिष्ठेचा 'मूकनायक पत्रकारिता पुरस्कार' टीव्ही 9 मराठी, यवतमाळ येथील पत्रकार तसेच सामाजिक कार्यात अग्रेसर राहणारे विवेक गावंडे यांना जाहीर करण्यात आला आहे. महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त 7 एप्रिल ते 14 एप्रिल 2026 या कालावधीत 'समता पर्व 2026' विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांनी साजरा केला जात आहे. गेल्या 22 वर्षांपासून समता पर्व प्रतिष्ठानच्या वतीने प्रबोधनपर व्याख्याने, सांस्कृतिक कार्यक्रम, लोकधारा, महानाट्य, 'यवतमाळ आयडल', अभिनय स्पर्धा आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. या समता पर्वात यंदाचा 'मूकनायक पत्रकारिता पुरस्कार' दिनांक 11 एप्रिल 2026 रोजी सायंकाळी 7 वाजता प्रदान करण्यात येणार आहे. विवेक गावंडे यांनी सामाजिक प्रश्नांवर सातत्याने भक्कमपणे मांडणी करत पत्रकारितेत उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल त्यांची निवड करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. पुरस्कार मिळाल्याबद्दल विवेक गावंडे यांचे सर्व पत्रकारांनी अभिनंदन केले आहे.

### माता जगदंबा व संत सेवालाल महाराज मूर्ती-कलश पूजन सोहळा

यवतमाळ - तालुक्यातील रामनगर येथे माता जगदंबा व संत सेवालाल महाराज यांच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठापना महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. उद्या शनिवार, ११ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता 'मूर्ती व कलश पूजन' कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या मंगलमय सोहळ्याचे अध्यक्षस्थान राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड भूषविणार आहेत. मूर्ती प्राणप्रतिष्ठापनेपूर्वी होणाऱ्या या विधीवत पूजनासाठी रामनगर परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून, ग्रामस्थांच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली आहे. सदर कार्यक्रमाला परिसरातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त रामनगर गावकरी मंडळींच्या वतीने करण्यात आले आहे.

# दारू दुकानाचा 'दुहेरी' खेळ ? एका दुकानाला विरोध, दुसऱ्याला पाठबळ ?

## नागरिकांचा लोक प्रतिनिधींना संतप्त सवाल!

**जनमाध्यम प्रतिनिधी**



महागाव - शहरातील दारू दुकानांच्या मुद्द्यावरून सध्या महागावचे राजकारण आणि समाजकारण चांगलेच तापले आहे. एका बाजूला लोकवस्तीतील दारू दुकानाला कडाडून विरोध केला जात असताना, दुसऱ्या बाजूला मात्र नव्या दुकानाच्या हालचालींना छुपं पाठबळ मिळत असल्याचा खळबळजनक आरोप नागरिक करत आहेत. नियम सर्वांसाठी सारखे की सोयीनुसार?"असा संतप्त सवाल आता महागावच्या गल्लीबोळातून विचारला जात आहे.

महागाव शहरातील प्रभाग क्रमांक एक मध्ये नव्याने सुरू झालेल्या दारू दुकानाला महिलांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. हे दुकान स्व .वसंतराव नाईक यांच्या तैलचित्राजवळ आणि रहिवासी भागाजवळ असल्याने तिथली शांतता भंग पावत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. मात्र, याच वेळी शहरातील प्रभाग क्रमांक१७मध्ये सुरू असलेल्या दारू दुकानाला मात्र प्रशासन आणि काही पुढारी 'मूक संमती' देत असल्याची चर्चा आहे. एका दुकानामुळे त्रास होतो, तर दुसऱ्या दुकानामुळे 'विकास' होणार आहे का?, शाळा,मंदिरे आणि रहिवासी क्षेत्रापासून ठराविक अंतराचे नियम दुसऱ्या दुकानाच्या बाबतीत शिथिल केले जात आहेत का? जनभावनेचा आदर करण्याऐवजी धनशक्तीचा प्रभाव प्रशासनावर पडतोय का? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. शहरात अशी चर्चा आहे की, या दुहेरी भूमिकेमागे मोठे 'आर्थिक हितसंबंध' गुंतलेले आहेत. एका व्यापाऱ्याचे दुकान बंद करून दुसऱ्याच्या दुकानाचा मार्ग मोकळा करून देण्यासाठी काही प्रस्थापित नेत्यांनी फिल्डिंग लावली आहे. प्रशासकीय अधिकारी सुद्धा या प्रकरणी 'वेट अँड वॉच'च्या भूमिकेत असल्याने संशयाची सुई अधिक गडद होत आहे.

जर प्रशासनाने यावर स्पष्ट भूमिका घेतली नाही आणि एकाला न्याय तर दुसऱ्याला सवलत, असे धोरण चालू ठेवले, तर महागावमधील महिला मंडळ आणि नागरिक रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा देत आहेत. महागावची जनता आता जागृत झाली आहे. "दारू नकोच" ही भूमिका असेल तर ती सरसकट असावी, त्यात 'तुझं ते माझं आणि माझं ते माझं' असा दुटप्पीपणा खपवून घेतला जाणार नाही, असा स्पष्ट संदेश नागरिकांनी दिला आहे. आता चेंडू प्रशासनाच्या दरबारात असुन ते कायद्याची अंमलबजावणी करतात की राजकीय दबावाला बळी पडतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल!

# ऑनलाईन आयपीएल सट्ट्यावर पोलिसांचा छापा !

## तिघे अटकेत, साडेपाच लाखांचा मुद्देमाल जप्त

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - नागपूर–तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावर सुरू असलेल्या ऑनलाईन आयपीएल सट्ट्यावर स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत तीन जणांना ताब्यात घेत मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई ९ एप्रिल २०२६ रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास नरसापूर येथील प्रवासी निवाऱ्याजवळ करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग दरम्यान असताना गोपनीय माहितीच्या आधारे देवेंद्र दिलीप कटीयार हा आपल्या चारचाकी वाहनातून मोबाईलच्या माध्यमातून आयपीएल सामन्यावर सट्टा चालवत असल्याचे समोर आले. संबंधित माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना देऊन त्यांच्या आदेशानुसार पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. नरसापूर परिसरात संशयित वाहन आढळून आले. वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये तीन नग मोबाईलवरून आयपीएल सामन्यावर पैशांची बाजी लावत असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्यांची नावे देवेंद्र दिलीप कटीयार (२८, पळवाडी कॅम्प), आशुतोष लक्ष्मीकांत गुप्ता (२९, मारवाडी चौक) आणि दिलेश संतोष कुकुलवार (२८, चापनवाडी) अशी असल्याचे स्पष्ट झाले. पंचासमक्ष झडती दरम्यान त्यांच्या ताब्यातून सट्टा खेळण्यासाठी वापरले जाणारे चार मोबाईल फोन (अंदाजे किंमत १ लाख ६० हजार रुपये) तसेच ४,८७० रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली. याशिवाय सट्टा व्यवहारासाठी वापरलेले चारचाकी वाहन (अंदाजे किंमत ४ लाख रुपये) देखील पोलिसांनी जप्त केले. एकूण ५ लाख ६४ हजार ८७० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. या प्रकरणी संबंधित आरोपींविरुद्ध जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपासासाठी त्यांना कळंब पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात व पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे यशाचा पासवर्ड आहेत : प्रो. डॉ. वसंत कांबळे

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - स्थानिक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे वतीने संचलित पीएम. श्री. अनुसूचित जाती मुलींची शासकीय निवासी शाळा,आसरपेंड तालुका पुसद जिल्हा यवतमाळ येथे आयोजीत "सामाजिक समता सप्ताह"निमित्ताने भारतीय संविधान निर्मिती प्रक्रिया आणि नागरिकांची मूलभूत कर्तव्य व अधिकार आणि हक्क "या विषयावर फुलसिंग नाईक महाविद्यालय पुसद येथील समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रो. डॉ.वसंत कांबळे यांच्या व्याख्यानाचे आयोजन दिनांक ९ एप्रिल२०२६ रोजी करण्यात आले.

समता सप्ताह कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ घरजारे मॅडम होत्या तर विचारपीठावर सौ मनिषा अमृते, श्री पीयुष नाईक, श्री मंगेश सर, झाडे सर आदींची उपस्थिती होती,सुरुवातीला कायकर्माचे प्रमुख मार्गदर्शक डॉ वसंत कांबळे यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन हार अर्पण व दीप प्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी शाळा प्रशासनाच्या वतीने मनिषा अमृते यांनी संविधानाची उदेशिका देउन प्रमुख मार्गदर्शक डॉ वसंत कांबळे यांचा सत्कार केला.प्रमुख मार्गदर्शक प्रा डॉ वसंत कांबळे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान निर्मितीतील योगदान या विषयावर चौफेर इत्यंभूत माहिती दिली व डॉ आंबेडकरच कसे संविधानाचे शिल्पकार आहेत याची माहिती दिली, संविधान सभेच्या निर्मितीपासून तर संविधान अमलात येईपर्यंतचा संपूर्ण इतिहास मांडण्यात आला. तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विद्यार्थी दशेतील पहिल्या वर्गातील प्रवेशापासून तर अमेरिका, इंग्लंड, जर्मनी येथील विद्यापीठातील विविध पदव्या संपादन करण्याकरिता केलेले अध्ययन तसेच त्यांचे राष्ट्रनिर्मितीमध्ये राजकीय , सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक क्षेत्रातील योगदान विशद केले. पुढे बोलतांना प्रा डॉ वसंत कांबळे म्हणाले की विद्यार्थ्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श घेऊन आपले शिक्षण पूर्ण केले पाहिजे कारण डॉ आंबेडकर हे यशाचा पासवर्ड आहेत. या समता सप्ताह कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय श्री पीयुष नाईक यांनी करून दिला व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# मनमानी कारभाराचा आरोप ! आशापुरा जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीचा परवाना रद्द करण्याची मागणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - केळापूर तालुक्यातील पांढरकवडा येथील आशापुरा जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीविरोधात गंभीर तक्रार समोर आली असून,शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक व मनमानी कारभार केल्याचा आरोप करत संबंधित फॅक्टरीचा परवाना तात्काळ रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. पहापळ (ता. केळापूर,जि.यवतमाळ) येथील शेतकरी श्रीनिवास उर्फ पप्पू रघुनाथ रेकुलवार यांनी सहाय्यक निबंधक (सहकारी संस्था), पांढरकवडा यांच्याकडे लेखी तक्रार अर्ज सादर केला आहे.

या अर्जात त्यांनी नमूद केले आहे की,मां आशापुरा जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीचे संचालक रिखबचंद मुथा हे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांकडून कापूस खरेदी करताना मनमानी पद्धतीने भाव पाडत आहेत.तक्रारीनुसार,कापूस खरेदी दरम्यान वजन काट्यात देखील फरक आढळून येत असून,त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे.या प्रकारामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. तसेच ०७ एप्रिल २०२६ रोजी श्रीनिवास रेकुलवार हे स्वतः कापूस विक्रीसाठी संबंधित जिनिंगमध्ये गेले असता, कोणतीही योग्य तपासणी न करता त्यांची कापसाची गाडी परत पाठवण्यात आली.यावेळी त्यांच्याशी वाद घालण्यात आल्याचाही आरोप करण्यात आला आहे.या घटनेमुळे शेतकऱ्यांना अपमानास्पद वागणूक मिळत असल्याचे स्पष्ट होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.या पार्श्वभूमीवर, संबंधित जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीची सखोल चौकशी करण्यात यावी तसेच पुढील हंगामापूर्वीच तिचा परवाना रद्द करण्यात यावा,अशी मागणी अर्जात करण्यात आली आहे.भविष्यात अशा प्रकारे शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये,यासाठी प्रशासनाने तात्काळ कठोर कारवाई करावी,अशीही मागणी करण्यात आली आहे.दरम्यान,या प्रकरणाची दखल घेत प्रशासनाने योग्य ती कारवाई करावी, अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. या संदर्भात संबंधित विभागाकडून चौकशी सुरू होण्याची शक्यता असून, दोषी आढळल्यास कठोर पावले उचलली जाऊ शकतात.या तक्रारीची प्रत जिल्हाधिकारी, यवतमाळ, जिल्हा निबंधक (सहकारी संस्था), यवतमाळ, उपविभागीय अधिकारी केळापूर, तहसीलदार केळापूर तसेच जगदंबा ॲग्रो केअर प्रा. लि. पांढरकवडा यांना देण्यात आली आहे.

# शिक्षण सभापती विठ्ठल खडसे यांच्याहस्ते आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप !

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - आज दिनांक १०/०४/२०२६ रोजी महाराष्ट्र शासन आदिवासी विभाग अंतर्गत आदिवासी समाजातील मुलामुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे तसेच आर्थिक मदत म्हणून दरवर्षी सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती मिळत असते त्याअनुषंगाने शाळेत शिष्यवृत्तीच्या धनादेश वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाचे अध्यक्ष आदरणीय विठ्ठल खडसे सर शिक्षण सभापती होते तर प्रमुख अतिथी सुनील जाधव नपा व मनपा महाराष्ट्र शिक्षक संघाचे राज्यध्यक्ष उपस्थित होते सर्व प्रथम मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे मनोभावे पुजन करून पुष्पहार अर्पण केले त्यानंतर विठ्ठल खडसे सर यांनी आपल्या मनोगतामध्ये म्हणाले महाराष्ट्र शासनाकडून शाळेला ज्या ज्या सोयी सुविधा गरजू विद्यार्थ्यांना दरवर्षी मिळतात त्यांचे सर्व श्रेय हे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दिले जाते आपण सर्वांनी शासनाकडून मिळालेल्या गोष्टींचा योग्य वापर केला पाहिजे असे विद्यार्थ्यांना आव्हान केले व शेवटी आपल्या शुभ हस्ते विद्यार्थ्यांना आपल्या पालकासमवेत धनादेश चे वितरण केले याप्रसंगी गजानन अंभोरे कन्या शाळा क्र २ चे मुख्याध्यापक व आदरणीय ओमप्रकाश तिवारी सेवानिवृत्त मुख्याध्यापक उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन शाळेचे मुख्याध्यापक के.डी.डाखोरे यांनी केले कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेच्या शिक्षिका अर्चना म्हैसकर मॅडम व पुष्पा सिहोतिया मॅडम यांनी परिश्रम घेतले.

# आंबेडकर जयंतीनिमित्त पाटीपुरा येथे पॉवर लिफ्टिंग स्पर्धेचे आयोजन



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आंबेडकर चौक, पाटीपुरा येथे सार्वजनिक जयंती उत्सव समिती-2026 च्या वतीने पॉवर लिफ्टिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा 9 एप्रिल ते 24 एप्रिल दरम्यान पार पडणार असून परिसरातील युवक-युवतींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्पर्धेत पुरुष गटासाठी 53, 59, 66, 74 आणि 83 किलो वजन गटांचा समावेश आहे. तर महिला ओपन गटात 52, 57 व 73 किलो वजन गट ठेवण्यात आले आहेत. विजेत्या स्पर्धकांना अनुक्रमे 2000 व 1000 रुपयांची रोख व गोल्ड सिल्वर मेडल पारितोषिके देण्यात येणार आहेत. या स्पर्धेचे आयोजन कुणाल चव्हाण व सुरज नगराळे यांनी केले असून, परीक्षक म्हणून मोहम्मद दानिश, सातारकर, संगीता डोले व मोहम्मद नफिस हे काम पाहणार आहेत.

या स्पर्धेमुळे युवकांमध्ये क्रीडाप्रेम व फिटनेसबाबत जागरूकता वाढण्यास मदत होणार आहे.

# 'अहंकार' मराठी चित्रपट १० एप्रिलला प्रदर्शित



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - अश्विनी मुव्हीज अँड म्युझिक निर्मित 'अहंकार' हा मराठी चित्रपट १० एप्रिल २०२६ रोजी यवतमाळ शहरातील एलिमेंट स्क्वेअर चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.

तरुण मुलींनी भावनेच्या आहारी जाऊन घेतलेल्या चुकीच्या निर्णयांचे परिणाम आणि त्यावर विचार करण्यास भाग पाडणारी कथा या चित्रपटातून मांडण्यात आली आहे. चित्रपटात नितेश ललित, दिव्या भगत, अनिश बनसोड, चारुलता पावसेकर, श्रद्धा मारुती नाईक, साहिस्था खान, सारला इंगळे यांसह विदर्भ कन्या क्रांती धोटे प्रभावी भूमिकेत दिसणार आहेत. गाणी ठेका धरायला लावणारी असून संवाद वास्तववादी आहेत. दिग्दर्शन प्रवीण भगत यांचे असून चित्रीकरण यवतमाळातील विविध ठिकाणी झाले आहे. प्रेक्षकांनी चित्रपटाला भरघोस प्रतिसाद द्यावा, असे आवाहन निर्मात्यांनी केले आहे.

# ८ वा वेतन आयोग संवेदनशील?

**भा**रतासारख्या मोठ्या आणि विविधतेने नटलेल्या देशात शासनयंत्रणा प्रभावीपणे चालविण्यासाठी सरकारी कर्मचाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. प्रशासन, शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा, न्यायव्यवस्था आणि सामाजिक कल्याण अशा विविध क्षेत्रांमध्ये काम करणारे कर्मचारी हे प्रत्यक्षात शासनाच्या धोरणांची अंमलबजावणी करणारे आधारस्तंभ असतात. त्यामुळे त्यांच्या वेतन, सेवा अटी आणि निवृत्तीनंतरच्या सुरक्षिततेचा प्रश्न हा केवळ कर्मचाऱ्यांपुरता मर्यादित नसून संपूर्ण प्रशासनिक व्यवस्थेच्या कार्यक्षमतेशी संबंधित असतो. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेने ८ व्या केंद्रीय वेतन आयोगाकडे विविध महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर सविस्तर ऑनलाईन निवेदन सादर करून कर्मचाऱ्यांच्या अपेक्षा आणि समस्या अधोरेखित केल्या आहेत. हे निवेदन केवळ वेतनवाढीची मागणी करणारे नसून, कर्मचाऱ्यांच्या जीवनमान, सामाजिक जबाबदाऱ्या, सेवा परिस्थिती आणि निवृत्तीनंतरच्या सुरक्षिततेचा सर्वंकष विचार करणारे आहे.

आजच्या बदलत्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीत वेतन आयोगाची भूमिका केवळ पगारवाढ निश्चित करण्यापुरती मर्यादित राहू नये, तर ती कर्मचाऱ्यांच्या जीवनमानाशी सुसंगत, वास्तववादी आणि दूरदृष्टीपूर्ण असावी, हीच अपेक्षा या निवेदनातून व्यक्त होते. या निवेदनातील पहिली आणि अत्यंत महत्त्वाची मागणी म्हणजे फॅमिली युनिट कन्सेप्टमध्ये सुधारणा. वेतन आयोगाच्या गणनेत किमान वेतन ठरविताना 'फॅमिली युनिट' हा महत्त्वाचा घटक मानला जातो. आतापर्यंत या गणनेत केवळ पती, पत्नी आणि दोन मुले असे एकूण तीन युनिट गृहीत धरले जातात. मात्र भारतीय समाजव्यवस्थेच्या वास्तवाचा विचार करता, अनेक कर्मचाऱ्यांवर त्यांच्या वृद्ध आई-वडिलांची जबाबदारी देखील असते. अशा परिस्थितीत फॅमिली युनिटची संख्या तीन ऐवजी पाच मानणे ही केवळ आर्थिक गणितातील सुधारणा नसून भारतीय कुटुंबव्यवस्थेचा वास्तववादी स्वीकार आहे. त्यामुळे किमान वेतनाचे निर्धारण करताना सामाजिक वास्तवाचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

याच अनुषंगाने किमान वेतन ६५,००० करण्याची मागणी करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्य



असलेल्या Aykroyd सूत्रानुसार किमान वेतन ठरविताना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक गरजांचा विचार केला जातो. सध्याच्या वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांचे वास्तविक उत्पन्न कमी होत चालले आहे. घरभाडे, शिक्षण खर्च, आरोग्य सेवा आणि दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंच्या किमती झपाट्याने वाढत असताना सध्याची वेतनरचना अपुरी पडत असल्याची भावना कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे वास्तववादी गणनेनुसार किमान वेतन ६५,००० करण्यात यावे, ही मागणी योग्य ठरते.

तसेच फिटमेंट फॅक्टर ३.० ते ३.२ ठेवण्याचा प्रस्ताव देखील महत्त्वाचा आहे. वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार जुने वेतन नव्या वेतनश्रेणीत रूपांतरित करताना फिटमेंट फॅक्टरचा वापर केला जातो. सध्याच्या महागाईच्या परिस्थितीत कर्मचाऱ्यांचे खरे वेतन संरक्षण करण्यासाठी फिटमेंट फॅक्टर पुरेसा असणे आवश्यक आहे. त्यामुळे ३.० ते ३.२ दरम्यानचा फिटमेंट फॅक्टर ठेवण्याची मागणी ही वास्तववादी मानली जाऊ शकते.

महागाई भत्ता (DA) वाढीबाबतही कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष आहे. सध्याच्या पद्धतीनुसार महागाई वाढत असली तरी प्रत्यक्षात मिळणारी महागाई भत्ता (DA) वाढ अनेकदा अत्यल्प असते, जसे की २% किंवा ३%. त्यामुळे महागाईच्या तुलनेत कर्मचाऱ्यांचे उत्पन्न मागे पडते. या पार्श्वभूमीवर ८ व्या वेतन आयोगाने किमान ४३ महागाई भत्ता वाढ अनिवार्य करण्याचा विचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. यामुळे कर्मचाऱ्यांच्या उत्पन्नावर महागाईचा होणारा परिणाम काही प्रमाणात कमी होऊ शकतो.

याशिवाय घरभाडे भत्ता (HRA) आणि प्रवास भत्ता (TA) सुधारणा हा देखील महत्त्वाचा मुद्दा आहे. घरभाडे भत्ता (HRA) हा शहराच्या प्रकारानुसार निश्चित केला जातो. मात्र तो अनेकदा घरभाडे भत्ता (DA) शी जोडला जातो, ज्यामुळे त्यात अपेक्षित वाढ होत नाही. त्यामुळे शहरांच्या श्रेणीप्रमाणे ३०%, २०% आणि १०% या कमाल दराने सुरुवातीपासूनच घरभाडे भत्ता (HRA) देण्यात यावा, अशी मागणी आहे. त्याचप्रमाणे प्रवास भत्ता (TA) मध्ये देखील वाढ करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे.

दुर्गम आणि आदिवासी भागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रोत्साहन भत्ता वाढविण्याची मागणी देखील महत्त्वाची आहे. अशा भागात काम करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. पायाभूत सुविधांची कमतरता, वाहतूक समस्या आणि सामाजिक अडचणी यामुळे कर्मचाऱ्यांना अतिरिक्त मानसिक आणि शारीरिक ताण सहन करावा लागतो. त्यामुळे अशा भागात सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना विशेष प्रोत्साहन देणे ही शासनाची जबाबदारी आहे.

वेतनवाढीच्या १०-२०-३० योजनांमध्ये सुधारणा करण्याची मागणी देखील करण्यात आली आहे. विद्यमान व्यवस्थेनुसार या टप्प्यांवर मिळणारी वेतनवाढ अत्यल्प असल्याची तक्रार कर्मचाऱ्यांमध्ये आहे. त्यामुळे ही योजना लागू करताना विद्यमान वेतनात एक इन्क्रीमेंट देऊन पुढील वेतन सेलमध्ये वेतन निश्चित करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. विशेषतः शिक्षकांनाही ही योजना लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे.


पेन्शन विषयक मागण्या या या निवेदनाचा केंद्रबिंदू ठरतात. जुनी पेन्शन योजना (OPS) पुन्हा लागू करण्याची मागणी अनेक वर्षांपासून देशभरातील कर्मचारी संघटनांकडून करण्यात येत आहे. कारण राष्ट्रीय पेन्शन योजना National Pension System(NPS) आणि या योजनांमध्ये निश्चित आणि हमीदार पेन्शनची तरतूद नसल्यामुळे कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर आर्थिक असुरक्षिततेची भीती वाटते. आयुष्यभर शासनासाठी सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर निश्चित आणि सन्माननीय पेन्शन मिळावी, हीच या मागणीमागची मूलभूत भावना आहे.

तसेच Enhanced Family Pension संदर्भातही महत्त्वाची मागणी करण्यात आली आहे. सध्याच्या व्यवस्थेनुसार मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला काही कालावधीनंतर वाढीव पेन्शन ५०% वरून ३०% वर कमी होते. मात्र ती आयुष्यभर ५०% दराने देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.राष्ट्रीय पेन्शन योजना National Pension System(NPS) संदर्भात किमान १०% वार्षिक हमी परतावा देण्याची, शासनाचा हिस्सा १८.५% करण्याची आणि किमान पेन्शनची हमी देण्याची मागणी देखील करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे ळइए योजनेतही अनेक सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत, जसे की शेवटच्या वेतनावर आधारित पेन्शन, VRS नंतर त्वरित पेन्शन, आणि ८० वर्षांनंतर अतिरिक्त पेन्शन.याशिवाय कामगिरीवर आधारित विशेष वेतनवाढ Performance Based Special Increment पुन्हा सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. पाचव्या वेतन आयोगात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना तीन वर्षे सतत उत्कृष्ट सेवा दिल्यास विशेष वेतनवाढ देण्याची व्यवस्था होती. अशा प्रकारची प्रोत्साहनपर व्यवस्था पुन्हा सुरू केल्यास कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमता आणि प्रेरणेत वाढ होऊ शकते.

एकूणच पाहता, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेने ८ व्या वेतन आयोगाकडे मांडलेले मुद्दे हे केवळ मागण्यांची यादी नसून क मचाऱ्यांच्या वास्तव जीवनातील अडचणी, अपेक्षा आणि सुरक्षित भविष्यासाठीची चिंता यांचे प्रतिबिंब आहेत. शासनाने या मागण्यांकडे केवळ आर्थिक दृष्टीकोनातून न पाहता सामाजिक न्याय, प्रशासनिक कार्यक्षमता आणि कर्मचाऱ्यांच्या सन्मानाच्या दृष्टीने विचार करणे आवश्यक आहे.कर्मचाऱ्यांचा आर्थिक सन्मान, सामाजिक सुरक्षितता आणि कार्यप्रेरणा यांचा समतोल साधणारी वेतन आणि पेन्शन प्रणाली उभारणे हीच आजच्या काळाची खरी गरज आहे. ८ व्या वेतन आयोगाने या अपेक्षांची दखल घेऊन न्याय्य आणि दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेतल्यास ते केवळ कर्मचाऱ्यांसाठीच नव्हे, तर संपूर्ण प्रशासनिक व्यवस्थेसाठीही लाभदायक ठरेल हे मात्र निश्चित!

**प्रा.डॉ. प्रशांत विघे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ,अमरावती
मो.९३२६८७७४९

## विवाहबाह्य प्रेम



हो 'ती' प्रेम करते....पण तिच्या प्रेमाला मर्यादा आहेत. त्याच्या आणि तिच्या प्रेमाची सावलीही घराच्या उंबऱ्यावर नाहीये अजून. त्याचं बोलणं विचारांची आदान प्रदान वरचेवर होत चालते. त्यात रुसवे - फुगवे, राग - हसू सगळच असतं पण त्यांच्या संसाराला धक्काही लागणार नाही याची सीमारेषाही तितकीच स्पष्ट आहे.

वासनेची रासलीला कदाचित 'तो' ही रंगवत असेल पण केवळ शब्दांनीच देह रंगवला जातो. वेडी झालेली आहेत ती त्यांचं प्रेम व्यक्त करायला. असे असले तरीही केवळ आपल्या दोघांच्या प्रेमासाठी मर्यादा जपत ते आपल्या कुटुंबीयांची राखरांगोळी होऊ देत नाहीत. क्षणिक आकर्षण असले तरी स्वतःचे संसार उध्वस्त होण्यापासून ते खूप सावध आहेत. जाणीव सगळीच असली तरी मन मात्र फुलपाखरासारख बागडत असत.

केवळ शारीरिक वासना मिटवण्यापर्यंतच प्रेमाची सीमारेषा नसते.त्याला भावनेची जोड देऊन आपले अधिकार आणि कर्तव्य मान्यता मजबूत केली जातात. शरीराला मात्र त्याच्या स्पर्शाची अजूनही सवय नाही ती कस्तुरी सारखी दरवळते तोही मोगऱ्याप्रमाणे दरवळतो ऋतू असेपर्यंतच केवळ मोगऱ्याला आपले अस्तित्व टिकवता येते ऋतू सरला की स्वतःहून तोही विरघळून जातो कारण दोघांनाही जाणीव आहे की आपणास सोबत राहण्याचा अधिकार नाही.

**स्नेहल ठाकरे,पुणे**

## डिजिटल डिटॉक्स:धाराशिवकरांचा अभिनव उपक्रम

**वि**द्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यासाठी आणि डिजिटल विश्वात गुरफटत चाललेल्या बालकांसाठी धाराशिव जिल्हा परिषद प्रशासनाने अनुकरणीय पाऊल उचलले आहे.अलीकडच्या काळात आपली पाल्ये मैदानी खेळांपासून दूर जात आहेत.अंगीभूत कौशल्य, सर्जनशीलता दुर्मिळ झालीत, व्यायामाच्या अभावामुळे शारीरिक आणि बौद्धिक विकासात बालविश्व खुजी ठरत असल्याची ओरड आज गावागावात, घराघरातून ऐकायला मिळते. बालविश्वाच्या सर्वांगीण प्रगतीस आज मोठा अडसर ठरणाऱ्या पैकी टीव्ही व मोबाईल हे डिव्हाइस आहेत.याला दूर सारण्यासाठी धाराशिव जिल्हा परिषद प्रशासनाने विधायक पाऊल उचललेली दिसते. प्रशासनाने सामाजिक समस्येला स्पर्श केल्यामुळे,धाराशिव जिल्हा परिषद प्रशासनाची चर्चा महाराष्ट्रात होऊ लागली आहे. या स्तुत्य उपक्रमामुळे धाराशिव जिल्हा परिषद प्रशासन प्रशंसेस पात्र ठरत आहेत. तसेच या उपक्रमाचे अनुकरण करणेही महत्त्वाचे ठरले आहे. शिवाय याची गरजही सुज्ञ नागरिक बोलून दाखवतात.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या अतिवापरामुळे बौद्धिक विकासाला खिळ बसत आहे.याच्या दुष्परिणामाची झळ विद्यार्थ्यांनाही पोहोचत आहे.परिणामी विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी पोषक वातावरण मिळावे म्हणून, धाराशिव जिल्हा परिषद प्रशासनाने ग्रामस्थांच्या सहकार्याने प्रयत्नशील असणार आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून,जिल्ह्यातील प्रत्येक गावात रात्री सात ते नऊ या वेळात टीव्ही मोबाईल संच बंद ठेवून विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्यासाठी उपाययोजना केल्या जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून, धाराशिव जिल्ह्यातील प्रत्येक गावात एक भोंगा (सायरन) वाजल्यानंतर टीव्ही व मोबाईल संच बंद करावे लागणार आहेत. अशा पद्धतीच्या आचारसंहितेचे पालन करून विद्यार्थी अभ्यासास बसेल.करिता अध्ययननास बसविण्याची जबाबदारी हे निश्चितच पालकांची असेल. तर प्रशासनाकडून ग्रामस्तरीय अधिकाऱ्यांचे विशेष पथक गस्तही घालतील. दरम्यान घरोघरी जाऊन टीव्ही मोबाईल संच बंद आहे की नाही? मुले अभ्यास करत आहे का?याची खातरजमा हे पथक करणार आहे. अर्थात हे काम केवळ प्रशासनाचे नसून, यात समाजाचे योगदान ही तेवढेच महत्त्वाचे ठरते. या व्यतिरिक्त अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी व बीड जिल्ह्यातील नागापूर सारख्या गावांमध्ये अशाच उपक्रमाची अंमलबजावणी केल्या जात असल्याचे वृत्तही मध्यंतरी प्रसारित झाले होते. अशा उपक्रमामुळे 'डिजिटल डिटॉक्स' चे महत्व समाजात रुजण्यास निश्चितच हातभार लागेल. अशा अभिनव उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल करण्या सोबतच स्क्रीन टाईम कमी करण्याचे सामाजिक भान निर्माण होईल. आज जगभरातील चीन, ऑस्ट्रेलिया, कॅनडा सारख्या प्रगत राष्ट्रांनी डिजिटल उपकरणांपासून विद्यार्थ्यांना दूर ठेवण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे; आणि त्याचे सकारात्मक परिणाम आज दिसू लागले आहेत.अर्थात अशा उपक्रमाचे स्वागत करणे काळाची गरज बनली आहे. आगामी काळात राज्यातील प्रत्येक गावात अशा प्रकारचे उपक्रम राबवण्याची मागणी ग्रामस्थांनी करणे अपेक्षित राहील.

**शशिकांत तोटे,**
दारव्हा जिल्हा यवतमाळ
मो:९१३०८३५४५८

## भारतात शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणारे महात्मा ज्योतिराव फुले

**जयंती निमित्य**



**स्त्रि**यांसाठी शिक्षण हा विचार दूर-दूर पर्यंत कोणाच्याही मनात शिवत नव्हता. त्याकाळी महात्मा ज्योतिराव फुले यांनी पत्नीला (सावित्रीला) शिक्षण देण्याची खूणगाठ बांधली. ज्योतिबाने घरूनच शिक्षणाचे पाठ आपल्या सावित्री पत्नीला दिले. संसार आणि शाळा ह्या दोन आघाडींवर त्यांच्या संसाराचा गाडा सुरु होता.ज्योतिबाच्या मनात सावित्री बाईना घरी शिक्षण दिल्या नंतर एक महान विचार आला होता तो म्हणजे मुलींना/स्त्रियांना शिक्षण देण्याचा. तो काळ एकदमच वेगळा होता. ज्योतीबांच्या हा पुरोगामी विचार त्यावेळी कोणालाही रुचणारा नव्हता. तरी पण ज्योतीबांनी स्त्री शिक्षणाची चळवळ पुढे न्यायची होती. स्त्री शिकली तरच समाजाचा अर्थात राष्ट्राचा उधार होईल असे त्यांना वाट होते आणि म्हणून त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी पहिली शाळा भिडे वाडा पुणे इथून सुरु केली. अर्थात पहिल्या शिक्षिका सावित्रीबाई फुले ह्याच होत्या. सावियत्रीबाईनी पुढाकार घेऊन स्त्रियांना शिक्षण देण्याचे काम सुरु केले. ह्यामध्ये सावित्री बाई फुलेंना फार अपमान सहन करावा लागला. हे आपण सर्वांना सर्वश्रुत आहेच. तसेच ज्योतिबा फुलेंना सुद्धा आपला वारंवार जीव धोक्यात टाकावा लागला. त्यांच्या वर अनेकदा प्राणघातक हल्ले झाले परंतु त्यातून बरेचदा ते वाचले. कारण काय तर हा शिक्षणाचा त्यांचा पुरोगामी विचार त्यावेळच्या समाजाला आवडत नव्हता. तरी पण ह्या दोन्ही दाम्पत्यांनी हार मनाली नाही आणि शिक्षणाची मोहीम ही सुरूच ठेवली.शेवटी फुले दाम्पत्यांनी कुटुंबावर बहिष्कार टाकल्यामुळे घर आणि गावाचा त्यांना करावा लागला.

इंग्लंड मध्ये त्यावेळी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा जारी करण्याची चळवळ जोरात सुरु होती. आपल्याही देशात अशा कायद्याची जरुरी ज्योतीबांनी सरकारला कळविली होती. १८७४ पासून सत्यशोधक समाजाच्या मंडळींनी सभांतून ठराव करून ते मुंबई सरकारकडे पाठविले आणि ठिकठिकाणच्या लोकांच्या नावाने व सह्यांचे विनंती अर्ज ही पाठविले. त्यानंतर १० वर्षानंतर सरकार जागे झाले. १८८४ साली विलायत सरकारने सक्तीच्या शिक्षणाच्या उपयुक्ते बद्दल भारतात मत अजमावून पाहण्याकरिता एक कमिशन नेमले. या चौकशी कमिटीचे अध्यक्ष हंटर हे होते. हंटर कमिशनने त्यावेळी बऱ्याच साक्षी घेतल्या. त्या प्रसंगी ज्योतिरावांनी जी साक्ष झाली ती फारच महत्वाची होती. ज्योतिराव फुले सोडून सक्तीच्या शिक्षणासाठी इतरांनी विरोधात मत दिले होते . परंतु ज्योतिरावांनी प्रभावीपणे सक्तीच्या शिक्षाच मुद्दा इंग्रज सरकारला पटवून दिला. त्यांनी त्यावेळी म्हटले की जर सरकार खरोखर जनतेचे मायबाप समजत असेल तर त्यांनी सक्तीचे शिक्षण करावे. यावेळी ज्योतिरावांनी हंटर कमिटीपुढे सक्तीच्या शिक्षणाची रूपरेषा इतक्या उत्तम तऱ्हेने मांडली होती, तिचीच हुबेहूब नक्कल इ.स. १९२२ सालच्या मुंबई कायदे कौंसिलात त्यावेळच्या शिक्षण मंत्र्यांनी शिक्षणाची योजना म्हणून बिल पास करून घेतले. ह्यामुळे आपण आज शिक्षणात क्रांती करू शकलो. समाज शिक्षित झाला. असे मोठी भरीव कार्य ज्योतिरावांनी आपल्यासाठी केले. आपली जी काही प्रगती झाली आहे ती ज्योतिरावांमुळेच हे अगदी सूर्यप्रकाशा एव्हढे सत्य आहे.

सन १८७७ मध्यो महाभयंकर दुष्काळ पडला होता. २० कोटी लोकसंख्ये पैकी दोन कोटी लोक अन्ना वाचून तरफाडून मेले. माणसांना व गुराढोरांना पाणी नव्हते, चारा नव्हता. ज्योतिरावांनी पुढाकार घेऊन मुळा मुठा नदीवर धारण बांधण्याची संकल्पना मांडली. ज्योतिरावांनी पुढाकार घेऊन धरण बांधले आणि पाण्याचा सुकाळ झाला. ह्याचा परिणाम म्हणून शेत पाण्याखाली आणि शेतकरी समृद्ध झाला. फळे, पिके फुलू लागली व आज ही जे क्षेत्र समृद्ध असून संपन्न आहे ते केवळ ज्योतिरावांमुळेच.११ मे १८८८ रोजी कोळीवाडा हॉल, मुंबई येथे मुंबई शहरातील नागरिकांची एक जंगी जाहीर सभा बोलावली होती. ह्या सभेस मुंबईतील बरेच प्रतिष्ठित नागरिक, दुकानदार, कारखानदार व मजूर उपस्थित होते. ह्यावेळी त्यांचा गुणगौरव करून ज्योतिराव महात्मा पुरुष म्हणून संबोधून त्यांना महात्मा पदवी देण्यात आली.ही कार्य केवळ महात्मेच करू शकतात. ज्यांच्या मनामध्ये मानवता आहे. मानवाला ह्या महात्म्याने शिक्षण व शेतकऱ्यांना मुबलक पाणी दिले, धारण बांधून अजूनही आपली तहान भागवत आहेत तसे बघितले तर हाच खरा आधुनिक भारताचा रत्न आहे. अशा ह्या महान भारत रत्नाला, महात्म्याला जयंती निमित्य विनम्र अभिवादन !

**अरविंद सं. मोरे**
मो. ९४२३१२५२५१

### नारी शक्ती वंदन

# सुरक्षित मातृत्व हा प्रत्येक महिलेचा अधिकार

**म**हिलांच्या सर्वांगीण विकासासोबतच सुरक्षित मातृत्व मिळावे यासाठी प्रधानमंत्री मातृवंदन योजना महिलांमध्ये लोकप्रिय होत आहे. गर्भवती महिला व स्तनदा मातेला सकस आहार घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यासोबतच काम करणाऱ्या महिलांना वेतनातील नुकसान भरपाई मिळत असल्यामुळे राज्यात सुमारे ५ लाख ७० हजार पेक्षा जास्त महिलांनी या योजनेसाठी नोंदणी केली आहे. या योजनेमुळे मातामृत्यू तसेच बालमृत्यूचे प्रमाण कमी होण्यास मदत होत आहे. नागपूर विभागात या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. नागपूर जिल्ह्यात १८ हजार २६२ महिलांनी या योजनेत नोंदणी केली आहे.प्रधानमंत्री मातृवंदन योजनेच्या माध्यमातून गरोदर माता आणि बालकांच्या सुदृढ आरोग्यासाठी लाभार्थी महिलेला आर्थिक मदत देण्यात येत आहे. शहरी तसेच ग्रामीण भागामध्ये सुरक्षित मातृत्व मिळावे तसेच महिलेच्या बाळंतपणामध्ये होणारी आर्थिक तसेच वैद्यकीय अडचणींचा सामना करता यावा यासाठी पहिल्या मुलाच्या जन्माच्या वेळी ५ हजार रुपये तसेच दुसऱ्या मुलीच्या जन्माच्या वेळी ६ हजार रुपये थेट बँक खात्यात जमा करण्यात येते. ही योजना म्हणजे गरोदर माता आणि बालकांच्या सुदृढ आरोग्यासाठी वरदान ठरत आहे.

केंद्र शासनाच्या महिला आणि बाल विकास विभागामार्फत प्रधानमंत्री मातृवंदन योजना राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेमुळे मातामृत्यू दर कमी होण्यासोबतच बालमृत्यूच्या दरात लक्षणीय घट झाली आहे. गर्भवती मातेला दैनंदिन मजुरी करावी लागू नये तसेच मजुरीमुळे होणारे आर्थिक नुकसान भरपाई देण्यासाठी या योजनेत तरतूद करण्यात आली आहे. यामुळे आर्थिक भरपाई करुन मातेला विश्रांती घेण्यास प्रोत्साहन देण्यात येत आहे. त्यासोबतच दवाखान्यात प्रसुती आणि बालकांचे वेळेवर लसीकरण होत आहे. या योजनेसाठी लाभार्थी मातेचे आधार कार्ड आणि बँक खाते आधारशी लिंक करणे आवश्यक आहे. या योजनेच्या लाभासाठी लाभार्थ्यांचे उत्पन्न मर्यादा ८ लक्ष रुपये असणे आवश्यक आहे. ही संपूर्ण योजना ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे.प्रधानमंत्री मातृवंदन योजना महिलांसाठी वरदान ठरत असल्यामुळे राज्यात ४२ लाख ९९ हजार महिला लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळाला आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत १ हजार ९३३ कोटी ९७ लक्ष रुपये पात्र लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत ५ लाख ७० हजार नोंदणीचे लक्ष देण्यात आले होते त्यापैकी २८ हजार १७४ पात्र महिला लाभार्थ्यांची नोंदणी पूर्ण झाली आहे. नागपूर विभागात दिलेल्या उद्दिष्टांमध्यो नागपूर जिल्हयात १८ हजार २६२ लाभार्थ्यांच्या नोंदणीचे उद्दिष्ट देण्यात आले होते त्यापैकी १६ हजार २२० लाभार्थ्यांचे नोंदणी झाली असून १५ हजार १६९ महिलांना या योजनेचा थेट लाभ मिळाला आहे. १ एप्रिलपासून नव्याने ७८९ नवीन लाभार्थ्यांची नोंदणी झाली आहे.

प्रधानमंत्री मातृवंदन योजनेच्या लाभासाठी १८ ते ५५ वयोगटातील महिला पात्र आहे. यामध्ये वार्षिक ८ लाख रुपय कौटुंबिक उत्पन्नाची मर्यादा आहे. अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गासाठी उत्पन्नाची अट नाही. प्रधानमंत्री आवास योजना, बीपीएल शिधापत्रिकाधारक, ईश्रम कार्डधारक, मनरेगा जाब कार्डधारक, गर्भवती आणि स्तनपान करणाऱ्या, अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस अथवा आशा कार्यकर्ते तसेच अन्नसुरक्षा कायद्या अंतर्गत असलेल्या रेशनकार्ड धारकांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. या योजनेच्या लाभासाठी राज्य अथवा केंद्र शासनाच्या तसेच खाजगी आरोग्य केंद्रात गर्भधारणेची नोंदणी आवश्यक आहे. शेवटच्या मासिकपाळीच्या तारखेच्या ६ महिन्याच्यात किमान एक प्रसुती तपासणी झाल्यास ३ हजार रुपयाचा पहिला हप्ता देण्यात येतो. बाळाची जन्म नोंदणी तसेच लसीकरणाचे प्राथमिक च्रक पूर्ण झाल्यानंतर २ हजार रुपयाचा दुसरा हप्ता अनुज्ञेय आहे. दुसरे अपत्य मुलगी असल्यास एकाच टप्यात ६ हजार रुपये थेट बँक खात्यात जमा करण्यात येतात. प्रधानमंत्री मातृवंदन योजना पूर्वी आरोग्य विभागातर्फे राबविण्यात येत होती, परंतु एपिल २०२३ पासून मिशन शक्ती मार्गदर्शन सूचनेनुसार नव्याने लागू करण्यात आली आहे. ही योजना आता महिला व बाल विकास विभागातर्फे राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत २०२३-२४ या वर्षात ३ लाख ६२ हजार २१५ लाभार्थ्यांची नोंदणी झाली आहे. पात्र लाभार्थ्यांना थेट निधीचे वितरण करण्यात आले आहे.

**अनिल गडेकर**
नागपूर

# शिर्ला ग्रामपंचायत सचिव दिलीप वाहोकार निलंबित

## – कर्तव्यात कसूर, बेकायदेशीर नियुक्तभ्यांचा ठराव
## – ग्रामस्थांच्या आंदोलनानंतर प्रशासनाची कारवाई

■ *प्रतिनिधी | खेट्री* ■

*पातूर पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या शिर्ला ग्रामपंचायतीचे सचिव दिलीप वाहोकार यांना त्यांच्या मनमानी व मुजोर कारभारामुळे अखेर निलंबित करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ९ एप्रिल रोजी यासंदर्भातील आदेश काढत ही कारवाई केली. तसेच, त्यांची पातूर पंचायत समितीतून बार्शीटाकळी पंचायत समितीत हकालपट्टी करण्यात आली आहे.*



वाहोकार यांच्या कार्यपद्धतीमुळे शिर्ला गावातील ग्रामस्थ गेल्या अनेक महिन्यांपासून त्रस्त होते. वरिष्ठांच्या आदेशांकडे दुर्लक्ष, कर्तव्यात कसूर आणि प्रशासकीय नियमांचे उल्लंघन अशा गंभीर तक्रारी त्यांच्याविरोधात करण्यात आल्या होत्या. विशेष म्हणजे, ग्रामपंचायतीत आधीच तीन ग्राम रोजगार सेवक कार्यरत असताना नियमबाह्य पद्धतीने आणखी सात जणांची नियुक्ती करण्याचा ठराव त्यांनी घेतल्याने प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली होती.

या सर्व प्रकाराविरोधात संतप्त ग्रामस्थांनी आणि महिलांनी पातूर पंचायत समितीवर धडक देत ठिय्या आंदोलन केले होते. वाढता जनक्षोभ आणि सातत्याने येणाऱ्या तक्रारी लक्षात घेऊन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अखेर कठोर पाऊल उचलत वाहोकार यांना निलंबित केले.

या कारवाईनंतर शिर्ला गावातील ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले असून, मनमानी आणि भ्रष्ट कारभार करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रशासनाने स्पष्ट संदेश दिल्याची भावना व्यक्त होत आहे.

**बार्शीटाकळी पंचायत समितीत हकालपट्टी**

शिर्ला ग्रामपंचायतीतील सचिव दिलीप वाहोकार यांच्या मनमानी कारभारामुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थ व महिलांनी गटविकास अधिकारी यांच्या दालनात ठिय्या आंदोलन केले होते. या आंदोलनाची दखल घेत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ९ एप्रिल रोजी त्यांना दोषी ठरवत निलंबित केले. तसेच, पातूर पंचायत समितीतून त्यांची बार्शीटाकळी पंचायत समितीत हकालपट्टी करण्यात आली आहे.

# मुंडगावच्या सरपंच मीना उईके तिस-यांदा अपात्र

## जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश; पद रिक्त, ग्रामपंचायत राजकारणात खळबळ

■ **प्रतिनिधी | अकोट** ■

अकोट तालुक्यातील संत नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंडगाव ग्रामपंचायतीत पुन्हा एकदा मोठी राजकीय उलथापालथ झाली आहे. विद्यमान सरपंच मीना दादाराव उईके यांना जिल्हाधिकाऱ्यांनी सरपंच पदावरून अपात्र ठरविल्याने पद रिक्त झाले असून, तालुक्यात या निर्णयाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

मुंडगाव येथील रहिवासी तसेच वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते स्वप्नील नंदकुमार दहीभात यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम १४(१)(ग) अंतर्गत सरपंच उईके यांच्या विरोधात तक्रार दाखल केली होती. या प्रकरणी अपील व न्यायालयीन स्थगिती (स्टे) मिळाल्यानंतरही जिल्हाधिकाऱ्यांसमोर पुन्हा सुनावणी घेण्यात आली. मात्र, सुनावणीदरम्यान सरपंच व त्यांचे वकील अनुपस्थित राहिल्याने आणि सादर पुराव्यांच्या आधारे जिल्हाधिकाऱ्यांनी अपात्रतेचा निर्णय दिला.

दि. २४ मार्च २०२६ रोजी हा आदेश पारित करण्यात आला असून ६ ऑक्टोबर २०२३ रोजी दाखल तक्रार अर्ज मंजूर करण्यात आला आहे. या आदेशाची प्रत ग्रामसेवक सैय्यद नजाकत यांना ३१ मार्च रोजी प्राप्त झाली. त्यानंतर ग्रामपंचायत सभेत याबाबत माहिती देण्यात आली आणि सरपंच पद अधिकृतपणे रिक्त करण्यात आले.

दरम्यान, सरपंच पदाचा कार्यभार उपसरपंच अनिल गाढे यांच्याकडे सोपविण्यात येणार असल्याची माहिती आहे. याबाबतचा अहवाल गटविकास अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आला असून, पुढील कायदेशीर प्रक्रिया आणि नव्या सरपंच निवडीसाठी लवकरच निवडणूक होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या निर्णयामुळे गावातील राजकीय वातावरण तापले असून विरोधी गटात समाधानाचे वातावरण आहे. आगामी काळात ग्रामपंचायत राजकारणात मोठे बदल होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

दरम्यान, सरपंच उईके यांनी यापूर्वी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातून दोनदा स्थगिती मिळविली होती. त्यासाठी झालेला खर्च कसा उचलण्यात आला, याबाबत गावकऱ्यांमध्ये चर्चांना उधाण आले आहे. तसेच बाजार हर्रासीचे १ लाख ११ हजार रुपये ग्रामपंचायतीच्या खात्यात जमा न करता दोन वर्षे स्वतःकडे ठेवल्याचा आरोपही समोर आला आहे.

या प्रकरणी गटविकास अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायत अधिनियम ३९ (१) अंतर्गत कारवाईचा प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यपालन अधिकाऱ्यांकडे पाठविला असून, पुढे पोलीस कारवाईची शक्यताही व्यक्त केली जात आहे.

## होमिओपॅथीच्या उन्हाळी औषधीचे वितरण प्रारंभ

**अकोला :** भीषण उन्हापासून नागरिकांना रक्षण होऊन त्यांचे आरोग्य अबाधित रहावे यासाठी भारतीय रेडक्रॉस सोसायटीच्या वतीने होमिओपॅथीचे ऊन प्रतिबंधक औषध सनकुलच्या वितरणास प्रारंभ करण्यात आला.ही मोहीम प्रथम महसूल विभागापासून प्रारंभ करण्यात आली.या सनकुल वितरण मोहिमेचा प्रारंभ सोहळा जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते करण्यात आला.

# लखन अंभोरे हत्याकांड प्रकरण
# ३ आरोपींचा अटकपूर्व जामीन फेटाळला

■ **प्रतिनिधी | अकोट** ■

अकोट शहरातील दिवसाढवळ्या झालेल्या खूनप्रकरणात महत्त्वाची घडामोड घडली असून १६ आरोपींच्या टोळक्यातील तिघांचा अटकपूर्व जामीन अर्ज अकोट येथील सत्र न्यायालयाने फेटाळला आहे. या निर्णयामुळे फरार आरोपींच्या अटकेकडे आता सर्वसामान्यांचे लक्ष लागले आहे.

या प्रकरणात आरोपी नंदा गजानन शिवरकर (वय ५०), संगिता विजय शिवरकर (वय ३३) व रेखा मुरली अंभोरे (रा. राजेंद्र नगर, खानापूर वेस, अकोट) यांनी इतर साथीदारांच्या मदतीने लखन अंभोरे यांच्यावर लोखंडी पाईप, दगड, विटा व चाकूने हल्ला करून त्यांचा खून केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी दाखल अटकपूर्व जामीन अर्जावर सुनावणी करताना वि. जिल्हा व सत्र न्यायाधीश आर.आर. पटारे यांनी अर्ज नामंजूर केला.



प्राप्त माहितीनुसार, ९ मार्च रोजी दुपारी चारच्या सुमारास लखन अंभोरे हे न्यायालयीन काम आटोपून मोटारसायकलने घरी परतत असताना गणपती मंदिराजवळ त्यांना अडवण्यात आले. पैशांच्या व्यवहारातून सुरू असलेल्या जुन्या वादातून आरोपींनी त्यांच्यावर हल्ला चढविला. लोखंडी पाईप, दगड-विटांनी बेदम मारहाण करत त्यांना गंभीर जखमी करण्यात आले. दरम्यान, वाचवण्यासाठी धावलेल्या पत्नी व नातेवाईकांनाही मारहाण करण्यात आली.

जखमी अवस्थेत लखन अंभोरे यांना प्रथम ग्रामीण रुग्णालयात, त्यानंतर अकोला येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

सरकार पक्षाचे वकील ॲड. अजित देशमुख यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना सांगितले की, हा गंभीर स्वरूपाचा खून असून आरोपी व फिर्यादी एकाच परिसरात राहत असल्याने जामीन दिल्यास साक्षीदारांवर दबाव येऊ शकतो. तसेच आरोपी सध्या फरार असून तपास अपूर्ण आहे, त्यामुळे त्यांना पोलीस कोठडीत चौकशी आवश्यक आहे.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला. या प्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक शमुवेल वानखडे करीत आहेत. दरम्यान, तिन्ही आरोपी अद्याप फरार असून त्यांना अटक कधी होणार, याकडे अकोटकरांचे लक्ष लागले आहे.

## १८ तास विद्यार्थी देणार महामानवास वाचनातून सामूहिक अभिवादन

■ **प्रतिनिधी | अकोला** ■

भारतीय बौध्द महासभाच्या वतीने महात्मा ज्योतीराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती भव्य प्रमाणात अशोक वाटीका अकोला येथे आयोजित करण्यात आली असून यात अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आले असल्याची माहिती अशोक वाटिका येथे संपन्न पत्रकार परिषदेत देण्यात आली.महासभेचे अध्यक्ष पी.जे. वानखडे,विजय जाधव व अन्य पदाधिकारी यांच्या उपस्थितीत आज दि.११ एप्रिल रोजी महात्मा ज्योतीराव फुले जयंती निमित्त सायंकाळी ६ वाजता अभिवादन व आयु. इंदुताई मेश्राम यांचे व्याख्यान होईल. दि. १२ एप्रिल रोजी महामानव बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत शेकडो विद्यार्थी हे वाचनातून अभिवादन करण्यात येणार आहे, दि. १३ एप्रिल रोजी दु. २ ते रात्री ८.०० वाजेपर्यंत महामानवाच्या जिवन कार्यावर होऊन मान्यवरांचे भाषणे व गित गायन होणार आहे.

### जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २९८/२०२६ प्रोसेस नं.२९४२/२०२६
चौ.ता. १०/०४/२०२६ दिनांक : ०४/०३/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती कल्पना प्रमोद भटकर २. कु. खुशी प्रमोद भटकर ३. कु. तन्वी प्रमोद भटकर ४. तन्मय प्रमोद भटकर ५. श्रीमती मैनाबाई अंबादास भटकर सर्व रा. वडद खुर्द, पोस्ट दहिहांडा, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : प्रमोद अंबादास भटकर
**पत्ता :-** रा. वडद खुर्द, पोस्ट दहिहांडा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रमोद अंबादास भटकर यांचे दि. १९/११/२०२५ रोजी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, नागपूर येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १०/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०४/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५५०/२०२६ प्रोसेस नं.४९३६/२०२६
चौ.ता. ०६/०५/२०२६ दिनांक : ०९/०४/२०२६

**अर्जदार :** १. सुशिलाबाई भिकाजी गावंडे रा. दहिगाव, अकोला. २. शोभा एकनाथ रोडे (लग्नानंतरचे नाव) शोभा भिकाजी गावंडे (लग्नाआधीचे नाव) रा. वार्ड नं. ४, विठ्ठल नगर, उमरी प्र. अकोला. ३. रेखा दिगंबर मोहोड (लग्नानंतरचे नाव) रेखा भिकाजी गावंडे (लग्नाआधीचे नाव) रा. दिवठाणा, अकोला. ४. पुष्पा रघुनाथ रोडे (लग्नानंतरचे नाव) पुष्पा भिकाजी गावंडे (लग्नाआधीचे नाव) रा. विठ्ठल नगर, मोठी उमरी, अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : भिकाजी हनवती गावंडे
**पत्ता :-** रा. दहिगांव गावंडे (दहिगाव), ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत भिकाजी हनवती गावंडे यांचे दि. १४/०१/१९८२ रोजी दहिगांव गावंडे (दहिगाव), ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०६/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- १६३/२०२५ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :** हनुमान मंदिर येवता ता.जि. अकोला
**अर्जदार :-** श्री. गोपाल सुखदेव काकड रा.येवता ता. जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ? **अ) जंगम मिळकत (वर्णन):-** काही नाही **आ) स्थावर मिळकत (वर्णन) :-** मौजे येवता ता. जि. अकोला येथील मालमत्ता क्रमांक २०५ ऐकून जागेचे क्षेत्रफळ 60x30 = 1980 चौरस फुटआहे. यावर बांधकाम केलेले हनुमान मंदिर 29x30 = 870 चौरस फुट आहे. उर्वरित ५३० चौरस फुट जागा खुली आहे. **जागेची चतुःसीमा पुर्वेस :** रस्ता, पश्चिमेस : रस्ता, उत्तरेस : खाली जागा, दक्षिणेस : खाली जागा स्थावर मालमत्तेची अंदाजे किंमत ३,७५,०००/-( तीन लक्ष पंच्याहत्तर हजार रुपये)

सदरच्या चौकशी प्रकरणा मध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियतही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक-१०/०४/२०२६ रोजी दिली.

शिक्का
**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

### जाहीर सुचना

दि.१०.४.२०२६

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, श्री भानूदास मेहेंगे, यांचे मालकीचे व ताब्यातील मौजे सोमठाणा, ता. जि अकोला येथील जुना सर्वे क्र १८/३, गट क्र ५८, मधील, वर्ग-२ ची २.०२ हे आर जमीन, ज्याच्या पूर्वेस:- शिवदांड, पश्चिमेस:- सुधीर दुतोंडे यांचे शेत, उत्तरेस:- पुरुषोत्तम दुतोंडे यांचे शेत, दक्षिणेस:- निवृत्ती दुतोंडे यांचे शेत, अशी शेत जमीन वीकण्याचा व्यवहार आमचे पक्षकार यांनी केला आहे, व लवकरच खरेदी करणार आहेत.

तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमत्ते बाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही हीतसंबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित, आज पासुन सात (७) दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि. याची कृपया नोंद घ्यावि.

**आपला**
**शिशिर अरविंद देशपांडे**
अधिवक्ता, दिवाणी न्यायालयासमोर,
स्टेशन रोड, अकोला मो : ९८२३०९१३७७

### जाहीर सुचना

दि.१०.४.२०२६

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, शांताबाई उत्तम इंगोले, माया संजय खंडारे, छाया राहुल शिरसाट, महादेव दौलत नवघरे, आशा मधुकर खरात, सुनील दिलीप नवघरे, कुंता दिलीप नवघरे, कोमल नवल सावध, दीक्षा दिलीप नवघरे, धम्मदीप दिलीप नवघरे, यांचे मालकीचे व ताब्यातील मौजे खामखेड, ता. पातूर, जि अकोला येथील जुना सर्वे क्र २६/३, गट क्र ८९, मधील, वर्ग-२ ची ४.३७ हे आर एकूण जमिन, ज्याच्या पूर्वेस :- राजू नवघरे यांचा गट क्र ८३, पश्चिमेस:- नदी व जंगल शिव, उत्तरेस:- अनिल खंडारे यांचा गट क्र ९०, दक्षिणेस:- रमेश लांडकर यांचा गट क्र ८८, अशी शेत जमीन वीकण्याचा व्यवहार आमचे पक्षकार यांनी केला आहे, व लवकरच खरेदी करणार आहेत.

तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमत्ते बाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही हीतसंबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित, आज पासुन सात (७) दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि. याची कृपया नोंद घ्यावि.

**आपला**
**शिशिर अरविंद देशपांडे**
अधिवक्ता, दिवाणी न्यायालयासमोर,
स्टेशन रोड, अकोला मो : ९८२३०९१३७७

### चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

जा.क्र. ९३६/ २०२६ दि. ०७/०४/२०२६
अर्ज क्रमांक :- १२/२०२६ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक-** श्री. चक्रधर चरणांकित मंदिर ट्रस्ट घटाळी (चिखलवाड) ता.पातुर जि. अकोला
**अर्जदार :-** श्री. अविनाश श्रीकृष्ण लांडे रा.राम मंदिर चौक, वार्ड नं. १, पारस ता.बाळापुर जि. अकोला

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत (वर्णन) :-** रोख रक्कम रु.११०००/- श्री. अविनाश श्रीकृष्ण लांडे यांचे ताब्यात आहे. यांचे ताब्यात आहे. **आ) स्थावर मिळकत (वर्णन):-** काही नाही.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला. १ यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक- ०७/०४/२०२६ रोजी दिली.

शिक्का
**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

### जाहिर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४९२/२०२६ प्रोसेस नं.४४४६/२०२६
चौ.ता. १९/०६/२०२६ दिनांक : ०२/०४/२०२६

**अर्जदार :** १. शारदा नंदु केवट रा. निजामपुर, ता. अचलपूर, जि. अमरावती. २. सरोज शिवप्रसाद केवट रा. प्राथमिक आरोग्य केंद्र, मु. पो. शिरपूर, ता. मालेगाव जि. वाशिम. ३. ज्योती सतिश केवट रा. जुना सराफा, ता. अचलपूर, जि. अमरावती. ४. आनंद रामहरक परदेशी रा. गांधी जगजीवनराम नगर, दुबेवाडी, खरप रोड, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. रामहरक बलदेव परदेशी २. राजमती रामहरक परदेशी
**पत्ता :-** रा. गांधी जगजीवनराम नगर, दुबेवाडी, खरप रोड, अकोला. ता. जि. अकोला. मो. नं. ९८९०२८५२०६

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामहरक बलदेव परदेशी यांचे दि. १६/०९/२०२० रोजी व तसेच मयत राजमती रामहरक परदेशी यांचे दि. २५/०३/२०२५ रोजी राहते घरी, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### Change In Name

I have Changed
My Name Form
**KU.VAISHALI NAMDEORAO BURADE**
-TO-
**NANDITA SANJAY PATKI**
My residential Address in Jyoti Nagar, Jatharpeth Dist. Akola 444005

### Change In Name

I have Changed My Name Form
**FARHANA ABDUL FAHIM**
-TO-
**FARHANA PARVEEN ABDUL FAHIM**
Passport No-A9923370
My residential Address Firdos Colony Akola 444001.

### Change In Name

My Old passport name was
**ASGHER SHAH MAJHER SHAH**
Now my new name is
**Azgar Shah Mazhar Shah**
Old passport no: K 972676
Address. Khidki PuraJuna Shahar Akola distAkola 444002 (MS)

### अकोला महानगरपालिका, अकोला
### पाणी पुरवठा विभाग

**निविदा सुचना क्र. ०६, सन २०२५-२६**

अकोला महानगरपालिका, पाणी पुरवठा विभाग, अकोला मार्फत मनपा निधी अंतर्गत एकुण एका कामाची ई-निविदा (तिसरी वेळ) दि. १०/०४/२६ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन या कामासंबंधीत सविस्तर तपशिल खालील नमुद संकेतस्थळावर उपलब्ध आहे. (संपर्क- ७७०९०४९३५१)

Portal https://mahatenders.in

**- स्वा -**
**कार्यकारी अभियंता**
पाणी पुरवठा विभाग
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/पापु/ १८/२०२६,
पाणी पुरवठा विभाग अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : १०/०४/२०२६

### Change In Name

I Have Changed My Name From
**SYED HASNUDDIN**
-TO-
**SYED HASNUDDIN SYED RIYAZUDDIN**
Old Passport No :J9737663My Residential Address: SYED PURA PATUR, AT POST, PATUR TQ, PATUR DIST, AKOLA 444501

### Change In Name

I Have Changed My Name From
**MAHEZIYA**
-TO-
**MAHEZIA SYED HASNUDDIN**
Old Passport No :J9737663My Residential Address: SYED PURA PATUR, AT POST, PATUR TQ, PATUR DIST, AKOLA 444501

### निविदा सूचना

**उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग बार्शिटाकळी**

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला हे ग्रामीण पाणी पुरवठा उपविभागांतर्गत जल जिवन मिशन अंतर्गत मौजे काजळेश्वर ता. बार्शिटाकळी जि. अकोला येथे महावितरण वीज कनेक्शन देणे बाबत खालील प्रमाणे दरपत्रक मागविण्यात येत आहे.

Submission of estimate for sanction so as to provide १No. Of ३Phase PWW connection in R/o.M/S SARPANCH GRAMPANCHAYAT KAJLESHWAR at AT KAJALESHWAR village TQ BARSHITAL- 444401 Con. No. 312980003789 for the load of 10.0kw/10.0kva against application number 76417004 Dt.02-Mar- 2026 under Barshitakli Distribution centre under barshitakli SDN under 1.3%SC NR Scheme.

वरील कामाचे दरपत्रके तीन दिवसाच्या आंत उप अभियंता ग्रा.पा.पु.उपविभाग बार्शिटाकळी या कार्यालयात कार्यालयीन वेळेत बंद लिफाफात सादर करण्यात यावे.

**उप अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग बार्शिटाकळी**

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १२७**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY

**EMPLOYMENT NOTICE**

No.SGBAU/1/103/1-184/2026 Date 10.04.2026

Online applications are invited for Contractual Teachers in various Teaching Departments, on or before Dt.27.04.2026 upto 5.00 pm.

Particulars of advertisement, qualifications, reservation, instructions and other terms & conditions are available on the university website www.sgbau.ac.in in the advertisement section.

**Registrar,**
Sant Gadge Baba Amravati University

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५४७/२०२६
**श्री.हरिचंद्र अधिक चार -वि- निरंक**
पुढील ता.२१.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Harichandra Uttam Ghode, Age 62 Yrs. Occu.: Agriculturist R/o Ashok Nagar, Tiwsa, Tq.Tiwsa, Dist.Amravati
2. Baban Uttam Ghode Age 58 Yrs. Occu.: Agriculturist R/o Nimbhora Delwadi, Tq.Tiwsa, Dist.Amravati.
3. Bebi Rameshrao Talan, Age 64 Yrs. Occu.: Household R/o Chambharpura, Tadapeth Nagpur Tq.Dist.Nagpur
4. Balasaheb Uttamrao Ghode (Deceased)
   4A) Nirmalabai Balasaheb Ghode, Age 57 Yrs. Occu.: Household R/o Shobha Nagar, Amravati. Tq. Dist. Amravati.
   4B) Roshan Balasaheb Ghode, Age 33 Yrs. Occu.: Agriculturist R/o Behind Remand Home Gadge Nagar, Amravati.
   4C) Akshay Balasaheb Ghode, Age 29 Yrs. Occu.: Agriculturist R/o Shobha Nagar, Amravati. Tq. Dist. Amravati.
5. Sunita Ramdas Gohatre (Deceased)
   5A) Ramdas Ambadas Gohatre, Age ... Yrs. Occu.: Agriculturist R/o Nimbhora Delwadi, Tq.Tiwsa, Dist. Amravati.
   5B) Sumit Ramdas Gohatre, Age 22 Yrs. Occu.: Education R/o Nimbhora Delwadi, Tq.Tiwsa, Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **महादेव शामरावजी घोडे** हे दिनांक 15.12.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **हरिचंद्र अधिक चार विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **हरिचंद्र अधिक चार विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०४.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

## जाहीर सुचना

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **सिराज खान वल्द हयात खान,** रा.चपराशीपुरा, अमरावती, ता.जि.अमरावती यांच्याशी खालील मालमत्ता विकत घेण्याचा सौदा केला आहे. त्या मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

अ) **मालमत्तेचे वर्णन** - मौजे-बोरी, प्रगणे-नांदगांव(खं.) ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथील गट नं.१९९, क्षेत्रफळ ७ हे.४७ आर, त्यापैकी मध्यम भागाची वाटणीचे धुरा करुन पश्चिमेकडील ३ हे.८३ आर शेतजमीन ज्याचा आ.रु.३.५९ पैसे इतर झाडाझुडासहीत व इतर तदंगभूत वस्तुसह या शेताची चतुःसिमा--

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | आशा गनुले यांचे शेत |
| पश्चिमेस | - | वर्मा यांचे शेत |
| उत्तरेस | - | याच गटातील श्रीराम निरंजन गाउत्रे यांचे शेत |
| दक्षिणेस | - | याच गटातील भिमराव पुनाजी पाटील यांचे शेत |

ब) मौजे-बोरी, प्रगणे-नांदगांव(खं.) ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथील गट नं.१९८, क्षेत्रफळ ५ हे.२५ आर, आ.रु.४.२५ पैसे विभाग-४, भो.वर्ग-१ यातील पुर्व भागाची ४ हे.०४ आर शेतजमीन इतर झाडाझुडासहीत व इतर तदंगभूत वस्तुसह या शेताची चतुःसिमा--

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | बोरीवा यांचे शेत |
| पश्चिमेस | - | याच शेताचा भाग |
| उत्तरेस | - | सरकारी पांधन रस्ता |
| दक्षिणेस | - | नंदकिशोर देशमुख यांचे शेत |

क) मौजे-बोरी, प्रगणे-नांदगांव(खं.) ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथील गट नं.१९६, क्षेत्रफळ ४ हे.७५ आर, यापैकी पुर्व पश्चिम वाटणीचे (श्यामराव खानझाडे यांचे जमिनीचे मध्य भागाची) २ हे.३३ आर, ज्याचा आ.रु.१.९६ पैसे इतर झाडाझुडासहीत व इतर तदंगभूत वस्तुसह या शेताची चतुःसिमा--

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | पटेल यांचे शेत |
| पश्चिमेस | - | सरकारी रस्ता |
| उत्तरेस | - | सुरेंद्र खानझोडे यांचे शेत |
| दक्षिणेस | - | श्यामराव खानझोडे यांचे शेत |

तरी सर्व लोकांना, भागीदारी पेढी, बॅंक व कंपनी इत्यादीना जाहीरपणे सुचित करण्यात येते की, वर वर्णन केलेली मालमत्तेवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, बोजा, गहाण, ताबा, हितसंबंध, असल्यास ही जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर लेखी आक्षेप कळवावे. असा कोणताही आक्षेप प्राप्त न झाल्यस माझे पक्षकार सदरहू मालमत्तेची खरेदी करतील व त्यानंतर सदरहू मालमत्तेवर कोणताही उजर चालणार नाही व तसेच वरील मालमत्तेबद्दल कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये तसे केल्यास ते माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

(ॲड.रोहित एम.जैन)
खापर्डे बगीचा, अमरावती
ता.जि.अमरावती,
मो.९२२५७०६७८९

---

## जाहीरनामा

श्रीमती रोहिणी वि.मनोरे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) तिवसा, जि.अमरावती यांचे न्यायालय

आर.एम.जे.सी.क्र.६९/२०२६ ने.ता.०४.०६.२०२६

**अर्जदार -**
1. Harichandra Uttam Ghode, Age 62 Yrs. Occu.: Agriculturist R/o Ashok Nagar, Tiwsa, Tq.Tiwsa, Dist.Amravati
2. Baban Uttam Ghode Age 58 Yrs. Occu.: Agriculturist R/o Nimbhora Delwadi, Tq.Tiwsa, Dist.Amravati.
3. Bebi Rameshrao Talan, Age 64 Yrs. Occu.: Household R/o Chambharpura, Tadapeth Nagpur Tq.Dist.Nagpur
4. Balasaheb Uttamrao Ghode (Deceased)
   4A) Nirmalabai Balasaheb Ghode, Age 57 Yrs. Occu.: Household R/o Shobha Nagar, Amravati. Tq. Dist. Amravati.
   4B) Roshan Balasaheb Ghode, Age 33 Yrs. Occu.: Agriculturist R/o Behind Remand Home Gadge Nagar, Amravati.
   4C) Akshay Balasaheb Ghode, Age 29 Yrs. Occu.: Agriculturist R/o Shobha Nagar, Amravati. Tq. Dist. Amravati.
5. Sunita Ramdas Gohatre (Deceased)
   5A) Ramdas Ambadas Gohatre, Age ... Yrs. Occu.: Agriculturist R/o Nimbhora Delwadi, Tq.Tiwsa, Dist. Amravati.
   5B) Sumit Ramdas Gohatre, Age 22 Yrs. Occu.: Education R/o Nimbhora Delwadi, Tq.Tiwsa, Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** निरंक

या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, **हरिचंद्र उत्तम घोडे व ईतर** यांनी दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, तिवसा यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता **APPLICATION UNDER CLAUSE 2 OF BOMBAY REGULATION VIII OF 1827** अन्वये अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **उत्तम शामराव घोडे** यांचा मृत्यू दिनांक **०५.०१.२०१७** रोजी झालेला आहे. **शकुंतला उत्तम घोडे** यांचा मृत्यू दिनांक **१७.११.२०२१** रोजी निंभोरा देलवाडी, ता.तिवसा, जि.अमरावती येथे झालेला आहे. **उत्तम शामराव घोडे** यांची आई नामे **पार्वताबाई शामराव घोडे** यांचा मृत्यू **उत्तम शामराव घोडे** यांच्या लहानपणीच तसेच **बाळू उर्फ बाळासाहेब उत्तमराव घोडे** यांचा मृत्यू दिनांक **२२.०४.२०२०** रोजी निंभोरा देलवाडी, ता.तिवसा, जि.अमरावती येथे झालेला आहे. अर्जदार यांचेशिवाय मयतांचे ईतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केले आहे.

वरीलप्रमाणे सदरहू **उत्तम शामराव घोडे** मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.

आज दि.**०४ माहे एप्रिल २०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर, तिवसा

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २१३**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५८९/२०२६
**पुष्पा अधिक चार -वि- निरंक**
पुढील ता.२७.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Pushpa Dadarao Hushangabade, Age 73 Yrs. Occu.: Housework R/o Plot No.3, Friends Co-Op.Housing Society, VMV Road, Besides Ichchhamani Ganesh Mandir, Kathora Naka, Amrvati
2. Dr.Dipali Dadarao Hushangabade, Age 49 Yrs. Occu.: Medical Practitioner
3. Shri Nikhil Dadarao Hushangabade, Age 43 Yrs. Occu.: Service No.2 & 3 R/o Ravi Nagar, Nr.Sudhir Colony, Jatharpeth, Akola.
4. Sau.Jaee Dhananjay Patil, Aged 42 Yrs. Occu.: Service R/o Flat No.1101, C-Wing, La-Bllezza, Rishivan, Nr.Kajupada, Boriwali East, Mumbai-400066
5. Sau.Jaee Yashpal Gudadhe, Aged 42 Yrs. Occu.: Service R/o Govt.Ministerial Quarter, Ravi Nagar, Nagpur.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Dadarao Daulatrao @ Daulatramji Hushangabade हे दिनांक 06.05.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Pushpa Dadarao Hushangabade + 4 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Pushpa Dadarao Hushangabade + 4 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०९.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७०८/२०२६
**श्री.कमलेश अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.०८.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Kamlesh Dilip Yadav, Age 52 Yrs. Occu.: Household
2. Sachi Dilip Yadav, Age 31 Yrs. Occu.: Household
3. Soham Dilip Yadav, Age 19 Yrs. Occu.: Education
   Above 1 to 3 R/o Dudh Ganga Colony, Jewad Nagar, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **दिलीप तेजराम यादव** हे दिनांक 29.01.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **कमलेश अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कमलेश अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०९.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

प्रो.क्र.४३२/२०२६

**वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस**
**विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्रमांक १३८/२०२६ ने.ता.१०.०६.२०२६

**अर्जदार :** १. हारुन शाह हुसैन शाह,
वय ७६ वर्षे, धंदा - मजुरी
रा.वंडली, ता.भातकुली जि.अमरावती

-- विरध्द --

**गैरअर्जदारः** निरंक

ज्यापेक्षा **शाहरुन शाह हुसैन शाह** हे दि.**०५.१२.२०२५** रोजी मयत झाले. अर्जदार **हारुन शाह हुसैन शाह**, वय ७६ वर्षे, धंदा - मजुरी, रा.वंडली, ता.भातकुली, जि.अमरावती व इतर यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २** प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता या न्यायालयामध्ये दि.**०७.०४.२०२६** रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **शाहरुन शाह हुसैन शाह** यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत **शाहरुन शाह हुसैन शाह** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ०८.०४.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
भातकुली

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५९०/२०२६
**श्रीमती शैलेजा अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२७.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Shailaja Wd/o Arun Joshi, Age 77 Yrs. Occu.: Nil
2. Aniruddha Alias Ashish S/o Arun Joshi, Age 54 Yrs. Occu.: Service
   Both R/o House No.3, Deuskar Layout, Near Water Tank, Kanta Nagar, Amravati. **Presently R/o** at B-102, First Floor Jai Vinayak Darshan Co-op.Housing Society Vasant Nagari, Vasai, Palghar
3. Sau.Vaishali W/o Manish Tikle (Nee Vaishali D/o Arun Joshi), Age 51 Yrs. Occu.: Advocate
   R/o 61/62, Unique Tower, Evershine Nagar, Malad West, Mumbai.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **अरुण नारायण जोशी** हे दिनांक 12.12.2019 रोजी **मुंबई** येथे मयत झाले. अर्जदार **शैलेजा अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शैलेजा अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०६.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६४४/२०२६
**श्रीमती सविता अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.०४.०५.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Savita Shyam Patil, Age 50 Yrs. Occu.: Nil
2. Dhanashri Shyam Patil, Age 26 Yrs. Occu.: Service
3. Harshada Shyam Patil, Age 21 Yrs. Occu.: Advocate
   All Appli.No.1 to 3 R/o House No.2, Saneguruji Nagar No.2, Akoli Road, Sainagar, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **श्याम महादेवराव पाटील** हे दिनांक 01.04.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सविता अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सविता अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०७.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

प्रो.क्र.४११/२०२६

**वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस**
**विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्रमांक ११९/२०२६ ने.ता.०७.०५.२०२६

**अर्जदार :** १. पद्मा उर्फ कमल माणिकराव ठेम्बरे,
वय ८० वर्षे, धंदा - निरंक
रा.वासणी बु., ता.अचलपूर, जि.अमरावती
२. विमल वासुदेवराव तायडे,
वय ७८ वर्षे, धंदा - निरंक
रा.शनिवार म्हात्रे, हायवे रोड, सुविधा मेडिकल जवळ, गणेश नगर, रावलपाडा, रहिसर, पुर्व मुंबई

-- विरध्द --

**गैरअर्जदारः** निरंक

ज्यापेक्षा **अजाबराव बकाराम वैराळे** हे दि.**२३.०४.१९९४** रोजी मयत झाले. अर्जदार **पद्मा उर्फ कमल माणिकराव ठेम्बरे**, वय ८० वर्षे, धंदा - निरंक, रा.वासणी बु., ता.अचलपूर, जि.अमरावती व इतर यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २** प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता या न्यायालयामध्ये दि.**२५.०३.२०२६** रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **अजाबराव बकाराम वैराळे** यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत **अजाबराव बकाराम वैराळे** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ०४.०४.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
भातकुली

---

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, अमरावती विभाग, अमरावती**
**दिनांक २७ मार्च २०२६**

## सूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ क्रमांक प्रा.यो.अम./कलम-२०(३)/मौ.गोपाळपूर/गट क्र.४०/१ व इतर/सभा क्र.३२/२०२६/सहसंचाअम/११८**

ज्याअर्थी, अमरावती प्रादेशिक योजना (यापुढे **उक्त प्रादेशिक योजना** असे संबोधिले आहे) शासनाच्या नगर विकास विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र ३७ वा)(यापुढे **उक्त अधिनियम** असे संबोधिले आहे) चे कलम-१५(१) अन्वये अधिसूचना क्रमांक टीपीएस-२८८७/प्र.क्र.१९६/नवि-१३, दि.२९ मे, १९९३ अन्वये मंजूर केली असून ती दि.१५ ऑगस्ट, १९९३ पासून अंमलात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेतील मौजे-गोपाळपूर, ता.जि.अमरावती येथील शेत गट नं.४०/१, क्षेत्र ३.०५ हे.आर., गट नं.४१/१, क्षेत्र १.८२ हे.आर., गट नं.४१/१/अ, क्षेत्र २.०१ हे.आर., गट नं.४०/१/अ, क्षेत्र ०.६० हे.आर., गट नं.४१/२, क्षेत्र २.२० हे.आर., गट नं.४२/५/अ, क्षेत्र १.२५ हे.आर असे एकुण १०.९३ हे.आर क्षेत्र (यापुढे ज्यास **उक्त जमीन** असे संबोधले आहे) शेती विभागात समाविष्ट होते.

आणि ज्याअर्थी, प्रस्ताव छाननी समितीचे (यापुढे **उक्त समिती** असे संबोधले आहे) बैठक क्र.२१, दि.०७.०६.२०२३ रोजी झालेल्या सभेमध्ये समितीचे सदस्यांचा सल्ला घेतल्यानंतर, शासनाचे दि.०६.०५.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन उक्त अधिनियमाचे कलम-२० मधील तरतुदीनुसार उक्त जमीन शेती विभागातून वगळून काही अटींच्या अधिन राहून रहिवास विभागात समाविष्ट करणे आवश्यक असल्याचे उक्त समितीचे मत झाल्याने उक्त अधिनियमाचे कलम-२० चे पोटकलम (४) व त्या अनुषंगाने प्राप्त अधिकारांचा वापर करुन सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती यांनी उक्त जमीनी शेती विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबतच्या फेरबदलास अधिसूचना (यापुढे **उक्त अधिसूचना असे** संबोधले आहे) क्र.प्रा.यो.अम./कलम-२०(४)/मौ.गोपाळपूर/गट क्र.४०/१ व इतर/सभा-२१/२०२३/सहसंचाअम/५९, दि.२५ फेब्रुवारी २०२६ अन्वये मंजुरी प्रदान केली आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिसूचनेतील अट क्र.१ मध्ये नमुद ०.४० हे.आर अतिरिक्त सुविधा क्षेत्र सोडण्याबाबतची तरतूद (यापुढे **उक्त तरतूद** असे संबोधले आहे) रद्द करणेबाबत जमीन धारकांनी दि.२६.०२.२०२६ रोजी परिसरातील सुविधा दर्शविणाऱ्या गुगल प्रतिमेसह उक्त समितीच्या सदस्य सचिवांकडे अर्ज केला आहे.

आणि ज्याअर्थी संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि.०९.०३.२०२६ रोजीच्या पत्रान्वये उक्त तरतूद रद्द करणेबाबत सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती यांनी स्थळपाहणी करुन खातरजमा केल्यानंतर फेरबदल (यापुढे **उक्त फेरबदल** असे संबोधले आहे) प्रस्ताव कार्यान्वित करण्यास हरकत नसल्याचे कळविले आहे.

आणि ज्याअर्थी सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती यांनी दि.१२.०३.२०२६ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण करुन उक्त जमिनीच्या परिसरातील विद्यमान सुविधांची पडताळणी केली आहे.

आणि ज्याअर्थी सोबतचे परिशिष्ट-अ मध्ये नमुद केले नुसार उक्त अधिसुचनेतील अट क्र.१ मधील उक्त तरतूद रद्द करुन सदरची अट सुधारित करणे आवश्यक असल्याचे समितीचे मत झाले आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाने उक्त अधिनियमाचे कलम १५१ पोटकलम (१) अन्वये निर्णय क्र.टीपीएस-१८१५/प्र.क्र.४९/१५/नवि-१३, दि.११.०६.२०१५ नुसार कलम २०(२), २०(३) व २०(४) चे अधिकार विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना प्रदान केलेले आहेत.

आणि त्याअर्थी, याबाबतीत शासनाने प्रदान केलेल्या अधिकारानुसार, उक्त अधिनियमाच्या कलम २० चे पोटकलम (३) अन्वये, सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती उक्त अधिसुचनेतील अट क्र.१ सुधारित करणेकामी उक्त फेरबदल करण्याचा हेतू या सुचनेद्वारे घोषित करीत आहेत आणि त्याकरीता उक्त प्रस्तावित फेरबदलाच्या अनुषंगाने नागरिकांकडून हरकती व सूचना, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या मुदतीत लेखी स्वरुपात मागविण्यात येत आहेत.

प्रस्तुत फेरबदलाबाबत विहीत मुदतीत प्राप्त होणाऱ्या सूचना/हरकतीवर सुनावणी देण्यासाठी व त्यावरील अहवाल सादर करण्यासाठी **सहाय्यक संचालक, नगर रचना, अमरावती शाखा, अमरावती** यांना **अधिकारी** म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. हरकती/सूचना सहायक संचालक, नगर रचना, अमरावती शाखा, अमरावती, तट्टे बिल्डींग, कॅम्प, अमरावती यांच्या कार्यालयाकडे पाठवाव्यात **अधिकारी** यांनी वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन त्यांचा अहवाल सदस्य सचिव यांचेकडे सादर करावा.

**०२)** सदरची सूचना खालील कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळेत ३० दिवसांच्या कालावधीकरीता सर्वसामान्य जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध राहील.

१) सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती, **निलगिरी** डॉ.अग्रवाल यांची ईमारत, कॉंग्रेस नगर रोड, अमरावती.

२) सहाय्यक संचालक, नगर रचना, अमरावती शाखा, अमरावती, तट्टे बिल्डींग, कॅम्प, अमरावती

**०३)** प्रस्तुत सूचना www.dtp.maharashtra.gov.in (Division Offices) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

शिक्का

Digitally signed by
Owais Aljaz Momin,
Date 27.03.2026
(ओवैस ए.मोमीन)
सदस्य सचिव,
प्रस्ताव छाननी समिती,
अमरावती तथा, सहसंचालक,
नगर रचना, अमरावती
विभाग, अमरावती

(विमाका/अम/जाही./३५/२०२५-२०२६)

## परिशिष्ट - अ

(**सूचना** क्रमांक प्रा.यो.अम./कलम-२०(३)/मौ.गोपाळपूर/गट क्र.४०(१) व इतर/सभा क्र.३२/२०२६/सहसंचाअम/११८, दि.२७.०३.२०२६ सोबतचे परिशिष्ट)

| मंजुरीची अधिसूचना क्र.प्रा.यो.अम./कलम-२०(४)/मौ.गोपाळपूर/गट क्र.४०(१) व इतर/सभा-२१/२०२३/सहसंचाअम/५९, दि.२५ फेब्रुवारी २०२६ मधील अट क्र.१ | प्रस्तावित सुधारणेसह अट क्र.१ |
|---|---|
| फेरबदलातील क्षेत्राचा अभिन्यास करतांना त्यामध्ये अनिवार्य १० टक्के खुल्या जागे व्यतिरिक्त १० टक्के सुविधा क्षेत्र सोडण्यात यावे. (सदर क्षेत्र त्याच प्रयोजनार्थ जमीन मालक / विकासक यांना विकसित करता येईल.) सदर प्रकरणी ०.४० हे.आर. सुविधा क्षेत्राची कमतरता भरुन येण्याच्या दृष्टीने अतिरिक्त सुविधा क्षेत्र सोडण्यात यावे. | फेरबदलातील क्षेत्राचा अभिन्यास करतांना त्यामध्ये अनिवार्य १० टक्के खुल्या जागे व्यतिरिक्त १० टक्के सुविधा क्षेत्र सोडण्यात यावे. (सदर क्षेत्र त्याच प्रयोजनार्थ जमीन मालक / विकासक यांना विकसित करता येईल.) ~~सदर प्रकरणी ०.४० हे.आर. सुविधा क्षेत्राची कमतरता भरुन येण्याच्या दृष्टीने अतिरिक्त सुविधा क्षेत्र सोडण्यात यावे.~~ |

शिक्का

Digitally signed by
Owais Aljaz Momin,
Date 27.03.2026
(ओवैस ए.मोमीन)
सदस्य सचिव,
प्रस्ताव छाननी समिती,
अमरावती तथा, सहसंचालक,
नगर रचना, अमरावती
विभाग, अमरावती

(विमाका/अम/जाही./३५/२०२५-२०२६)

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### रामकृष्ण वेताळ यांचा अमरावती दौरा

**आसेगाव पूर्णा -** भाजपा किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष रामकृष्णजी वेताळ यांच्या अमरावती दौऱ्यानिमित्त शासकीय विश्रामगृह येथे सकाळी ११ वाजता पश्चिम विदर्भातील जिल्हाध्यक्ष व पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली.या बैठकीत भाजपा किसान मोर्चाचे मेळघाट जिल्हा सरचिटणीस आशिष मेहत्रे यांनी शेतकऱ्यांच्या विविध समस्या मांडल्या. यावर प्रदेशाध्यक्ष वेताळ यांनी शासकीय योजनांची माहिती देत त्या प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या सूचना केल्या.कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, प्रदेश सोशल मीडिया संयोजक राहुल भोसले, प्रदेश सरचिटणीस रंगनाथ सोळंके, प्रदेश सचिव प्रा. दुबे, प्रदेश उपाध्यक्ष अमर दिनकर, प्रदेश सचिव विनोद जाधव, प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब वानखडे, प्रदेश सरचिटणीस ललित सामदुरकर,प्रदेश संयोजक सुधाकर गीते, प्रदेश सदस्य गजानन काळमेघ, माधवजी अवघड जिल्हाध्यक्ष मेळघाट जिल्हा अमरावती,मिलिंदजी बांबल जिल्हाध्यक्ष अमरावती शहर, स्वप्नील भुयार जिल्हाध्यक्ष मोर्शी ग्रामीण यांच्यासह विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन आशिष मेहत्रे यांनी केले, तर आभार प्रदर्शन मिलिंद बांबल यांनी केले.



### मुंबईतील राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत भक्तीचा विजय

**अंजनगाव बारी-** येथील भक्ती जयश ठाकूर हिने नेहरू युवा केंद्रामार्फत मुंबई येथे आयोजित राज्यस्तरीय विकसित भारत युवा संसद- २०२६ मधील वक्तृत्व स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादित करून अमरावती जिल्ह्याचा गौरव वाढवला आहे. कठोर स्पर्धेत आपले प्रभावी विचार मांडत भक्तीने राज्यस्तरावर विजेतेपद पटकावले. यापूर्वी जिल्हास्तरीय युवा संसद स्पर्धा आर.डी.आय.के. महाविद्यालय, बडनेरा येथे ५ मार्च २०२६ रोजी पार पडली होती. 'आणीबाणीची १५ वर्षे : भारतीय लोकशाहीसाठीचे धडे' या विषयावर आपले विचार मांडत भक्तीने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावून राज्यस्तरासाठी निवड झाली होती.राज्यस्तरीय स्पर्धा मुंबई विद्यापीठ येथे १८ मार्च २०२६ रोजी आयोजित झाली होती. 'केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ : विकसित भारत २०४७ च्या दिशेने भारतीय तरुणांचा मार्ग सुकर करणे' या विषयावर प्रभावी सादरीकरण करत भक्तीने विजय मिळवला.भक्तीच्या यशाबद्दल भाजप नेते तुषार भारतीय यांनी विशेष अभिनंदन करून दिल्ली येथे होणाऱ्या पुढील राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. तसेच याप्रसंगी रामगीर महाराज मठाचे मठाधिपती शंकरगिरी महाराज, वसंतराव सोनार, पंकज हटवार, गौरव गुलालकरी, जयश ठाकूर, रोशन पुनिया आदी उपस्थित होते.भक्तीच्या यशामुळे अंजनगाव बारीसह संपूर्ण अमरावती जिल्ह्यात अभिमानाची भावना व्यक्त केली जात असून आगामी राष्ट्रीय स्पर्धेतही ती निश्चितच उजवा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### फुले-आंबेडकर-गाडगे महाराज संयुक्त जयंती उत्सव

**अंजनगाव बारी-**येथे 'सत्यशोधक माळी समाज मंडळ', चावडी चौक व 'नवयुवक सिद्धार्थ मंडळ' यांच्या संयुक्त विद्यमाने 'समता पर्व २०२६ – वर्ष १ ले' संयुक्त जयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. राष्ट्रपिता महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पहिल्या दिवशी ११ एप्रिल रोजी सायं.५.३० वा.चावडी चौक येथे प्रा. सुशीलदत्त बागडे प्रस्तुत 'मी जोतीराव फुले बोलतोय' या प्रभावी एकपात्री नाट्यप्रयोगाचे आयोजन केले आहे. समाजसुधारक महात्मा फुले यांच्या विचारांचे सजीव दर्शन घडवणारा हा नाट्यप्रयोग नागरिकांसाठी मोफत खुला आहे. दुसऱ्या दिवशी १२ एप्रिल ला सायं.६.०० वा. फुले, शाहू, आंबेडकर विचारधारा व संतांच्या कार्यावर आधारित प्रबोधनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.



# अचलपूरमध्ये अनधिकृत चार्जिंग स्टेशन बांधकामावर कारवाई

**अचलपूर/ वार्ताहर**

अचलपूर नगर परिषद हद्दीतील परतवाडा - अमरावती मार्गावरील अष्टमसिद्धी गेट समोरील मौजा खेल त्रिंबक नारायण सर्वे क्रमांक ६९/१ मधील सर्वे क्रमांक ५ या प्लॉट वर गेल्या काही दिवसापासून चार्जिंग स्टेशन चे बांधकाम शासकीय नियमांना तिलांजली देत सुरू असल्याचे वृत्त दैनिक जनमाध्यम मध्ये प्रकाशित झाले होते.यानंतर या वृत्तीची दखल घेत नागरिकांनी अचलपूर नगर परिषद प्रशासन,अचलपूर महावितरण विभागीय कार्यालय कडे लेखी तक्रार दाखल केली.यामुळे प्रकाशित झालेल्या वृत्ताची दखल अचलपूर नगर परिषद मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड यांनी घेतली आहे.गेल्या ६ एप्रिल रोजी अचलपूर नगर परिषद प्रशासनाकडून अनधिकृत रित्या बांधकाम करणाऱ्या त्या चार्जिंग स्टेशन संचालकाला नोटीस बजावत ते बांधकाम तात्काळ थांबविण्याचे निर्देश दिल.आणि याची कोणतीही परवानगी घेतली नसल्याचा ठपका सुद्धा ठेवला.आणि येत्या ७ दिवसात नोटीस मिळाल्यापासून सदर बांधकाम बाबत लेखी स्पष्टीकरण,मंजूर बांधकाम परवानगी नकाशास,शासकीय मोजणी नकाशा व मालकी हक्काचे कागदपत्र सादर करण्याचे निर्देश या नोटीस द्वारे अचलपूर नगर परिषद प्रशासनाकडून देण्यात आलं आहे. या कार्यालयाची रीतसर परवानगी घेऊनच पुढील बांधकाम करावे अन्यथा नियमाचे उल्लंघन झाल्यास कारवाई करण्याचा इशारा सुद्धा या नोटीस मधून देण्यात आला आहे.यामुळे आता शासकीय मोजणीची प्रतीक्षा सर्वांना लागली आहे. एकीकडे त्या प्लॉट धारकाने बाजूला असलेल्या प्लॉट ची संबंधित मालकांना कोणतीही माहिती मनमर्जी प्रमाणे झाडे,नाली तोडून साफसफाई करून मोठे नुकसान केले होते व कोणतीही शासकीय मोजणी न करता चक्क एका खाजगी व्यक्तीकडून मोजणी करीत बाजूला असलेल्या प्लॉट मध्ये सीमा आखणी करून त्याच प्लॉट समोर महावितरण विभागाकडून मंजूर झालेल्या उच्च दाबाची डी. पी व विद्युत खांब हद्दी समोर उभारल्याचे वृत्त दैनिक जनमाध्यम मध्ये ३ एप्रिल रोजी प्रकाशित झाले होते.या वृत्तामुळे सर्वत्र खळबळ उडाली होती.यानंतर काही नागरिकांनी पुढाकार घेत अचलपूर नगर परिषद प्रशासन व महावितरण विभागीय कार्यालय कडे लेखी तक्रार दिली होती. यानंतर अचलपूर नगर परिषद नगर रचना विभागाने या प्रकरणाची चौकशी केली आणि हे बांधकाम अनधिकृत असल्याचा ठपका अचलपूर नगर परिषद प्रशासनाने त्या चार्जिंग स्टेशन संचालकाला ६ एप्रिल रोजी बजावलेल्या नोटीस मधून स्पष्ट झाला आहे.यानंतर ते बांधकाम थांबले आहे आणि शासकीय मोजणी व बांधकाम परवानगी साठी सर्व कागदपत्रे गोळा करण्याची प्रक्रिया त्या संचालकाककडून सुरू असल्याची माहिती आहे. मात्र या प्रकारामुळे आजुबाजूला असलेल्या प्लॉट धारकांना मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.या प्रकरणाची सखोल चौकशी होऊन नागरिकांच्या दोषी आढळणाऱ्या कर्मचाऱ्यावर कारवाई ची मागणी सुद्धा नागरिकांनी केली आहे.नागरिकांनी अचलपूर नगर परिषद मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड,महावितरण विभागीय कार्यालय अचलपूर चे कार्यकारी अभियंता प्रदीप अंधारे, नगर परिषद बांधकाम आणि नगररचना विभागा कडे लेखी तक्रार दिली होती.नगर परिषद प्रशासनाकडून त्या तक्रारीची दखल घेण्यात आली असून महावितरण विभागीय कार्यालय अचलपूर तर्फे कोणतीही माहिती कारवाई बाबत नागरिकांना देण्यात आलेली नाही. यांमुळे नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.




नगर परिषदेकडून नोटीस

# युवकाचा मृतदेह काढण्यात 'आपदा'च्या मित्र संघटनेला यश!

**मोर्शी/ वार्ताहर**



घरून बेपत्ता असलेल्या एका २५ वर्षीय तरुणाचे प्रेत मोर्शी वरूड रोडवर असलेल्या माडू नदीच्या पात्रात आढळून आल्याची घटना दि.९ एप्रिल रोजी दु. २ वाजताचे सुमारास घडली.सदर तरुणाचा पाय घसरून तो नदी प्रवाहात पडलेल्या युवकाचा मृतदेह काढण्यात आपदा मित्रांनी यश प्राप्त केले. मृतक तरुणाचे नाव निखिल निरंजन इंगळे व २५ वर्ष रा.भाईपूर असे आहे.

पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार मोर्शी लगतच असलेल्या भाईपूर येथील निखिल निरंजन इंगळे हा दि.७ एप्रिलपासून घरून निघून गेला होता. दरम्यान ९ एप्रिल रोजी मोर्शी-वरुड रोडवरील मायवाडी येथील माडू नदीच्या मध्यभागातून वाहणाऱ्या नदीपात्रात त्याचा मृतदेह लोकांना आढळून आल्याची माहिती जिल्हाधिकारी आशीष येरेकर यांना दूरध्वनीद्वारे प्राप्त झाली.त्यांनी तत्काळ आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर यांना घटनास्थळी रवाना केले.त्यांनी कोणताही विलंब न करता ही माहिती मोर्शी येथील आपदा मित्रांना दिली.त्या अनुषंगाने आपदा मित्रांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन बघितले असता माडु नदीच्या पात्रात पाण्यावर युवकाचा मृतदेह आढळून आला.लगेच पोलीस प्रशासन व महसूल प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली आपदा मित्रांनी लाइफ बॉय जॅकेट,दोरी(रोप) व बांबूच्या सहाय्याने तयार केलेल्या स्ट्रेचरच्या मदतीने मृतदेह बाहेर काढला.मृतदेह सुरक्षितपणे बाहेर काढून शवविच्छेदनासाठी मोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालयात रवाना करण्यात आला.घटनास्थळी शोधकार्य पाहण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.पाण्याच्या प्रवाहात वाहत गेलेल्या युवकाचा मृतदेह बाहेर काढण्यासाठी आपदा मित्र प्रियंशू तायवाडे, विवेक सावरकर,श्याम भलावी,सागर तायडे यांच्यासह पोलीस व महसूल प्रशासनाचे सहकार्य लाभले.मृत युवकाची माहिती पोलिसांतर्फे त्याच्या नातेवाईकांना देण्यात आल्यानंतर मृतदेह त्यांच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आला. याप्रकरणी मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली पंकज साबळे, अथर्व कोहळे, स्वप्निल बायस्कर छत्रपती करपते पुढील तपास करीत आहे.

## श्री संत गजानन महाराज मंदिराच्या घुमटसाठी विवेक गुल्हाने यांचा पुढाकार



**नांदगाव पेठ-**येथील बाळापूरे लेआऊट परिसरात नवनिर्माणाधीन असलेल्या श्री संत गजानन महाराज मंदिराच्या घुमट बांधकामासाठी स्व. हिराबाई गुल्हाने चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष विवेक गुल्हाने यांनी तब्बल ५० हजार रुपयांची मदत दिली.

यावेळी विवेक गुल्हाने यांनी मंदिराला भेट देण्याचे आश्वासन देत 'गजानन महाराजांच्या कृपेने शक्य ती मदत करेन' असा शब्द दिला होता. दिलेल्या शब्दाप्रमाणे त्यांनी गुरुवारी मंदिराला भेट देत गजानन महाराजांच्या चरणी नतमस्तक होत कोणताही विलंब न लावता ५० हजार रुपयांची देणगी जाहीर केली. यावेळी मंदिर समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला विवेक गुल्हाने, मनीषा गुल्हाने यांच्यासह भास्करराव राजुरकर, सचिन राऊत, अतुल तलमले, अंकुश मानकर, राजेंद्र तुळे, गजानन ईसळ, प्रवीण भगत, धनंजय देशमुख, रोशन भोपळे, भीमसिंह पाटील, आकाश दारोकार, प्रतीक दारोकार, राजेश कोठार, मयकु कोठार आणि गजानन महाराजांचे भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आसरा माता मंदिराच्या बांधकामामध्ये अडथळा करणाऱ्याविरुद्ध उपोषण

**बेलोरा/ वार्ताहर**



येथील मुख्य चौक ते स्मशानभूमी रोडवरील प्राचीन आसरा माता मंदिराच्या बांधकामाचा अंतिम टप्पा सुरू असताना एका कडुलिंबाच्या झाडाच्या फांदीमुळे कामात अडथळा निर्माण होत आहे. ही फांदी तोडण्यासाठी वनविभागाकडून नाहरकत प्रमाणपत्र मिळावे, या मागणीसाठी ग्रामपंचायत बेलोरा समोर आमरण उपोषण करण्याची वेळ आसरा माता भक्तगणांवर आली आहे.

सदर फांदीमुळे थ्रीफेज वीज लाईन तसेच परिसरातील अंगणवाडीला धोका निर्माण झाला असल्याचे भक्तांचे म्हणणे आहे. याबाबत आंदोलनकर्त्यांनी ३ फेब्रुवारी २०२६ रोजी ग्रामपंचायत कार्यालयात लेखी निवेदन दिले होते. मात्र, ७ एप्रिल २०२६ पर्यंत कोणतीही कार्यवाही किंवा उत्तर देण्यात आले नाही, असा आरोप करण्यात आला आहे.दरम्यान, उपोषणाच्या एक दिवस आधी ग्रामपंचायतीने लेखी अर्जाला उत्तर देत मंदिर दुसरीकडे हलवण्याचा पर्याय सुचवला. मात्र, हा पर्याय उपोषणकर्त्यांना मान्य नसून त्यामुळे त्यांच्या धार्मिक भावना दुखावल्याचे त्यांनी सांगितले आहे.वनविभागाच्या नियम व अटींचे पालन करून संबंधित फांदी तोडण्यासाठी नाहरकत मिळेपर्यंत उपोषण सुरू ठेवण्याचा निर्धार भक्तगणांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणाकडे स्थानिक प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची मागणीही करण्यात येत आहे.

# मार्की येथे शिक्षण परिषदेचे यशस्वी आयोजन

**आसेगाव पूर्णा -** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मार्की येथे शिक्षण परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी माळवे साहेब,शिक्षण विस्तार अधिकारी पवार तसेच केंद्रप्रमुख धनस्कर यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमास सरपंच सुरोशे, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा पुढारे, उपाध्यक्षा बीरे, ग्रामसचिव कुलकर्णी तसेच हर्षवर्धन इंगळे, कुंभलवार, अक्षय वैद्य, कोरडे यांच्यासह केंद्रातील सर्व मुख्याध्यापक व शिक्षक बंधू-भगिनी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन केंद्रप्रमुखांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त मसराम, 'विनोबा ॲप' जिल्हा पुरस्कार प्राप्त वाईदेशकर तसेच नावेद यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच सीईटी उत्तीर्ण केंद्रातील शिक्षकांचाही पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.



जि.प. शाळा अंचलवाडीचे सहाय्यक शिक्षक भाजपाले यांनी साकारलेल्या थोर पुरुषांच्या आकर्षक स्केचचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महल्ले यांनी केले, प्रास्ताविक रसे यांनी मांडले तर आभार प्रदर्शन येवलेयांनी केले.

कार्यक्रमानंतर उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले.

# 'उच्च शिक्षणातील बदलते प्रवाह' विषयावरील राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन



**तिवसा-**येथील या.द.व. देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा येथे 'उच्च शिक्षणातील बदलते प्रवाह' या विषयावर आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचा उद्घाटन समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.उद्घाटन कार्यक्रमास मंचावर दिलीपबाबू इंगोले,डॉ. मिलिंद बारहाते, डॉ. दिलीप धोटे, सुरेशदादा खोटरे, हेमंत काळमेघ, बीजभाषक डॉ. ए. बी. मराठे, रमेशराव बोके तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख आदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले होते. तर उद्घाटक म्हणून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बाराहाते यांनी उपस्थित राहून परिषदेचे उद्घाटन केले. उद्घाटनपर भाषणात त्यांनी उच्च शिक्षणातील बदलत्या प्रवाहांमध्ये संशोधन, तंत्रज्ञान, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि विद्यार्थी-केंद्रित अध्यापन पद्धती यांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यानंतर प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख यांनी राष्ट्रीय परिषदेच्या आयोजनामागील हेतू स्पष्ट केला. राष्ट्रीय परिषदेच्या स्मरनिकेचे विमोचन उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर डॉ.ए.बी.मराठे, हेमंत काळमेघ, आणि सुरेश खोटरे यांनी राष्ट्रीय परिषदेच्या विषयावर आपले अमूल्य विचार व्यक्त केले. अध्यक्षस्थानी बोलताना दिलीपबाबू इंगोले यांनी उच्च शिक्षण जरी बदलले तरी त्याचा परिणाम व्यक्तिश: करून आपले कौशल्य विकसित करावे असे विचार मांडले. यावेळी बीजभाषण डॉ. ए. बी. मराठे यांनी केले. त्यांनी उच्च शिक्षणातील बदलते स्वरूप, नवोपक्रम, शैक्षणिक परिवर्तन, डिजिटल अध्यापन आणि संशोधन संस्कृती यावर सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विनोद खडसे यांनी तर आभार डॉ.के.जी. सोनटक्के यांनी व्यक्त केले.



# शिक्षक समिती शाखा धामणगावचे त्रैवार्षिक अधिवेशन

## तालुकाध्यक्षपदी योगीराज मोहोड तर सरचिटणीसपदी विवेक ठाकरे यांची निवड

**धामणगाव रेल्वे/ वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, शाखा धामणगाव रेल्वे च्या वतीने ९ एप्रिलला धामणगाव रेल्वे शाखेचे त्रैवार्षिक अधिवेशन लोया भवन,जुना धामणगाव येथे झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष शिक्षक समितीचे जिल्हा नेते तथा शिक्षक सहकारी बँकेचे अध्यक्ष गोकुलदास राऊत तर कार्यक्रमाचे उद्घाटक जिल्हाध्यक्ष अजयानंद पवार यांच्या हस्ते झाले,यावेळी विशेष सत्कारमुर्ती राज्याध्यक्ष विजय कोंबे हे उपस्थित होते. प्रमुख अतिथी शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर,राज्य महीला प्रतिनिधी प्रवीणा कोल्हे,जिल्हा सल्लागार संभाजी रेवाळे,जिल्हा सरचिटणीस शैलेन्द्र दहातोंडे,जिल्हा कार्याध्यक्ष प्रशांत निमकर, जिल्हा कोषाध्यक्ष नंदकीशोर पाटिल, जिल्हा सचिव मनिष काळे, सरिता काठोळे (जिल्हाध्यक्षा महिला आघाडी), विनिता घुलक्षे (जिल्हा सरचिटणीस महिला आघाडी) संचालिका संगिता तडस,आल्हाद तराळ (जिल्हा अध्यक्ष, म. रा. प्रा. शि. समिती डीसीपीएस सेल) प्रेमसुख ठोंबरे (सरचिटणीस, म.रा.प्रा. शि. समिती डीसीपीएस सेल),निलेश कांडलकर,माजी संचालक शरद लादे,रामदास भाग्यवंत,संचालक तुळशीदास धांडे,उमेश चुनकीकर, प्रशांत निंभोरकर (वर्धा जिल्हा कार्यालयीन चिटणीस)पवन बानोकर (वर्धा जिल्हा सोशल मिडिया प्रमुख) व तालुकाध्यक्ष, सरचिटणीस तसेच सत्कार मुर्ती सेवानिवृत्त शिक्षक, अधिकारी व कर्मचारी वर्ग धामणगाव रेल्वे उपस्थित होते.

धामणगाव शाखेतर्फे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांचा शाल,श्रीफळ व सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या अधिवेशनामध्ये योगिराज मोहोड यांची तालुकाध्यक्ष, विवेक ठाकरे यांची तालुका सरचिटणीस,विक्रांत टेकडे यांची तालुका कार्याध्यक्ष, रुपाली देशमुख यांची तालुकाध्यक्ष महिला, सविता सुपटकर यांची तालुका सरचिटणीस महिला, कार्याध्यक्ष सुनिता जाधव, कोषाध्यक्ष अर्चना आसोले, सचिन मानकर यांची तालुका उपाध्यक्ष, केशव पोटे यांची जिल्हा प्रतिनिधी,करुणा भबुतकर यांची जिल्हा महिला प्रतिनिधी म्हणून निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती जिल्हा अमरावती अभिनंदन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुकाध्यक्ष योगिराज मोहोड यांनी तर सुत्रसंचालन करुना भबुंतकर व सविता सुपटकर यांनी तर आभार प्रदर्शन विवेक ठाकरे यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यकरीता योगिराज मोहोड, विवेक ठाकरे, विक्रांत टेकाडे, अजय बावणे, रूपाली देशमुख, सवित सुपटकर, करूणा भबूतकर,अर्चना आसोले, सुरेश मनोहरे, तेजेश राठोड, धिरज देशमुख, प्रविण मडावी, मार्गदर्शक विजय केने, शरद थोटे,केशव पोटे, ओमप्रकाश धनस्कर, रामेश्वर गावंडे समस्त महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिति परिवार धामणगाव रेल्वे यांचे लाभले.


# ट्रकच्या चाकाखाली चिरडल्याने तरुणीचा जागीच मृत्यू

**भातकुली रोडवरील दुर्दैवी घटना**

## भावाच्या अंत्यविधीसाठी जात होती कानफोडी गावाला

**अमरावती** - भातकुली परिसरात भरधाव ट्रकखाली चिरडून एका तरुणीचा मृत्यू झाला. समिक्षा बाळासाहेब साबळे (वय १९, रा. गजानन महाराज मंदिर परिसर, दर्यापूर रोड, भातकुली) असे मृत तरुणीचे नाव आहे. ही घटना भातकुली रोडवर १० एप्रिल रोजी घडली. समिक्षा ही चुलत भावाच्या अंत्यविधीसाठी जात असताना हा रस्ता अपघात घडला. एकाच कुटुंबातील दोन जणांचा मृत्यू झाल्याने भातकुली तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे.





समिक्षा हिचा चुलत भाऊ नैतिक प्रदीप साबळे (वय १७, रा. कानफोडी) याचा ९ एप्रिल रोजी भातकुली रोडवरच अपघात झाला होता. त्याचाही जागीच मृत्यू झाला होता. त्याच्या मृतदेहाचे ९ एप्रिल रोजी जिल्हा सामान्य रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर त्याच्या पार्थिवावर कानफोडी गावात अंत्यविधी होती. १० एप्रिल रोजीची अंत्यविधी कार्यक्रमासाठी समिक्षा ही दुचाकी (एमएच २७ बीएस ०८०२) ने निघाली होती. भातकुलीपासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावर महालक्ष्मी कॉटन जिनिंगजवळ हा अपघात घडला.



मिळालेल्या माहितीनुसार, समिक्षा पुढे जात असलेल्या ट्रकला ओव्हरटेक करत असताना ट्रक अचानक उजव्या बाजूला वळला. त्यावेळी ट्रक (एमएच ४८ जे ०४२०) ने दुचाकीला धडक दिली. या धडकेत समिक्षा ट्रकखाली ☞(पान २ वर)

# गोकुळनगरमध्ये गोमांस प्रकरणी दुहेरी कारवाई; १.५ लाखांहून अधिक मुद्देमाल जप्त

## तीन आरोपींवर गुन्हे दाखल; पोलिसांची सकाळपासून सलग धडक मोहीम

**वणी । प्रतिनिधी :** वणी शहरातील गोकुळनगर परिसरात शुक्रवारी (दि. १० एप्रिल) सकाळी पोलिसांनी गोमांस तस्करी व विक्रीविरोधात सलग दोन कारवाया करत मोठा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत तीन आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले असून, एकूण हजारो रुपयांचा मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात घेण्यात आला आहे.

पहिली कारवाई : ९० किलो गोमांस जप्त

सकाळी साडेसातच्या सुमारास गोकुळनगर येथे पोलिसांनी छापा टाकून आरोपी सलमान शकिल शेख (२५) व नावेद शेख रियाज (२२), दोघेही रा. खडबडा मोहल्ला, यांना ताब्यात घेतले.

त्यांच्याकडून सुमारे ९० किलो ५०० ग्रॅम गोमांस (किंमत अंदाजे १८,१००) जप्त करण्यात आले.हे मांस अवैधरित्या विक्रीसाठी साठवून ठेवले असल्याचो फिर्यादी विशाल दुधबळे यांच्या जबानीवरून स्पष्ट झाले. या प्रकरणी महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमातील कलम ५, ५(सी), ९, ९(अ) तसेच BNS कलम ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तपास पोलीस हवालदार मारोती पाटील करत आहेत.



दुसरी कारवाई : गोमांसासह मोपेड जप्त यानंतर सकाळी ९ वाजताच्या सुमारास त्याच परिसरात दुसरी कारवाई करण्यात आली.

आरोपी अब्दूल माजिद अब्दूल सत्तार (३५), रा.मोमिनपुरा याला अटक करण्यात आली. त्याच्याकडून ३९ किलो गोमांस (७,८००) तसेच विना नंबरची ज्यूपीटर मोपेड (२०,०००) असा एकूण २७,८०० चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर आरोपी हा मोपेडवरून गोमांस विक्रीसाठी नेत असल्याची माहिती उघड झाली आहे.या प्रकरणाचा तपास पोलीस कर्मचारी गजानन सावसाकडे करीत आहेत.

पोलिसांची कारवाई कायम : दोन्ही घटनांमध्ये फिर्यादी विशाल पांडुरंग दुधबळे (रा. पटवारी कॉलनी, वणी)यांच्या तक्रारीवरून गुन्हे नोंदविण्यात आले असून,पुढील तपास सुरू आहे. गोकुळनगर परिसरात झालेल्या या दुहेरी कारवाईमुळे अवैध गोमांस विक्रीविरोधात पोलिसांनी कडक भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

## 'बोलली नाहीस तर आत्महत्या करेन!

# रोडरोमिओकडून तरुणीला लग्नासाठी धमकावणारा प्रकार

**अमरावती:** 'तू मला आवडतेस, माझ्याशी बोल... जर माझ्याशी बोलली नाहीस तर मी आत्महत्या करेन,' अशी धमकी देत एका महाविद्यालयीन तरुणीचा छळ करणाऱ्या रोडरोमिओ विरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या त्रासाला कंटाळून अखेर तरुणीने गाडगे नगर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी ही १ जानेवारी २०२४ रोजी ती विद्याभारती कॉलेजच्या गेटसमोर उभी असताना, आयुष खंडारे (२१, रा. धामणगाव रेल्वे) हा तिथे आला. त्याने तिला 'तू मला आवडतेस' असे म्हणत संवाद साधण्याचा प्रयत्न केला. तरुणीने त्याला ओळखत नसल्याचे सांगून नकार दिला असता, त्याने 'माझ्याशी बोल, नाहीतर मी जीव देईन' अशी धमकी दिली.

धमकीला घाबरून तरुणीने सुरुवातीला त्याला स्वतःचा मोबाईल नंबर दिला. मात्र, त्यानंतर आयुषने तिला सतत फोन करून त्रास देण्यास सुरुवात केली. त्याने तिच्यावर लग्नासाठी दबाव टाकण्यास सुरुवात केल्याने तरुणीने त्याचा नंबर 'ब्लॅकलिस्ट'मध्ये टाकला. यानंतर आरोपीने चक्क कॉलेज परिसरात तिचा पाठलाग करणे सुरू केले.

आरोपीच्या या कृत्यामुळे तरुणी प्रचंड दहशतीखाली होती. अखेर तिने हा प्रकार आपल्या कुटुंबाला सांगितला आणि गाडगे नगर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत आरोपी आयुष खंडारे विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# मध्यवर्ती कारागृहातील बंदीचा शिपायावर हल्ला

## फ्रेजरपुरा ठाण्यात गुन्हा दाखल

**अमरावती :** शहरातील जिल्हा मध्यवर्ती कारागृहात एका न्यायाधीन बंदीने अचानक आक्रमक होत कर्तव्यावर असलेल्या शिपायावर हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे कारागृहात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रकरणी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तौसीफोद्दीन फैजोद्दीन काजी (रा. अकोला) हा खून प्रकरणातील आरोपी असून सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. त्याला अकोला येथून अमरावती कारागृहात हलविण्यात आले होते. गुरुवारी तो कारागृहातील 'न्यू बॅरक' परिसरात बसलेला असताना ड्युटीवरील शिपाई ईश्वर डहाणे यांनी त्याला नियमानुसार आपल्या बॅरकमध्ये जाण्यास सांगितले. या सूचनेवरून काजी संतप्त झाला. त्याने शिपायाशी वाद घालत शिवीगाळ केली. वाद वाढताच त्याने डहाणे ☞(पान २ वर)

# मोबाईल चोरीनंतर बॅक खात्यातून ९५ हजार गायब | शिक्षकाची फसवणूक

**अमरावती :** अज्ञात चोरट्याने मोबाईल लंपास केल्यानंतर त्याचाच वापर करून बँक खात्यातून ९५ हजार रुपये काढले. शहरातील जुन्या कॉटन मार्केट परिसरात मोबाईल चोरीनंतर आर्थिक फसवणुकीचा प्रकार समोर आला आहे.

कलोती नगर येथील रहिवासी व शिक्षक बाळकृष्ण रामदास आंधळे (वय ५०) हे ७ एप्रिल रोजी सकाळी भाजी खरेदीसाठी कॉटन मार्केटमध्ये गेले होते. सकाळी सुमारे ८.३८ वाजता त्यांनी एका विक्रेत्यास ऑनलाइन पेमेंट केले. यानंतर काही मिनिटांतच गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या खिशातून मोबाईल चोरी केला. सदर मोबाईलमध्ये असलेले सिम कार्ड त्यांच्या पत्नी सुवर्णा आंधळे यांच्या बँक खात्याशी जोडलेले होते. मोबाईल चोरट्याच्या हाती लागताच त्याने यूपीआय व एनईएफटीच्या माध्यमातून विविध व्यवहार करत एकूण ९५ हजार रुपयांची रक्कम काढून घेतली. मोबाईलची किंमत अंदाजे ११ हजार रुपये असून, चोरीनंतर लगेचच आर्थिक व्यवहार झाल्याने हा प्रकार सायबर फसवणुकीचा असल्याचे स्पष्ट झाले. घटनेची माहिती मिळताच आंधळे यांनी सिटी कोतवाली पोलीस ठाणे आणि सायबर सेलमध्ये तक्रार नोंदवली. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत तसेच इतर कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. मोबाईल लोकेशन, बँक व्यवहार आणि डिजिटल पुराव्यांच्या आधारे आरोपीचा शोध सुरू असून नागरिकांनी मोबाईल सुरक्षित ठेवण्याबरोबरच बँकिंग ॲप्ससाठी आवश्यक सुरक्षाव्यवस्था ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# डिस्ट्रीब्यूटरशिपच्या नावाखाली ऑनलाईन फसवणुक

## -सायबर पोलिसांचा तपास सुरु

**अमरावती :** शहरात ऑनलाईन फसवणुकीचा आणखी एक प्रकार समोर आला असून, सीमेंट डिस्ट्रीब्यूटरशिप देण्याचे आमिष दाखवत एका व्यावसायिकाकडून १५ लाख रुपये उकळण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी सायबर सेल पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

कहकशा कॉलनी परिसरातील रहिवासी शेख रकीम शेख हनीफ मन्सुरी (वय ४७) यांच्याशी अज्ञात व्यक्तींनी मोबाईलद्वारे संपर्क साधला. त्यांनी स्वतःला एका नामांकित सिमेंट कंपनीचे प्रतिनिधी असल्याचे भासवून अधिकृत ☞(पान २ वर)

# निवृत्त प्राध्यापकाची ४ लाखांची ऑनलाईन फसवणूक

## फेसबुकवर 'कृषीरत्न पुरस्कार'चे आमिष

**अमरावती :** फेसबुकच्या माध्यमातून ओळख करून 'कृषीरत्न गुणीजन पुरस्कार' आणि परदेश दौऱ्याचे आमिष दाखवत एका निवृत्त प्राध्यापकास तब्बल ४ लाखांहून अधिक रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी राजेंद्र नामदेव जाणे (७२, रा. छत्रपती पार्क कॉलनी, नवसारी) यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलीस ठाण्यात मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमीचे अध्यक्ष कृष्णाजी रामाजी जगदाडे (रा.तिलनगर, चेंबुर, मुंबई) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारकर्ता राजेंद्र जाणे हे हे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथून प्राध्यापक पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत. पोलिससुत्रानुसार, तक्रारदारांची आरोपीसोबत फेसबुकवर ओळख झाली होती. आरोपीने झूम मीटिंगद्वारे संपर्क साधत 'कृषीरत्न गुणीजन पुरस्कार' मिळाल्याचे सांगितले. तसेच सिंगापूर येथे पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी येण्याचे आमंत्रण देत विविध खर्चाच्या नावाखाली पैसे भरण्यास सांगितले. आरोपीने विश्वास संपादन करण्यासाठी खोटे पुरस्कारपत्र पाठवले तसेच सोशल मीडियावर जाहीरात प्रसारित केली. या आमिषाला बळी पडत तक्रारदारांनी स्वतःच्या आणि कुटुंबीयांच्या खात्यातून विविध टप्प्यांत पैसे भरले. तक्रारदारांच्या खात्यातून १ लाख ६६ हजार २०० रुपये, जावई नितीन तट्टे यांच्या खात्यातून ४२ हजार रुपये, तसेच मुलीच्या खात्यातून ☞(पान २ वर)

# डॉ.आंबेडकर जयंती निमित्त विविध कार्यक्रम एकता रॅली समितीचे आयोजन

**अमरावती/प्रतिनिधी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विविध कार्यक्रमाने साजरी करण्यात येणार आहे. या निमित्त १४ एप्रिल रोजी सामूहिक अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्या सोबतच भीमपर्व २०२६ चे विमोचन करण्यात येणार असल्याची माहिती आज शुक्रवार १० एप्रिल रोजी पत्रकार परिषद मध्ये आयोजकांनी दिली आहे. त्यांनी सांगितले की,



कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते, समाजसेवा चंद्रकुमार उर्फ लप्पी जाजोदिया यांच्या अध्यक्षतेत होणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून खासदार डॉ. अनिल बोंडे , बळवंत वानखडे ,कुलगुरू डॉक्टर मिलिंद बारहाते, विशेष पोलीस महानिरीक्षक ☞(पान २ वर)

# अमरावती पोलीस दलात अत्याधुनिक वाहनांची भर

## बावनकुळे यांच्या हस्ते लोकार्पण

**अमरावती :** अमरावती शहर पोलीस दलाच्या कार्यक्षमतेत वाढ करणाऱ्या अत्याधुनिक नवीन वाहनांचा लोकार्पण सोहळा शुक्रवारी उत्साहात पार पडला. महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते या वाहनांचे पूजन करून हिरवी झेंडी दाखवत जनसेवेसाठी रवाना करण्यात आले.

या सोहळ्यास विविध लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांची उपस्थिती लाभली. यामध्ये विधानपरिषद सदस्य संजय खोडके, आमदार सुलभा खोडके, आमदार राजेश वानखडे, माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे आणि अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवानी यांचा समावेश होता. तसेच अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर आणि अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक विशाल आनंद हेही उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी नवीन वाहनांमुळे पोलीस दलाची कार्यक्षमता, गती आणि प्रतिसादक्षमता वाढणार असल्याचे सांगितले. त्यानंतर बावनकुळे यांच्या हस्ते वाहनांचे शास्त्रोक्त पूजन करण्यात आले आणि ध्वज दाखवून वाहनांचा ताफा रवाना करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन गाडगेनगर पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांनी केले, तर पोलीस उपआयुक्त गणेश शिंदे यांनी आभार मानले. या नवीन वाहनांमुळे अमरावती जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट होण्यास मदत होईल. तसेच आपत्कालीन परिस्थितीत पोलिसांना घटनास्थळी तत्काळ पोहोचणे सुलभ होणार असून गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासही मोठी मदत होणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# कृषी महाविद्यालयांमध्ये विदर्भातील विद्यार्थ्यांसाठी ५० टक्के कोटा असावा

## श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांची मागणी

**शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव देशमुख पुण्यतिथी निमित्त पुष्पांजली व मानवंदना**

**अमरावती/प्रतिनिधी:** शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या जन्मगावी पापळ येथे येत्या सत्रापासून कृषी महाविद्यालय सुरु होत आहे.कृषि महाविद्यालयातील प्रवेश हे केंद्रीय पद्धतीने होत असल्याने स्थानिक विद्यार्थी कृषी शिक्षणापासून वंचित राहतो, त्यामुळे कृषी



महाविद्यालयांमध्ये विदर्भातील विद्यार्थ्यांसाठी पन्नास टक्के कोटा असावा,अशी मागणी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी केली व त्यासाठी विदर्भातील लोकप्रतिनिधींनी प्रयत्न करावे, असे आवाहन केले.

शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या ६१ व्या पुण्यतिथी निमित्त श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या



वतीने डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती भवन येथे आयोजित पुष्पांजली व मानवंदना कार्यक्रमात ते बोलत होते.विधान परिषद सदस्य आमदार संजय खोडके, अमरावतीच्या ☞(पान २ वर)

# जुळया शहरात डॉ.बाबासाहेबांचा भव्य पुतळा उभारा - काँग्रेसची मागणी

**अचलपूर/प्रतिनिधी :-** अचलपूर-परतवाडा या शहरांमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा, अशी मागणी तालुका काँग्रेस व शहर काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी अचलपूर नगर परिषदेकडे निवेदनाद्वारे केली आहे.




नगर परिषद अचलपूरचे मुख्य कार्यपालन अधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अचलपूर–परतवाडा ही जुळी शहरे सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाची असून विविध समाजघटक येथे वास्तव्यास आहेत. भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव या परिसरात मोठ्या प्रमाणात असताना, येथे त्यांचा भव्य पूर्णाकृती पुतळा नसणे ही खेदजनक बाब असल्याचे सांगण्यात आले.

नव्या पिढीला प्रेरणा मिळावी तसेच सामाजिक समतेचा संदेश अधिक व्यापक व्हावा यासाठी शहराच्या मध्यवर्ती व दर्शनीय ठिकाणी पुतळा उभारणे आवश्यक ☞(पान २ वर)

# मोबाईल चोरटा ताब्यात ठाकरे चौकातील घटना

**चांदुर रेल्वे/प्रतिनिधी :** येथील ठाकरे चौकातून गर्दीचा फायदा उचलून वन प्लस मोबाईल लंपास करण्यात आला होता. या प्रकरणात पोलिसांनी तपास करून आरोपी अहमद बेग राशीद बेग (२६,लालखडी अमरावती ) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून २५ हजार रुपये किमतीचा मोबाईलही जप्त करण्यात आला आहे. माहिती नुसार ३१ मार्च रोजी ठाकरे चौकातून गर्दीचा फायदा घेऊन आरोपी अहमद बेग राशीद बेग यानी वन प्लस मोबाईल किंमत २५ हजार रुपये चोरी केला होता. या प्रकरणात चांदुर रेल्वे पोलिसांनी तपास करून आरोपीला ताब्यात



घेतले. त्याच्याकडून मोबाईलही जप्त करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक अजय आकरे यांच्या मार्गदर्शनात उपनिरीक्षक रोहित कुदळे, नंदलाल लिंगोट ,शुभम मुर्मे यांनी ही कारवाई केली.

# शहरात १६ मोठ्या नाल्यांच्या स्वच्छतेसाठी विशेष मोहीम पोकलेन मशीनद्वारे काम युद्धपातळीवर

**अमरावती/ प्रतिनिधी :** शहरातील नाले स्वच्छतेला गती देत अमरावती महानगरपालिकेकडून १६ प्रमुख नाल्यांच्या साफसफाईसाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांच्या निर्देशानुसार ही मोहीम युद्धपातळीवर राबविण्यात येत असून, नाल्यांमधील गाळ व कचरा हटवून पाण्याचा प्रवाह सुरळीत करण्यावर भर देण्यात आला आहे.

या मोहिमेत भाजीबाजार परिसरातील ताजनगर, वडाळीपासून सुरू होणारा आंबानाला, महादेव खोरी परिसरातील नाला तसेच मोशी कॉलनी आणि मशानगंज येथील नाल्यांचा समावेश आहे. या सर्व नाल्यांची प्रभावी साफसफाई करून पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या पाणी तुंबण्याच्या समस्यांवर नियंत्रण मिळवण्याचा उद्देश आहे.

सध्या या कामासाठी २ मनपाच्या आणि ४ भाड्याने आणलेल्या पोकलेन मशीन तैनात करण्यात आल्या असून, नाल्यात साचलेला गाळ, प्लास्टिक कचरा, झाडाझुडपांचे अवशेष आणि इतर अडथळे काढण्याचे काम वेगाने सुरू आहे. विशेषतः ताजनगर नाला हा महत्त्वाचा जलवाहिनीचा भाग असल्याने त्याच्या स्वच्छतेला प्राधान्य दिले जात आहे.

गेल्या काही वर्षांपासून नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ साचल्यामुळे पावसाळ्यात पाणी तुंबणे, रस्त्यांवर पाणी येणे, दुर्गंधी निर्माण होणे आणि आरोग्यविषयक समस्या वाढणे अशा अडचणी निर्माण होत होत्या. भाजीबाजार परिसरातील व्यापारी आणि रहिवाशांनी याबाबत वारंवार तक्रारी केल्या होत्या.

या पार्श्वभूमीवर आयुक्त वर्षा लड्डा यांनी तातडीने कारवाईचे निर्देश दिल्यानंतर प्रशासनाच्या देखरेखीखाली नियोजनबद्ध पद्धतीने नालेसफाई सुरू करण्यात ☞(पान २ वर)